IRBK-0100528

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय नाटक

दा क्र ५२८

IRBK-0100528

IRBK-0100528

दा. ७५.५२८

म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
वा. नं. 222

३३८
१६८००

पुरवणी 'स्वार्थसंन्यास.'

देशभक्त श्री० न० चिं० केळकर,

संपादक 'केसरी' पुणें लिहितातः—

...... "मास्टर डी० आत्माराम यांचे 'स्वार्थसंन्यास' नाटक वाचून पाहिलें. नाटकाची कल्पना चांगली असून त्यांतील भाषेवर श्री० कै० 'गडकरी' यांच्या भाषेची छटा उमटल्याचा भास होतो. मास्टर डी० आत्माराम यांना श्री० कै० 'गडकरी' यांचे अनुकरणही त्यापैकींच साधलें आहे."..........

0-8-23.

U2L

( ॐ )

०।।/ ३ २ १

# स्वार्थ-संन्यास.

अंक ] सामाजिक नाटक. [ १ ते ४.

लेखक व प्रकाशक.

## मास्टर:-डी. आत्माराम.

' विधिघटना ' ' शीलसामर्थ्य ' ' विषारी-प्याला ' इ० इ०
नाटकांचे कर्ते.

सोल एजंट:—एस, एन्, अष्टेकर अँन्ड सन्स्.
बुकसेलर्स् व स्टेशनर्स्; महाद्वार रस्ता, कोल्हापूर.

प्रथमावृत्ति.

सन १९२३

किंमत १ रुपया.

लेखक व प्रकाशक.

मास्टर-डी. आत्माराम.

आत्माराम बिल्डिंग,

कोल्हापूर-सिटी.

यांनीं

स्वतःकरितां

सदर पुस्तकासंबंधीं

**सर्व हक्क स्वाधीन**

ठेविले आहेत.

भाषांतर. प्रयोग. प्रकाशन.

रूपांतर. पडदा. विकासन.

# समर्पण.

साहित्य-सम्राट

कै० गुरु ‘ गोविंदाग्रज ’

ऊर्फ

## राम गणेश गडकरी

यांच्या

स्वर्गस्थ

दिव्य आणि तेजस्वी

आत्म्यास

हें गुरु-निष्ठेचें स्मृति-चिन्ह

सादर समर्पण.

---

गुरु चरणांकित

दत्तात्रय आत्माराम. वायकूळ.

IRBK-0100528

# हा कोण?

**जनता-जनार्दन!**

केवळ तुझ्याच कृपाछत्राखालीं वाढत असलेला व तसाच सदैव वाढू पहाणारा मी एक वाङ्मय--शास्त्राचा बाल विद्यार्थी आहे. देवा! माझ्या दिवंगत मित्रानें आपल्या मृत-शय्येवरून मला मारलेल्या शेवटच्या हांकेचा अगदीं बरोबर प्रतिध्वनि उमटविण्यासाठीं त्यानें त्यावेळीं मला उद्दे-शून संबोधलेल्या नांवांत कसलाही फरक न करण्यांत मित्रकर्त्तव्याबरोबरच मी थोडी राष्ट्रीयत्वाची हानी करतों आहे हें मी जाणतों; पण समाज--पुरुषा! भावनाप्रधान हृदयाचे मुके बोल तुझी लौकिक भाषा बोलूं शकत नसल्यामुळें कधीं कधीं व्यक्तीचा नाईलाज होतो. तसेंच,

**समाजाच्या सर्वेश्वरा!**

तूं आपल्या जीवाभावांनीं जतन करीत आलेल्या माझ्या गुरु 'गोविंदाग्रजां'च्या रमणीय वाङ्मय-क्षेत्रांत तुझ्या साहित्य--सेवकांचा डोळा चुकवून हा प्रथम पदन्यास करतांना तुझ्या एकजात रसिक अंतःकरणाची लेखकाला यथार्थ कल्पना नव्हती असें नाहीं; पण देवाधिदेवा! तुझ्या विभूति-भयानें थरथरणाऱ्या माझ्या अशक्त पाऊलानें त्या क्षेत्रांतील आर्द्र भूमीवर उमटविलेल्या या असल्या अस्पष्ट प्रतिबिंबामुळें तुझा थोडा रसभंग झाला तर तो दोष माझा नाहीं, कारण समाजाच्या सर्वेश्वरा! असा बेढब पदन्यास करण्याच्या धाडसी कल्पनेचा आद्य उगम सकृतदर्शनीं भासणाऱ्या माझ्या उद्धट प्रवृत्तीच्या विकृत लक्षणांत नसून, देवाधिदेवा! केवळ तुझ्या उदार हृदयाच्या अनंत विशालत्वानेंच मला हा अक्षम्य मार्ग दाखविला आहे. तसेंच,

**प्रेमाच्या परमेश्वरा!**

प्रस्तुत नाटकाचें पितृत्व पदरीं बांधून घेण्याला लेखक चुकून निमित्तमात्र झाला आहे. प्रेमळ मित्रांचें अपूर्व प्रोत्साहन, सन्माननीय

सद्गृहस्थांची सक्रिय सहानुभूति आणि थोर व वंदनीय विभूतींची गुरु-कृपा या संयुक्त शक्तींचा गोड परिपाक म्हणजेच हें 'स्वार्थ-संन्यास' नाटक होय. ही गोष्ट जाहीररीत्या कबूल करतांना लेखकाचें कृतज्ञ अंतःकरण प्रेम-लहरींनीं कसें उचंबळून येतें याचें यथातथ्य चित्र कोणत्याही भाषेचा कसलाही शब्द-कोष कधींही रेखाटूं शकणार नाहीं. तसेंच,

सदय समाज-पुरुषा!

पुस्तक लिहित असतां व तें झाल्यावर ज्या थोर व उदार गृहस्थांनीं आपला अमुल्य वेळ खर्च करून व मला निरनिराळें सहाय्य देऊन आपले ऋणी केले त्या सर्व महनीय महात्म्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. विशेषतः नाट्य-गुरु श्री. कृ. कोल्हटकर यांच्या प्रेमळ व सक्रिय सहानुभूतीबद्दल, सांगलीचे रा. केशवरावजी छापखाने यांनीं दिलेल्या नाट्यविषयक सूचनाबद्दल, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसाइटीचे व्हाईस प्रेसिडेंट श्री. गो. कृ. देवधर व दे. भ. न. चिं. केळकर संपादक 'केसरी' या विभूति-द्वयानें सवडी अंतीं आपलें अधिकारी मत कळविण्याच्या दिलेल्या अभिवचनाबद्दल, श्री. अ. भा. आळतेकर, एम्. ए. यांनीं आपला स्पष्ट अभिप्राय कळविण्याची कृपा केल्याबद्दल, श्री. शं. ग. गडकरी यांनीं गडकरी-घराण्याशीं माझा शिष्यसंबंध जोडूं दिल्याबद्दल, माजी नामांकित नट व सुप्रसिद्ध हार्मोनिअमपटु श्री. गो. स. टेंबे व बळवंत सं. मंडळीचे मालक व उत्पादक श्री. चिं. ग. कोल्हटकर यांनीं प्रयोग-दृष्ट्या दिलेल्या अनुकूल अभिप्रायाबद्दल लेखक त्यांचा सदैव ऋणी राहील, तसेंच,

सदर पुस्तकाला सूर्यप्रकाश दाखविण्याचें सारें श्रेय गडकरी-प्रेमी श्रीमंत सरदार नारायणराव हरी घोरपडे यांचेकडे आहे. श्रीमंतांनीं लेखकासाठीं घेतलेले श्रम व वेळोवेळीं दाखविलेली सक्रिय सहानुभूति यांचें विस्मरण त्याला कोणत्याही काळीं होणें शक्य नाहीं. तसेंच

माझे जिवश्च-कंठश्च स्नेही श्री. आनंदी-कुमार ऊर्फ के. गो. सवनीस (करंबळीकर) बी. ए., श्री. वि. गो. कुलकर्णी (बेनाडीकर) बी. ए. एल् एल्. बी., येथील सुप्रसिद्ध फोटो-आर्टिस्ट व बस्ट-स्पेशालिस्ट श्री. पी. पी पाटील., काव्य--प्रेमी श्री. वि. य. सोनटक्के व मित्रवर द. सि. अष्टेकर यांनीं वेळोवेळी दिलेल्या महत्त्वाच्या सूचनाबद्दल व लेखकावरील निर्व्याज प्रेमामुळें त्यांनीं घेतलेल्या जीवापाड श्रमाबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून ज्या परमेशाच्या इच्छामात्रेकरून ही वेडीवांकडी वाङ्मय-सेवा करण्याचा हा भाग्याचा दिवस उगवला त्याची पुन्हां एकदां करुणा भाकून, जनता-जनार्दन! मी तुझ्या मंगलमय चरणांचा सुखानें आश्रय करितों.

आत्माराम–बिल्डिंग, कोल्हापूर.
ता० १६ मे १९२३

साहित्य-सेवकांचा सदैव नम्र सेवक,
डी. आत्माराम.

## श्री० अ० भा० आळतेकर, एम ए. लिहितातः-

'स्वार्थ-संन्यास' हें सामाजिक नाटक कोल्हापुरांतील एक तरुण व होतकरू वाङ्मय-सेवक 'मास्टर डी. आत्माराम यांच्या लेखणींतून उतरलें आहे. मास्टर डी. आत्माराम हे गडकऱ्यांचे चेले असून प्रस्तुत नाटकांत संविधानकाचें व भाषेचें वळण एकंदरींत गडकऱ्यांचेंच दिसून येतें. नाटकाची भाषा अत्यंत चटकदार असून तिला नाविन्यपूर्ण व रम्य कल्पनांनीं नटविली आहे. हिंदु समाजांतील प्रचलित सामाजिक अन्यायाविरुद्ध मास्टर डी. आत्माराम यांचें अंतःकरण कसें तळमळतें आहे हें या नाटकांत स्पष्ट दृगोचर होतें. मास्टर डी. आत्माराम यांचा हा प्रयत्न बराच यशस्वी झाला असून त्यांनीं आपल्या ठिकाणीं वसत असलेल्या दिव्य प्रतिभेची चमक प्रस्तुत नाटकाच्या रूपानें महाराष्ट्रीय जनतेला दाखविली आहे. महाराष्ट्रीय जनतेकडून तिचा योग्य आदर होईल व मास्टर डी. आत्माराम यांच्या हातून उत्तरोत्तर सुरस नाट्यकृतींची मराठी वाङ्मयांत भर पडेल अशी आशा आहे.' ... ... ... ... ... ...



# स्वार्थ-संन्यास.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

स्थळ:– दिवाणखाना, सुधा सचिंत.

**सुधा:**—(स्वगत) माझ्या दिनानाथांच्या भावी कर्त्तव्य-क्षेत्रावर उत्साही किरण फेंकणाऱ्या आजच्या अरुण-सारथे प्रभाकरा, तुझ्या दिव्य-दर्शनासाठीं मीं किती अधीर झाल्यें! दिनानाथाचा रिझल्ट लागल्या दिवसापासून मीं तुझ्या मंगलदर्शनाची सारखी मार्गप्रतीक्षा करित आल्यें पण सदय दिन-मणे, अखेरीस आज तूं आपल्या पवित्र दर्शनानें पावन केलेस याबद्दल मीं तुझी उतराई कशी होऊं? खरेंच आजचा दिवस किती भाग्याचा! आज दिनानाथ पदवीधराच्या वेषांत पाहण्याला सांपडणार या गोड कल्पनेनें माझ्या वृत्ती मोहरून जाऊन मला हें सारें विश्व ठेंगणें दिसूं लागलें. छात्र-वृत्ति आणि सदस्यवृत्ति यांच्या सीमेवर उभारलेला हा दिवस दिनानाथांच्या आयुष्यांत सुवर्ण-अक्षरांनीं लिहून ठेवण्याइतका महत्वाचा नाहीं काय? पण दिनानाथांच्या भावी-आयुष्याची रूपरेषा आंखणारी मीं कोण? मला काय अधिकार? दिनानाथ बी. ए. झाले म्हणून मला कां बरें आनंद

व्हावा? अतिपरिचयामुळें ह्मणावें तर दिनानाथापेक्षां मधुकरांचाच आमच्या घराण्याशीं अधिक परिचय! असें असतां दिनानाथ बी. ए. पास झाल्याबद्दलचा आनंद आणि त्याच परीक्षेंत मधुकर नापास झाल्याबद्दलचा खेद यांत व्यस्त प्रमाण कां बरें असावें? दिनानाथांविषयीं मात्र आपलेपणा आणि मधुकरांविषयीं मात्र तेवढा परकेपणा हा भेदभाव कशानें बरें उत्पन्न झाला? दिनानाथ आणि मधुकर यांची अगदीं लहानपणापासूनची जोडी! एका शाळेंतले सहाध्यायी! एका विद्यालयांतले वर्ग-बंधु! एकमेकांचे एकमेकांवर अगदीं निर्व्याज प्रेम; असें असतां त्यांतील एक हृदयस्थ असावा आणि दुसरा आपल्यापासून अगदीं दूर असावा असें कां बरें वाटतें? मानवी प्राण्यांच्या ठिकाणीं ही भेद-भावाची प्रवृत्ति नैसर्गिक असूं शकेल काय? कां बाबांच्या कृपाप्रसादामुळें दिनानाथांनां आपलें उच्च शिक्षण संपादतां आलें ह्मणून मला असें वाटतें? छे! ही कल्पनाच मुळीं मनाला पटत नाहीं. आईच्या निधनानंतर तिचें दृश्य स्मारक बागेंत पुतळ्याच्या रूपानें असावें ही गोड कल्पना प्रथम दिनानाथांनींच बाबांच्या मनांत बिंबविली आणि अगदीं त्याच क्षणापासून मीं त्यांच्यावर प्रेम करीत आल्यें ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं, पण त्यामुळें त्यांच्या आयुष्यांतील प्रत्येक गोष्ट मींच ठरवावीं असें मुळींच होत नाहीं. मग हें असें कां बरें होतें? छे कांहींच समजत नाहीं! पण अगबाई हा अंक कसला? काय! काव्य-चंद्रिका? या दिनानाथांच्या अत्यंत प्रिय आणि आवडत्या मासिकांत प्रकाशित झालेली 'प्रेमाचें प्रतिबिंब' ही दिनानाथांची कविता कितीवेळां जरी वाचली तरी मनाचें पुरतें समाधानच होत नाहीं. पाहूं तर खरें पुन्हां एकदां तें दिनानाथांचें 'प्रेमाचें प्रतिबिंब'

(काव्यांत पूर्ण मग्न.)

**मधुकरः**—(एकदम प्रवेश करून) सुधाताई, आला कां दिनानाथ युनिव्हर्सिटी-हॉलमधून? काय? उत्तर नाहीं? पण इतकी ही तादात्म्य तरी कशाशीं पावली? (हळूच जवळ जातो) काय? दिनानाथांचें 'प्रेमाचें प्रतिबिंब'? आणि तें हिला कुणीं दाखविलें? अरेरे काय करूं!

विधात्या, ओजस्वी प्रतिभेचें श्रीमंती भांडार दरिद्र्याच्या दळभद्र्या कपटींत बसवून तूं मात्र आपल्या अकलेचें खासें दिवाळें काढलेंस! (काव्यानंदामुळें सुधेची डुलली जाणारी मान मधुकरास नकार दर्शविते) काय नाहीं? त्यानें दिवाळें काढलें नाहीं? (पुन्हां मान तशीच हालते) ठीक आहे! (होकारार्थी मान) अरे पण हिची ही मान माझा पाणउतारा करण्याच्या हेतूनें हालते कां खरोखरच काव्यानंदामुळें अशी डुलते? ह्या संशयी मानेचा पुरता निकाल लावण्यासाठीं मला कांहीं काल दबा धरून बसणें भाग आहे. (लपतो.)

**सुधाः**—अहाहा! या माझ्या दिनानाथांच्या 'प्रेमाच्या प्रतिबिंबांत' मला आणखी काय दिसायचें राहिलें आहे? प्रेमोत्कर्ष सहन न होणारी द्वेषांध दुष्टबुद्धि अशीच लपत छपत प्रेम-वस्तूच्या घरांत बिऱ्हाड करतें पण ती प्रेमवस्तु आपल्या हांतून निसटून जाणार हें एकदां निश्चित झाल्यावर ती द्वेषांध दुष्टबुद्धि जीवाचा जीव्हाळा दाखवून प्रेमवस्तूला आणि तिच्या बरोबरच तिच्या आश्रयदात्याला नष्ट करण्याचा आटोकाट प्रयत्न करते; पण अशा-वेळीं ईश्वरी-सांकेत कांहीं निराळाच असतो हें त्या बिचाऱ्या दुष्टबुद्धीला काय माहीत! अहाहा! दिनानाथ या तुमच्या गुणांमुळें तुह्मीं कोणाला प्रिय होणार नाहीं?

**मधुकरः**—(स्वगत) छे! छे! पुढचें ऐकण्याचें धाडसच होत नाहीं. आतां पुढें झालेंच पाहिजे. (प्रगट) कोण प्रिय होणार नाहीं, सुधाताई?

**सुधाः**—कोण मधुकर! केव्हां आलांत आणि बाबा कुठें आहेत?

**मधुकरः**—हें कांहीं माझ्या प्रश्नाचें उत्तर नव्हें; तरी पण सुधाताई, बाबासाहेब वर येतां येतां माईसाहेबांच्या दिवाणखान्यांत गेले व ते इतक्यांत येथें येतील पण माझ्या प्रश्नाचें उत्तर तसेंच राहिलें! पण हें पहा बाबासाहेबच इकडे येत आहेत. (रावबहादूर येतात.)

**रावबहादूरः**—(प्रवेश करून) सुधे, आज दिनानाथ कुठं दिसत नाहीं?

सुधाः—हें काय बाबा! आज दिनानाथांच्या विश्वविद्यालयाचा पदवी–दानसमारंभ ना? मग या वेळीं ते इथं कसे असतील?

रावबहादूरः—खरेंच मला त्या गोष्टीचें स्मरणच नव्हतें. एकूण आज मला माझा दिनानाथ बॅचलरच्या ड्रेसमध्यें दिसणार अं! ठीक झालं! दिनानाथ बी. ए. झाला हें ठीक झालें. आतां त्याला आपल्या भावी आयुष्याचा चित्रपट वाटेल तसा मनोवेधक रंगविण्याला मोकळीक झाली; पण मधुकर, तुझ्याबद्दल मला वाईट वाटत नाहीं असें मात्र समजूं नकोस अं!

मधुकरः—छे! छे! बाबासाहेब असें समजण्याइतका कां मीं कृतघ्न आहे? गेल्या सांथीच्या तडाक्यांत जर मीं सांपडलों नसतों तर बाबासाहेब, मलाही दिनानाथाप्रमाणें युनिव्हर्सिटीचा गाऊन सहज मिळवितां आला असता!

रावबहादूरः—मधुकर, तुझ्या कर्तृत्वशक्तिबद्दल मला केव्हांही शंका नव्हती आणि नाहीं; पण आजची परिस्थिति लक्ष्यांत घेतां–निदान शिष्टाचार ह्मणून तरी–दिलगिरीच्या एकाद्या दुसऱ्या शब्दानें तुझें शान्तवन नको कां करायला?

सुधाः—पण मीं ह्मणत्यें बाबा, शान्तवनाचा हा नाटकी प्रकार हवा तरी कशाला? नुसत्या दिखाऊ दिलगिरीनें होरपळणारीं हृदयें शान्त होतीं तर जगांतील निम्या अधिक दुःखांचा तरी सहज परिहार झाला असता! याचा अर्थ मधुकर, मीं आपल्या दुर्दैवाला हांसते असें मात्र समजूं नका. हल्लीं आपल्या समाजाचा कल सत्क्रियापेक्षां भावना–प्रधान प्रवृत्तीकडे अधिक आहे एवढेंच मला सांगावयाचें होतें.

रावबहादूरः—सुधे, दिनानाथाचा अल्प सहवास तुला सामाजिक प्रवृत्ति–निवृत्तीचे बिकट प्रश्न सोडविण्याला समर्थ करील असें मला वाटलें नव्हतें. खरेंच मधुकर, दिनानाथाच्या तालमींत वाढलेली ही पोर इंडीयाची सब्जेक्ट झाली नाहीं ह्मणजे मीं मिळविली ह्मणतों.

**मधुकरः**—पक्षपातांत वस्तुस्थितीचा विपर्यास करण्याची मोहक शक्ति नसती, तर बाबासाहेब, सुधाताई अद्याप सफ्रेजेट झाल्या नाहींत असें सांगण्याचें धाडस कदाचित् माझ्या हातून झालें असतें; पण हा दोष त्यांचा नसून परिस्थितीचा आहे. प्रेमाचें प्रतिबिंब दाखविणाऱ्या दिनानाथाची काव्यचंद्रिका कोण कोणत्या मृदु पुष्पांना फाजील विकासित करूं शकेल हें सांगणें जरा कठीण आहे, तरी पण बाबासाहेब, दिनानाथाच्या या गुणाबद्दल मला त्याचें साभिमान कौतुकच वाटतें!

**सुधाः**—कौतुकच वाटते? मधुकर, मलाही या तुमच्या कौतुकास्पद विधानाचें मोठें कौतुकच वाटतें! मधुकर, फुलांच्या विकासनाची अगदीं शेवटची पायरी ठरविणारे तुह्मीं कोण? शिवाय मीं असें ह्मणत्यें फुलें फाजील विकसीत झालीं तरी अशी कोणती आपत्ति ओढवणार आहे? प्रेमळ रसिकाला हृदयस्थ बीजकोष उघडा करून दाखवितांना फुलांना वरवरच्या धिनयाच्या पातळ पाकळ्यांना मुकावें लागलें ह्मणून काय झालें? फार लांब कशाला? बाबा, गोष्ट ओघालाच आली ह्मणून सांगत्यें, हा पाहिलांत कां काव्य-चंद्रिकेचा ताजा अंक! यांतली ही पहा दिनानाथांची 'प्रेमाचें प्रतिबिंब' ही कविता! बाबा, एकवेळ ही आपण वाचाच ह्मणजे मधुकरांच्या कौतुकास्पद विधानाच्या फोलपणा मनाला पटून कवींचीं हृदयें किती निष्पाप आणि स्फूर्तिदायक असतात हें आपल्याला चांगलें समजेल. (उभयतां वाचनांत मग्न.)

**लिलाः**—(प्रवेश करून) सुधाताई?

**मधुकरः**—(पुढें होऊन) कोण माईसाहेब! या, या. प्रत्यक्ष प्रेमाला सोडून त्याचें नसतें प्रतिबिंब पाहण्यांत गुंग झालेल्या बाबासाहेबांच्या ऐवजीं मला आपलें स्वागत करावें लागेल असें मला कधींच वाटलें नव्हतें.

**लिलाः**—ह्मणजे? मधुकर मीं नाहीं समजल्यें तुमच्या ह्मणण्याचा अर्थ! बरें तें असो; पण मधुकर, अगदीं जवळचीं माणसें न दिसण्याइतकी कां त्यांत मौज आहे? खरेंच तशीच मजा असेल तर त्या आनंदाची मीही वांटेकरीण व्हावें ह्मणत्यें.

**मधुकरः**—(स्वगत) आपत्ति येऊं लागली ह्मणजे अशा चोहोंकडून येऊं लागते. (प्रगट) माईसाहेब, दुसरें काय असायचें आहे त्या भिकारड्या मासिकांत? एका सुधारलेल्या वेड्याचा हवेंत तरंगणारा तो एक उलटा मनोरा आहे. उपदेशाच्या जाड पांघरूणांखालीं अत्याचाराचा कळस करण्याचें तें एक अपूर्व साधन आहे. अल्लड आणि तरुण युवा-युवतींना कर्तव्यभ्रष्ट करून अनीतीकडे खेंचणारी ती एक कृत्या आहे. येनकेन प्रकारेण जगाच्या डोळ्यांत कळेंच बसण्याचा तो एक दरिद्री हट्ट आहे. अशा हट्टांचें स्तोम माजविणाऱ्यांचा मला राग न येतां, माईसाहेब, उलट मला त्यांची कींव कां येते हेंच आधीं मला कळत नाहीं.

**लिलाः**—पण मधुकर असला हा सुधारलेला दरिद्री वेडा तरी कोण?

**मधुकरः**—माईसाहेब, असल्या वेड्यांची आपल्या देशाला वाण कां आहे? आपली भरतभूमी असल्या वेड्यांच्या पीकाबद्दल फार प्रसिद्ध आहे माईसाहेब, हा सुधारलेला दरिद्री वेडा बाबासाहेबांच्या अन्नावर वाढलेल्या सुधाताईच्या दिनानाथा शिवाय दुसरा कोण असणार?

**लिलाः**—(आश्चर्यचकित) कोण दिनानाथ? नुकताच बी. ए. होऊन आज डिप्लोमा घेऊन येणारा तुमचा प्रियमित्र दिनानाथ? ज्याच्या काव्य-प्रतिभेची सारे लोक अलोट तारीफ करतात तो पदवीधर दिनानाथ? मधुकर, एखाद्या पदवीधराच्या कृतीबद्दल मन मानेल तसा निर्गरल प्रलाप काढणें थोडेसें धाडसाचें नाहीं काय?

**मधुकरः**—माईसाहेब, यांत धाडस तर नाहींच नाहीं पण उलट यांत कटु सत्याचा तिखट अनुभव आहे. पदवीचें शेंपूट वजा जातां, माईसाहेब, कित्येक पदवीधर नुसतीं मनुष्येंच असतात असें दुर्दैवानें कधीं-कधीं अनुभवाला येतें. पदवीमुळें दिनानाथाला आपल्या सामाजिक दर्जांत स्थित्यंतर करतां आलें ह्मणून मीं त्याचा हेवा करतों असें मात्र आपण समजूं नका.

**रावबहादूरः**—( पुस्तक मिटून सुधेला देतदेत ) अहाहा ! कोण हें पदलालित्य ! सुधे, दिनानाथानें या द्रूपांध दुष्टबुद्धीला आपल्या काव्य-छंद-यांत कशाला थारा दिला ! कां प्रेम-साम्राज्यांतल्या आंधळ्या प्रजेला तिचा तो काळाकुरखा दिसालाच नाहीं ? कसेंही असलें तरी अखेरीस प्रेमाची सत्ता अबाधित राहवयाची ती राहिलीच. सुधे, असलें काव्य ह्मणजे घटका-भर प्रत्यक्ष प्राणाची विस्मृति बरें ! ( वळून ) कोण ? आपण ? केव्हां आलांत? काव्याच्या नादांत मीं आपणाला विसरलों खरा तरीपण मधुकरानें आपली कामगिरी केलीच असेल !

**लिलाः**—तें मेलें असो, पण इतकी ब्रह्मानंदीं टाळी लागण्याइतकें त्या पुस्तकांत असें होतें तरी काय ?

**रावबहादूरः**—आपल्याला माहितिच असेल माझ्या दिनानाथाची उज्वल काव्य-प्रतिभा. लग्नापूर्वीं आपल्याला आपल्या वडिलांनीं दिनानाथाच्या काव्यांचा स्टडि करायला सांगितलें होतें ना? त्याच दिनानाथाचें 'प्रेमाचें प्रतिबिंब' या नांवाचें तें एक मोहक आणि स्फूर्तिदायक काव्य आहे.

**सुधाः**—बाबा, किती वाजले? अझून दिनानाथ कसे येत नाहींत! मधुकर, क्षणभर मर्यादेचें उल्लंघन करतें ह्मणून मला क्षमा करा, हलक्या पावलांनीं आपण विश्वविद्यालयाच्या भुवनापर्यंत जाऊन येण्याची तसदी घेतां कां?

**मधुकरः**—(स्वगत ) मानी मधुकरा, ऐक, ऐक, कान फाडून हे शब्द पुरते ऐक. ( प्रगट ) सुधाताई, मीं जातों पण चॅन्सेलरचा अड्रेस संपल्यानंतर वाटेंत दिनानाथ कुठेंही रमणार नाहीं अशी मी आपणाला हमी देतों; मग ही जाण्यायेण्याची विनाकारण तंगडतोड कशाला? आपल्याला अगदीं करमतच नसलें तर दिनानाथाचें प्रतिबिंब आपणाजवळ आहेच.

**दिनानाथः**—( पदवीसह पदवीधराचे वेषांत प्रवेश करून ) काय दिनानाथाचें प्रतिबिंब? मधुकर, तुझ्याइतकें माझें निर्मळ प्रतिबिंब दुसरें काय असणार? ( प्रेमानें मधुकराच्या खांद्यावर हात-ठेवतो. )

**रावबहादूर:**—कोण दिनानाथ! ये ये बाळ, मला तुला एकदां कडकडून भेटूं दे. बाळ, ये ये पण लाडक्या येतां येतां असें थबकून तूं तोंड कां फिरविलेस? आणि हें काय! दिनानाथ, अश्रू आणि ते तुझ्या डोळ्यांतून?

**दिनानाथ:**—होय बाबासाहेब, माझ्याच डोळ्यांतून निघणारे ते प्रेम आणि कर्तव्य यांचे ते पवित्र अश्रू आहेत. उपकार कर्ता प्रेमानें जवळ बोलावित असतां या आपल्या हतभागी दिनानाथाला ज्या गोष्टीची पवित्र स्मृति त्याला मागें खेंचतें आहे ती खेदाची गोष्ट सांगण्यापूर्वी, बाबासाहेब, मला हें आधीं अगदीं प्रांजलपणें कबूल करूं द्याच कीं आपण काय तो मला फक्त जन्मच दिला नाहीं बाकी प्रत्यक्ष जन्मदात्या आईबापांचें विस्मरण पाडण्याइतकें जें आपण माझ्यावर अपूर्व अपत्य-प्रेम केलेंत, प्रसंगीं भडकणाऱ्या माझ्या स्वच्छंदी आयुष्य-नौकेला जें आपण योग्य वळण दिलेंत, पडत्या प्रसंगाला मला आर्थिक साहाय्य देऊन आपण जो माझा परामर्ष घेतलांत त्या साऱ्या-साऱ्या उपकारांबद्दल मी आपला उतराई कशानें होऊं? प्रेमळ कृतज्ञता-अश्रूंच्या संतत सिंचनानें मला हे उपकाराचे पर्वत केव्हांना केव्हां, निदान अंशतः तरी दुभंगतां येतील अशी बळकट खात्री असतांही बाबासाहेब, मला जे अत्यंत वाईट वाटतें तें निराळ्याच गोष्टीबद्दल.

**लिला:**—मग दिनानाथ, सांगाना ती गोष्ट. आम्हाला असें संशयांत कां बरें ठेवतां?

**दिनानाथ:**—मग माईसाहेब, सांगूच कां ती गोष्ट. आपण त्या गोष्टीचें प्रेमानेंच कौतुक कराल ना? बाबासाहेब, क्षमा करा, एका खेदजनक गोष्टीच्या परिस्फोटामुळें मी आपणा सर्वांच्या दुःखाला अप्रत्यक्ष कारणीभूत होणार आहे ह्मणून मला क्षमा करा आणि ती खेदाची गोष्ट ह्मटली ह्मणजे आजच्या या गोष्टी पाहण्याला या कपाळकरंट्या दिनानाथाच्या दुर्दैवानें आज त्याच्या प्रिय आईसाहेब-माझ्या आईसाहेब आज हयात नाहींत. (रडतात.)

**लिला:**—(स्वगत.) अगबाई हें काय! सारींच रडूं लागलीं! कोण ही कर्मकटकट! पण मीं वेडीनें या आपत्तीला आधीं आमंत्रण कशाला बरें करावें? अगबाई कोण मेला त्रास हा! पण माझे हे कोरडे डोळे कदाचित् शिष्टाचाराचा विश्वासघात करतील ह्मणून त्यांनां रुमालाच्या आड असें कांहीं काळ लपविलेच पाहिजेत. (खोटा अभिनय.)

**रावबहादूर:**—अरेरे! दिनानाथ, माझ्या लाडक्या बाळा! कशाला हा मर्मी घाव घालून माझ्या हृदयाचें विदारण केलेंस?

**सुधा:**—नाहीं, नाहीं दिनानाथ, या तुमच्या घांवांत बाबा भासवितात तितकी प्रखरता मुळींच नाहीं. या तुमच्या घांवाच्या गोड आघातानें फोड-लेल्या स्मृति-डोहांत एका निर्ढावलेल्या मनाखेरीज दुसऱ्या कोणालाहि अगदीं जगाच्या अंतापर्यंत असेंच डुंबत राहावेसेंच वाटूं लागेल; ह्मणून ह्मणतें दिनानाथ, चालूं द्या, चालूं द्या ते तुमचे गोड आघात!

**रावबहादूर:**—बाळ सुधे, शांत हो; दिनानाथ, असें वेड्यासारखें करून कसें चालेल? बाळांनो, जन्म, स्थिति आणि लय यांतून कोणत्या प्राण्याची सुटका झाली आहे? ईश्वरी-सामर्थ्यापुढें मानवी डोकें नमवायला नको काय? दिनानाथ, तुझें हें सद्यकालीन वैभव पाहून तिला हें अफाट विश्व अपुरेंच वाटलें असतें पण करायचें कसें? 'ईश्वरेच्छा बलीयसी!' त्याला तूं आणि मीं तरी काय करणार? यदृच्छेनें ओढवलेल्या प्रसंगाला धैर्यानें तोंड द्यावयाला नको काय? बाळ मधुकर, तूं तरी दोन गोष्टी सांगून यांचें शान्तवन कर.

**दिनानाथ:**—बाबासाहेब, आपली विचार-सरणी मला पटत नाहीं असें कां आपणाला वाटतें? पण मीं तरी काय करूं? निसर्गाचे नियम पायांखालीं सहज लिलेनें कसें तुडवितां येणार? शिवाय, बऱ्याच परिश्रमानें तसेंही करितां आलें असतें पण बाबासाहेब, माझ्या आईसाहेबांशीं आपण केलेला द्रोह, माईसाहेबांच्या रूपानें प्रत्यक्ष डोळ्यासमोर मूर्तिमंत उभा असतां, मला तसें तरी कसें करतां येईल?

**मधुकरः**—पण दिनानाथ, गत गोष्टींचा खेद करीत बसण्यांत तरी असा कोणता पुरुषार्थ आहे ? वेड्या, तुझ्या ह्या आत्मघातकी कृत्याचा माई-साहेबासारख्या निष्पाप आणि कोमल स्त्रीवर काय परिणाम होईल याचा थोडा तरी विचार कर. शिवाय स्वतःला आतां उपपदधारी विद्वान ह्मणवून घेतोस. अरे हीच कां तुझी विद्वत्ता! आणि हाच कां तुझ्यावर तिचा संस्कार? वेड्या, अशा प्रसंगीं तुझ्यासारखा सुशिक्षितानें विवेक करायला नको काय?

**सुधाः**—नको, नको, खरेंच नको; जरठ-तरुणी-विवाहाला फुकटची सहानुभूति दाखविणाऱ्या अविवेकी तरुणानें, मधुकर, निदान दिनानाथांनां तरी असला हा विवेकाचा उपदेश करण्याचा खोटा आंव घालूं नये. दिनानाथ, वाहूं दे, वाहूं दे, माझ्याप्रमाणेंच तुमचीही अश्रुगंगा डोळ्यांत रडण्याचें सामर्थ्य असेंपर्यंत अशीच वाहूं दे. या वेळीं तो विवेकाचा वेदान्त काय कामाचा? मधुकर, माझ्या आईच्या मूठभर चितेनें तापून गेलेल्या आपल्या विवेकाच्या भांड्यांत या माझ्या अजाण दिनानाथाला तुमची ती महात्म्याची संयमी शक्ति कोठून दिसणार?

**लिलाः**—सुधाताई, असें उद्धट बोलूं नये. इकेडून सांगणें झालें नसतें, किंवा आपल्या प्रिय मित्राची कळकळच नसती तर मधुकरांनीं ही सुखासुखी मध्यस्ती तरी कां पत्करली असती? बरें, झाला तर मधुकरांचाच उपदेश हितपरिणामीं होणार आहे! मधुकर, आपण सुधाताईचें बोलणें लक्ष्यांत घेऊं नका. ( नोकर येतो. )

**रावबहादूरः**—( व्हिजिटिंग-कार्ड वाचून ) काय! भाऊराव पटवर्धन! डायरेक्टर 'विधवाश्रम'? वा! फारच दिवसांनीं हा गृहस्थ भेटतो आहे. ऐकलंत कां, मी जरा जाऊन येईपर्यंत आपण व मधुकर मिळून यांचें शान्तवन करा. हा मीं आलोंच. ( राव० जातात. )

**मधुकरः**—( स्वगत. ) काय बाबासाहेब गेले! ठिक झालें! आतां माझ्या बीजारोपणाला कितीसा अवधि लागणार? ( प्रगट. ) माईसाहेब, दिना-नाथ आणि सुधाताई या उभयतांच्या शान्तवनाची बिकट कामगिरी बाबा-

साहेबांनीं आमच्यावर सोंपविली नसती तर फार बरें झालें असतें; कारण मित्र-कर्त्तव्याच्या आड येणारा उद्दाम उर्मटपणा असा कारणाविना चाखण्याचा दुर्धर प्रसंग खास ओढवला नसता. खरेंच माईसाहेब, आपणासारख्या नूतन परिचिताला सुद्धां सुधाताईच्या कठोर शब्दांचा निषेध व्यक्त करणें जरूरीचें भासावें आणि तेच शब्द मला स्वतःच्या प्रतिबिंबाची उपमा देऊन मला स्वतःचा जिवलग मित्र ह्मणणाऱ्या माझ्या दिनानाथाला कर्णमधुर वाटावेत हें नवल नाहीं काय? असो; स्पष्टपणानें आजच दृगोचर होणारा हा सुधाताईचा प्रच्छन्न उर्मटपणा आणि तत्संबंधीं ही दिनानाथाची स्तब्ध बेफिकिरी हे दोन विषारी अंकुर आजच इतक्या जोरानें फोंफावून येण्याला त्यांच्या मूळाशीं कोणकोणत्या क्षुद्र भावनांचें खत आहे याचा आतां माझ्या डोक्यांत अगदीं लख्ख प्रकाश पडला!

**दिनानाथः**—कसला प्रकाश पडला? मधुकर, केवळ सात्विक क्रोधाच्या प्रेमळ उमाळ्याखेरीज याच्या मुळाशीं दुसरें तिसरें काय असणार? दुःखातिशयामुळें क्वचित् प्रसंगीं माझी जिव्हा जड पडल्यानें मला सुधाताईच्या कृत्याचा निषेध व्यक्त करतां आला नाहीं ह्मणजे तुझ्याविषयींचा माझा प्रेमा लुप्त झाला असें कसें ह्मणतां येईल? मधुकर, सांग, सांग कोणत्या क्षुद्र भावनांनीं तुझ्या डोक्यांत असा हा लख्ख प्रकाश पाडला!

**मधुकरः**—दिनानाथ, असल्या या मायावी मानभावी भाषणानें मीं आतां मोहून जाईन अशी कां तुझी कल्पना आहे? दुःखातिशयाच्या अभेद्य कवचाखालीं इतराकरवीं माझा करविलेला मानभंग मनोदायामुळें जरी मीं क्षणभर लक्ष्यांत घेतला नाहीं तरी त्याच अभेद्य कवचाखालीं पंख फुटतांच उपकारकर्त्याची आज्ञा धाब्यावर बसवून त्यानें केलेल्या जरठ-तरुणी-विवाहाची तुझी चालविलेली ही हास्यास्पद हेटाळणी त्याच्या सुशील आणि चतुर स्त्रीच्या लक्ष्यांत आली नसेल अशी कां तुझी समजूत आहे? दिनानाथ, एका सुंदर आणि निष्पाप बालिकेला तिचा सुरस संसार नीरस वाटूं लावण्यानें तुझा असा कोणता स्वार्थ साधला जाणार आहे हें त्या एकट्या परमेश्वरालाच माहीत!

**दिनानाथः**—अरेरे! मधुकर, कोण हा माझ्यावर व्यर्थ गहजब करतो आहेस! माईसाहेब, माझ्या डोळ्यांतून निघणारे हे पवित्र अश्रू मधुकर ह्मणतो तसल्या दरिद्री अंतःकरणाचे असावेत असें आपल्याला चुकून तरी वाटतें कां? आपल्या झालेल्या जरठ-तरुणी-विवाहाविषयीं मीं कितीही प्रतिकूल होतों किंवा असलों तरी त्याबद्दल एकट्या बाबासाहेबाखेरीज मला इतरांनां जबाबदार कसें धरतां येईल? शिवाय, त्या लग्नाचा निषेध व्यक्त करण्यासाठीं मला आईसाहेबांच्या स्मृति-शोकाचा पवित्र बुरखा पांघरण्याचें तरी-काय बरें प्रयोजन? मधुकर, माझ्या अश्रूंच्या पावित्र्याची जर तुला शंका येत असेल तर मीं आत्म-विश्वासाच्या सामर्थ्यावर तुला आग्रहानें निक्षून सांगतों, माझ्या कोणत्याही अश्रूचें तूं खुशाल पृथःकरण कर. त्यांतला प्रत्येक कण इतका तेजस्वी असेल कीं, त्यांत तुझें प्रतिबिंब तुझ्या स्वतःपेक्षां कितीतरी पटीनें खास उज्वल दिसेल! तें असो; पण माईसाहेब, मधुकरानें आपल्या स्वैर आणि स्वच्छंदी कल्पनेनें हवेंत रेखाटलेलें तें भयंकर संशय-पिशाच आपणाला चुकून सुद्धां भेडसावीत नाहीं ना? बोला, बोला माईसाहेब, खरेंच कां माझे अश्रू तसें पतित आहेत?

**लिला**:—असें मीं कसें ह्मणूं? झालेला एकंदर प्रकार लक्ष्यांत घेतां, दिनानाथ, तुमचे अश्रू पतित आहेत असें ह्मणण्याचें धाडस निदान माझ्याच्यानें तरी करवत नाहीं; तरीपण दिनानाथ, वस्तुस्थितीच्या योग्य परीक्षणाशिवाय याचें निश्चित उत्तर मला आतांच कसें देतां येईल?

**मधु**:—( स्वगत.) शेंपटीवरच निभावलें! ( प्रगट.) माईसाहेब, ज्यावेळीं बाबासाहेब येथून निघून गेले त्यावेळीं जर आपण त्यांचा चेहरा थोडा बारकाईने पाहिला असतां तर दिनानाथाच्या या प्रश्नाचें निश्चित उत्तर आतांच्या आतां—अगदीं याच क्षणीं—आपणाला सहज देतां आलें असतें; पण एकाअर्थी आपण त्याचा तो चिंताक्रान्त आणि दुःखी चेहरा पाहिला नाहीं हेंच बरें केलें!

( दीर्घ-उसासा. )

**दिना:**—अँ! हें काय? सुधाताई, हा पाहिलांत कां मधुकराचा म्लान चेहरा? ह्याचें हें अधोवदन आणि हे दीर्घ उसासे कशाचें बरें द्योतक असावेत? अथवा शंका तरी कशाला? अरेरे! खरेंच कां सुधाताई, त्यावेळीं बाबासाहेबांचा चेहरा मधुकर ह्मणतो तसा दुःखी कष्टी झाला असेल! शिव शिव! एकूण सुधाताई, आमच्या आवडत्या दिव्याचा शेवटीं असा विपरीत विपर्यास व्हावा ना? अरेरे! क्षणभर बाबासाहेबांची गोष्ट जरी बाजूला ठेवली तरी माईसाहेबांचें हें अर्धवट उत्तर तरी दुसरें काय सुचवितें? हेंच ना? माझ्या उभ्या आयुष्यांत आजच मधुकर मला इतक्या कडक शब्दांनीं संबोधितो तेव्हां तसलाच कांहीं तरी विपरीत प्रकार माझ्या हातून—नकळत कां होईना—पण घडत असला पाहिजे. अरेरे! एकूण मीं साऱ्यांच्या दुःखांना अप्रत्यक्ष ह्मणतां ह्मणतां प्रत्यक्षच कारणीभूत झालों ना? छे! पण असे निराश होऊन कसें चालेल? याचा खुलासा हा झालाच पाहिजे!

**सुधा:**—पण मीं ह्मणत्यें दिनानाथ, प्रामाणिक हेतूनें केलेल्या कोणत्याही दिव्याचा कितीही विपर्यास झाला तरी आत्म-समाधानाच्या जोरावर भावी आपत्तींशीं सहज झुंजतां येतें असें आपणच ना मला वरचेवर सांगत असतां? मग खुलाशाची ही वृथा खटपट कशाला? शिवाय, खुलासा जसा व्हावा तसा झाला तर ठीक; नाहीं तर, फट् ह्मणतां ब्रह्महत्या नाहीं कां घडायची?

**दिनानाथ:**—पण सुधाताई, खुलाशाची इच्छा करणें हें सुद्धां एक प्रामाणिक हेतूनेंच केलें जाणारें दिव्य आहे ना! मग आपली काल्पनिक भीति फोल नाहीं कां ठरत? शिवाय, माझ्या सारख्या आशावाद्याला कोणत्याही संदिग्ध गोष्टीची पूर्ण शहानिशा होईपर्यंत स्वस्थ कसें बसवेल? ( मधुकरास ) मधुकर?

**मधुकर:**—माझ्या लाडक्या मित्रा!

**दिनानाथ:**—तुझ्याच भाषेंत बोलायचे ह्मणजे माझी ही आचारक्रान्ति आजच इतक्या जोरानें फोंफावून येण्याला कोणतें कारण झालें ह्मणतोस?

मधुकर, सांग, सांग तें कारण; अशा या संकटपरंपरेला प्रसविणारें तें हिडीस कारण कितीही चामट आणि जबरदस्त असलें तरी मधुकर, स्वार्थाला लाथाडून केवळ स्वकियांच्या सुखासाठीं मला त्या अनिष्ट कारणाला नामोहरम हें केलेंच पाहिजे. सांग, सांग मधुकर, सांग तें कारण. कां? बोलत कां नाहींस?

**मधुकरः**—( स्वगत. ) मासा अखेरीस जाळ्यांत सांपडणार अं! (प्रगट. ) वेड्या! दिनानाथा, उच्चार आणि आचार यांच्यांत जर फरक नसतां तर नटांनां राजाश्रयाची काय जरूरी होती? अरे, ज्या कारणानें तुला तुझ्यां बरोबरीच्या अत्यंत जिवलग मित्राला पायांखालीं बेमुर्वत ठेंचण्याला शिकविलें, ज्या कारणानें तुला एखाद्या कृतघ्न मांगाप्रमाणें आपल्या उपकारकर्त्याच्या दयार्द्र अंतःकरणाला खोल आणि विषारी जखमा करण्यांत निपुण केलें, ज्या कारणानें तुला त्याच्या द्वितिय पत्नीच्या गोड संसाराच्या पहिल्याच घोटांत द्वेषाचें मीठ कालविण्यांत पटाईत केलें तें कारण अगदीं लेचेंपेंचें असेल असें कां दिनानाथ, तुला वाटतें? अरे वेड्या, त्या कारणाचें अस्तित्व नष्ट करणें तुझ्या आटोक्याबाहेरचें आहे, किंबहुना; तसें करणें तुला जवळ जवळ अशक्य आहे!

**दिनानाथः**—अशक्य? आणि तें या दिनानाथाला? मधुकर, हा माझ्या कर्तृत्वाचा धडधडीत अपमान आहे! इतक्या आपत्त्यांचें बिनधोक प्रदर्शन करणारें तें बेताल कारण कितीही छाकटें असलें तरी त्याचा तुझ्याकडून फक्त नामनिर्देश होतांक्षणींच तें अभद्र कारण हा लोक सोडून वर जातांनां तुला खात्रीनें दिसेल! ह्मणून ह्मणतों मधुकर, सांग, सांग लवकर तें अभद्र कारण! आणि तुझ्या वृथा भ्रमाचें एकदां कायमचें निरसन करून घे.

**मधुकरः**—दिनानाथ, तूं ह्मणतोस त्याप्रमाणें तें कारण खरोखरच मोठें बेताल छाटकें आणि जबरदस्त चामट आहे! तें इतकें चामट आहे कीं, लवकर मरतां मरायचें नाहीं, तें इतकें जबरदस्त मोठें आहे कीं, तें तुझ्या हातांत सहजीं सांपडणें शक्यच नाहीं; अरे, तें इतकें छाकटें आहे कीं,

एखाद्या पदवीधराची विद्वत्ता त्यानें स्वतः मापली असेल आणि त्याच्या वेताल-पणा विषयीं म्हणशील तर त्याच्या जन्माला मुळीं धरबंध तो कसलाच नाहीं! अशा त्या कारणाची गळेचेपी करण्याच्या इराद्यानें जाणारा कसलाही मारेकरी त्याचा तो स्वयंसिद्ध गंभीर चेहेरा पाहतांच मनांतल्या मनांत शरमून जाऊन, शिरच्छेदासाठीं उचललेल्या हातांनींच त्या कारणाला हृदयाशीं कवटाळून उलट त्याच्या सहवासाची इच्छा करतो! मग दिनानाथ, त्याच्या मरणाची दिल्ली तर बहोत दूरच राहिली! म्हणून म्हणतों, आधीं या गोष्टींचा पुरता विचार कर आणि मग त्याच्या नाशाचें दिव्य करण्याचा चंग बांध!

**दिनानाथ:**—मधुकर, स्वकीयांच्या सुखासाठीं आणि॰ आप्तेष्टांच्या स्वास्थ्यासाठीं मला तें अपूर्व दिव्य कितीही बिकट असलें तरी केलें हें पाहिजेच. सुंदर प्रेम प्रकाशाऐवजीं मत्सराच्या विषारी ज्वाला सोडणारा दीप कितीही मोहक असला तरी कर्त्तव्यनिष्ठतेच्या फुंकाऱ्यानें तो वेळींच मालविला पाहिजे. असें करतांनां सौंदर्यवाद्यांनीं मला कितीही अरसिक ठरविलें तरी मधुकर, तो शीलाचा सर्वेश्वर माझ्या सदिच्छेबद्दल समाधानाचें पारितोषक देऊन माझा खास गौरवच करील! मधुकर, सांग, सांग, सांग लवकर तें कारण. कां असा खिन्न कां दिसतोस? मधुकर, माझ्या कर्तृत्वाची तुला शंका कां येते? तसें असेल तर तो पहा! तो पहा! येथून या समोरच्या खिडकींतून दिसणारा तो आईसाहेबांचा रम्य पुतळा पहा! त्या पुतळ्याच्या दिव्य आणि पवित्र तेजाची—श- -प- -थ.

**सुधा:**—हां! थांबा. थांबा दिनानाथ, अविचाराचा शेवट नेहमीं पश्चातापांत होतो म्हणतात म्हणून म्हणत्यें, याचा पुरता विचार केल्याविना आपण शपथेची अशी गडबड करूं नये!

**दिनानाथ:**—सुधाताई, हा माझा मधुकर मला अविचाराच्या खोल डोहांत ढकलेल हें मुळीं संभवतच नाहीं! सुधाताई, बोललों तर आपणाला राग नाहींना येणार? असला हा आत्मघातकी मित्रद्रोह व्यक्त करून आपण या माझ्या मधुकराचे मृदु मनोविकार मात्र व्यर्थ दुखविलेत. सर्वच वेळीं

स्वतांचीं मतें बरोबर असतातच्च असें नसल्यामुळें कधीं कधीं इतरांचींही मतें जसेस धरावीं लागतात ना? सुधाताई, निर्हेतुक प्रेमतारूंची अफाट लोकसागरांत कितीही दिशाभूल झाली तरी भावीध्येयाप्रत पोंचविणारें शीलाचें होकायंत्र सुव्यवस्थित असेतोंपर्यंत लोकसागराच्या उन्मत आणि बेफाम गर्जनची कोण पर्वा करणार? मधुकर, सांग, सांग कुठें आहे तें साऱ्या आपत्यांचें कारण? मला त्याचा समूळ उच्छेद करूं दे!

**मधुकरः**—दिनानाथ, तुझी तयारीच असेल तर तें पहा-तें पहा—साऱ्या दुःखाचे तें अभद्र कारण तुझ्या स्वतःच्याच हातांत आहे!

**सुधा व लिलाः**—काय? स्वतःच्याच हातांत! काय! हें शिफारस पत्र?

**दिनाः**—काय? हें विश्वविद्यालयाचें शिफारस पत्र! काय? हें बी. ए. चें सर्टिफिकेट? अरेरे! कोण कोती कल्पना ही! मधुकर, हेंच कां साऱ्या आपत्यांचें मूळ कारण! मत्सराचे विषारी फुत्कार सोडणाऱ्या अहंमन्य कागदाच्या निर्जीव चिटोऱ्या, मीं तुझे अस्सें अस्सें तुकडे तुकडे करून हे पहा हवेंत फेंकून सुद्धां दिले. (फाडतो. विद्यादेवी-दर्शन) विद्यादेवी, केवळ स्वकीयांच्या सुखाकरतां मीं तुझ्या पवित्र अलंकाराचा हा जो निष्ठुर उपमर्द केला त्या घोर अपराधाबद्दल या तुझ्या सत्यप्रिय दिनानाथाला क्षमा कर!

**पडदा.**

# प्रवेश २ रा.

**स्थळः—रस्ता.**

**सत्यव्रतः**—( स्वगत. ) हे हतभागी भारतवर्षा, तुझी ही योगनिद्रा संपणार तरी केव्हां? काळाच्या अजस्त्र जबड्यांतून तुला वांचविण्यांत त्या दयाघनाचा काय हेतू असेल तो असो; पण दुर्दैवी आर्यावर्ता, सामाजिक

रूढींच्या अन्यायी जुलमांखालीं दडपून गेलेल्या तुझ्या दीन लेकरांचा हृदयस्पर्शी आर्तस्वर मात्र खचित खचित चिन्ताजनक आहे! हटयोग्या, आंवर, आंवर ही तुझी योगनिद्रा; आणि डोळे उघडून या प्रचलित अन्यायांचें एकदां तरी अवलोकन कर! तुझ्या गतवैभवाचें अगर पराक्रमाचें स्मरण करणें तुला लांछनास्पद वाटत असेल तर महाभाग हिंदुस्थाना, तुझ्या बरोबरीच्या किंबहुना तुझ्या मागून जन्मास आलेल्या इतर राष्ट्रांची उन्नति ध्यानांत घे; आणि अधोगतीच्या या अमंगल खातेऱ्यांत खिचपत पडण्याचें निदान आतां तरी सोडून दे. ऊठ, ऊठ अभाग्या ऊठ. अरे, तुझा उज्वल देशाभिमान! तुझी अपूर्व बुद्धिमत्ता! तुझें अस्खलित वक्तृत्व! या तुझ्या साऱ्या जन्मसिद्ध हक्कांची आजच राखरांगोळी झाली काय? गतवैभवा, स्वातंत्र्याच्या या रम्य प्रभातकालीं सुधारणा-रवीच्या पवित्र आणि कोमल किरणांचा आश्रय करून सौख्यप्रद प्रगतीचा मार्ग शोधून काढ; आणि अज्ञानाच्या या खोल गर्तेला कायमचा रामराम ठोकून स्वतःच्या कर्तबगारीनें आपल्या अस्तित्वाची जाणीव इतरांनां करून दे. अरेरे! पण मी तुला तरी काय ह्मणून दोष द्यावा! जेथें बौद्धिक मंदिरांतील सत्याच्या तेजस्वी दीप बेदरकार मालविला जातो! जेथें समाजांतील धनिक शास्त्र्यांच्या जुलमी आणि अन्यायी वर्तनाकडे जाणून बुजून दुर्लक्ष्य केलें जातें! सुंदर धर्मतत्वांनां पायांखालीं बिनदिक्कत तुडवून अहितकारक आणि अधोगामी रूढींचा केवळ प्राचीनत्वामुळें पुरस्कार केला जातो! जेथें उच्चार आणि आचार यांची कायमची फारकत झालेली असते! जेथें प्रेम आणि परोपकार यांच्या जागा मत्सर आणि स्वार्थ पटकावतात तेथें—त्या देशाची—उन्नति केव्हांतरी होईल हें संभवतें तरी कसें? अरेरे! प्रगतीची अशी चोहोंकडून नाकेबंदी झाल्यावर तें मरणोन्मुख राष्ट्र कितीही कार्यक्षम आणि प्रतिभाशाली असलें ह्मणून काय झालें! त्याला तो स्वातंत्र्याचा सुवर्ण-दिन कसा दिसणार? माझ्या प्रियजन्मदात्या भरतखंडा, सात्विक रागाच्या प्रेमळ आवेशांत माझ्याकडून साहजिक निघालेल्या अपशब्दाबद्दल या तुझ्या सत्यव्रताला क्षमा कर. प्रगतीच्या मार्गांतले हे समाजकंटक कायमचे दूर

केल्याशिवाय राष्ट्रोन्नति होणें शक्यच नाहीं. असले विचार डोक्यांत घोळूं लागले ह्मणजे हृदयांत कोण कालवाकालव सुरूं होते! नाही नाही ते विचार सुरूं होऊन संशयाचें एकच वादळ उत्पन्न होते—अरे पण विचारांच्या नादांत मीं कोठें आलों? ( रिस्टवॉच पाहून ) ओ, लो! काय टेन थर्टी? छ! आतां कॉलेजला गेलेंच पाहिजे! ( जातो. )

पडदा.

## प्रवेश ३ रा.

स्थळः— लिलेचा दिवाणखाना.

**लिलाः**—( स्वगत. ) खरेंच वेडे कोण? दिनानाथ कां मधुकर? स्वकीयांच्या सुखासाठीं आणि शीलाच्या संवर्धनासाठीं स्वतःच्या सुखाचा स्वेच्छेनें संन्यास करणारे दिनानाथ वेडे? कां एका निष्पाप बालिकेच्या मृदु-मनोविकारांची मनोभावानें जोपासना करतां यावी, ह्मणून जीवाच्या जीवलग मित्राला अहंकाराचें विषारी मूळ प्रामाणिकपणानें वेळींच दाखविणारे मधुकर वेडे? छे! कांहींच समजत नाहीं! पुन्हां येथेंही निराशाच व्हावें लागतें! खरेंच, कालचा तो दिनानाथांचा अद्वितीय स्वार्थ—संन्यास लक्षांत येतांच-अगबाई! हे पहा माझ्या अंगावर प्रेमाचे शहारेसुद्धां आले!-खात्रीनें असें वाटूं लागतें कीं, जगांतील यच्चयावत् ताठर तरुणांचें ताजें आणि सळसळणारें रक्त केवळ प्रेमाकरितां वाटेल तसलें बिकट दिव्य करण्यास अगदीं एका पायांवर तयार होईल! माझ्या विवाहाला आणि तसेंच तिकडच्या सुवर्णदिन-समारंभाला हजर न राहण्यांत, मधुकरांच्या सांगण्याप्रमाणें दिनानाथांचा कोणताही नीच हेतू असला तरी त्यांच्या विचार-सरणीच्या प्रामाणिक आर-शांत मला तिकडचें स्वरूप खरोखरच भेसूर आणि विश्वासघातकी दिसलें यांत मला बिलकूल शंका नाहीं. इश्श! पण आधीं हे पापी विचार माझ्या

डोक्यांत कशाला बरें आले? लिले! देव, अग्नि आणि ब्राह्मण यांच्या समक्ष वरलेल्या एका सद्गृहस्थाची तूं विवाहित पत्नी ना? मग असले हे विचार कितीही सूर्य-प्रकाशाहून स्वच्छ असले तरी केवळ धर्माज्ञेकरतां ह्मणून त्यांच्याकडे कानाडोळा करावयास नको काय? काय धर्माज्ञा! पैशाच्या लोभानें बाबांनीं केलेल्या पैशाचिक अविचाराबद्दल मला काय ह्मणून धर्माज्ञेच्या प्रायश्चित्ताचा विनाकारण भुर्दंड! एकाच्या प्रमादाबद्दल दुसऱ्याला जबाबदार धरणारा धर्म, मुळीं तो धर्मच नसून खऱ्या धर्माचा तो निव्वळ उपहास आहे. समाजाच्या मदांध शास्त्र्यांनों, हाच का तुमचा सामाजिक न्याय!

**सुधाः**—( ' वज्राघाता ' च्या, अंकासह प्र० क० ) बाई, बाई, बाई आतां मात्र मधुकराच्या दरिद्री मनोवृत्तीची अगदीं शर्थ झाली! माई, हा पाहिलांत कां ' वज्राघाताचा ' अंक? आजच्या या अंकांत ' वाङ्मय विहार मंडळाच्या ' विद्यमानें भग्नदत्तांनें बोलावलेल्या जाहीरसभेची ही पाहिलीत कां आमंत्रण-पत्रिका?

**लिलाः**—(वाचून.) काय! श्रीसरस्वती-देवीच्या भूषण-भंगाबद्दल निषेध प्रदर्शक जंगी जाहिर सभा! आणि तिचे मधुकर अध्यक्ष? छे! सुधाताई, मला हें कांहीं केल्या खरेंच वाटत नाहीं. अशा थराला गोष्ट जाऊं देण्याइतके मधुकर नीच आणि कपटी कसे असू शकतील?

**सुधाः**—कसे असूं शकतील! माई, हा आपला वृथा भ्रम आहे. सडलेल्या अंतःकरणाची विखारी दुर्गंधी रसनेच्या गोड वळगानें येतांना साध्या डोळ्यांना सहज समजती तर हा संकटांचा गुणाकार तरी कशाला होता! माई, माणसें असतात तशी दिसती तर मोठी बहार झाली असती.

**लिलाः**—ह्मणजे! कालची मधुकरांची शांतता केवळ नकली होती असेंचना तुझें ह्मणणें?

**सुधाः**—अजूनही आपण साशंकच अँ! माई, समुद्र-तीरावर बसणाऱ्या संन्यस्त बकयोग्याचें विरक्त मौन, मौन नसून स्वतःचा तांळिराम

शांत करण्यापूर्वीचा त्याचा तो क्रूर समाधि असतो. उदारमतवादी दिनानाथांनां फसगमतीनें फसवून अविचाराला प्रवृत्त करणारा खुनशी मधुकर जेव्हां आपण होऊनच त्या करवलेल्या कृत्याचा भोजवारा उडवून निषेधाची नेभळी पिंपाणी फुंकण्याचा हास्यास्पद प्रयत्न करतो, तेव्हां त्याच्या ह्या इरसाल कुटिलतेस ह्मणावें तरी काय? माई, अशा प्राण्यांचा सवता सुभा उभारण्याच्या बाबतींत ‘ भर्तृहरी ’सारख्या विद्वानाला देखील हात टेंकावें लागून ‘ ते के न जानीमहे ’ असेच निराशेचे उद्गारअखेरीस त्याला काढावे लागलेच ना?

**लिला:**—पण सुधाताई, क्षणभर मधुकरांचें एक राहो पण या ‘ वाङ्मय विहार-मंडळाला ’ ही रिकामी उठाठेव पाहिजे होती कशाला? घरगुती बाबींची जाहीर चर्चा करतांनां तिच्या चालकांनां थोडी तरी शरम वाटावयाला पाहिजे होती ना?

**सुधा:**—माई हें ‘ वाङ्मय विहार मंडळ ’ हें एक मधुकराच्या ताटा खालचें स्वार्थी-मांजर आहे. दिनानाथांच्या कविता प्रसिद्ध करणाऱ्या ‘ काव्य-चंद्रिके ’ ला हाणून पाडण्याकारितां मधुकराच्या खास गुप्त आश्रयाखालीं स्थापन झालेला तो एक सरस्वती-देवीच्या फाजील लाडक्या भक्तांचा अत्यंत निद्य कुटाळखाना आहे. माई, आपल्या लग्नाचा अंतरपाट धरणारे जाडे विद्वान आणि पूर्ण निरिच्छ भिक्षुक—भग्नदंत आणि तीर्यक—हे त्या संस्थेचें चिटणीस-द्वय आहे मग माई, इतका उल्हास हजर असतांनां, एका संभावित गृहस्थाच्या दिवाणखान्यांत घडलेल्या अगदीं खासगी गोष्टीचा असा जाहीर फाल्गुनमास करण्यास अशा गृहस्थांनां शरम ती कसली वाटणार?

**लिला:**—पण सुधाताई, जाहीर सभेंत स्वतः प्रतिपादन केलेलीं मतें पाळण्याची जबाबदारी, मी ह्मणतें हे वक्ते विसरतात तरी कसें?

**सुधा:**—कारण, प्रतिपादन केलेलीं मतें त्यांचीं स्वतःचीं नसतात ह्मणून! असलीं मतें बहुधा रुपयांच्या मर्यादित गोल वर्तुलांत स्थल-कालाला न जुमानतां वाटेल तितकीं जन्माला येतात. रौप्य-नादाची चंचल लहर डोळ्यांत भरतांच अंधपणानें स्वतःच्या मताचा जाहीर लिलांव पुकारणारे

पाजी सभाधीट जोंपर्यंत समाजांत लब्ध-प्रतिष्ठितपणानें वावरतांना आढळतात तोंपर्यंत त्या समाजाच्या रोगाचें अचुक निदान कोणत्या धन्वंतराला करतां येईल!

**लिलाः**—सुधाताई, मला वाटतें, मधुकरांना तिकडून सांगणें झालें तर कदाचित् मधुकर उद्यांच्या सभेला हजर राहणार नाहींत. कारण तिकडचें तसेंच त्यांच्यावर अप्रतिम प्रेमामुळें अकल्पित वजन आहे. निदान प्रेमाखातर ह्मणून तरी मधुकर सभेला हजर राहण्याची चूक करणार नाहींत.

**सुधाः**—माई, ही गोष्टच आपण सोडून बोला. हा उन्मत्त आणि धनांध मधुकर बाबांच्या इच्छेला मान देईल असें आपल्याला वाटतें तरी कसें? शिवाय माई, बोललें तर आपण मला पितृद्रोही ह्मणाल—सरकारची 'सर' की मिळविण्याच्या बाबतींत स्वतः बाबा मधुकराचे मिंधे असल्यामुळें त्यांना मधुकराला या गोष्टीपासून परावृत्त करण्याचें धाडस होईल किंवा नाहीं याची मला शंकाच आहे.

**लिला**—तिकडून मिंधे! आणि ते मधुकराचे? हा काय घोंटाळा आहे सुधाताई?

**मधुकरः**—(एकदम प्र० क०) घोंटाळा? माईसाहेब, कसला घोंटाळा?

**सुधाः**—कोण! मधुकर! मधुकर, खासें, खासें प्रदर्शन केलेंत बरें आपल्या नादान मनोवृत्तीचें! माई, मधुकराला पहातांक्षणींच माझ्या मस्त-कांत तिडीक अशी ही एकाएकींच कां बरें उठावी? छे! छे! माई ह्या असह्य मस्तक-शूलामुळें मला कांहींच सुचत नाहीं. (रुमालानें कपाळ घट्ट धरते.) माई, अशा स्थितींत मला येथें क्षणभरही राहवत नाहीं. एकांत-वासाची मला अत्यंत जरूरी आहे. येतें मी. (जाते.)

**मधुकरः**—(स्वगत.) बेजबाबदार उर्मट पोरी, ठीक आहे! (सचिंत.)

**लिलाः**—मधुकर, तुह्मीं आज असें चिंताक्रांत कां दिसतां? असें व्हायला झालें तरी काय?

**मधुकरः**—झालें काय! आतां काय व्हावयाचें राहिलें आहे माई-साहेब! असह्य लोकनिंदेचे दारुण आघात सहन करण्यापेक्षां, वंगदेशीय स्नेहलतेच्या सुंदर कल्पनेप्रमाणें जल, विष किंवा अग्नि यांपैकीं कोणत्या तरी एका साधनानें ही जीवाची जीवित-यात्रा संपविलेली, मीं ह्मणतों, काय वाईट? कृत्याच्या मूळ उद्देशाकडे—मग तो कितीही उदात्त आणि स्पृहणीय असला तरी त्याच्याकडे—चुकून सुद्धां ढुंकून न पाहणाऱ्या या बेमुर्वत आणि हट्टी जगांत जीवाचें कितीहि रान केलें तरी त्याचा काय उपयोग होणार आहे? पण फार लांब कशाला! माईसाहेब, कालचीच गोष्ट घ्याना. आपल्या-सारख्या कोमल स्त्रीचे नाजूक मनोविकार दुखावले जाऊं नयेत या एकाच उदात्त उद्देशानें मी केलेल्या कानउघाडणीचा परिणाम दिनानाथानें स्वतःचें सर्टिफिकेट स्वेच्छेनें फाडण्यांत केला! आणि त्याच्या या वेडसर आणि अदुर-दृष्टी कृत्याबद्दल लोकांनीं मला जबाबदार धरावें, हें थोडेसें विसंगत नाहीं कां दिसत?

**लिलाः**—मधुकर, पण तुह्मीं तो वादविवाद सर्टिफिकेट फाडण्याच्या थरापर्यंत न्यावयाला नको होता असें बरीक इतरांप्रमाणें मलाही अझून वाटतें.

**मधुकरः**—माईसाहेब, आतां आपणच सांगा, सहजासहजीं बंद पड-लेल्या विषयाचें पुन्हां चर्वितचर्वण करण्याची ही खांजवून खरूज कोणीं उपस्थित केली? मी कां दिनानाथानें? शिवाय, माझ्या प्रामाणिक मताची मागणी करण्याला मी आपण होऊन कां त्याला तसें सांगितलें होतें? माईसाहेब, तें कांहीं नाहीं. जेथें दैवानेंच पूर्ण दावा साधला तेथें इतरांना बोल लावण्यांत तरी काय हांशिल?

**लिलाः**—पण मधुकर, मला आधीं असें सांगा कीं, तिकडच्या दिवाणखान्यांत, नव्हे अगदीं चार भिंतीच्या आंत, घडलेला हा खासगी प्रकार, मीं ह्मणतें, तुमच्या त्या 'वाङ्मय विहारमंडळा' ला आधीं कळला तरी कसा? त्यावेळीं तुह्मीं, मी आणि सुधाताई याखेरीज दुसरें तिसरें कोणीही नसतां या प्रकाराचा, एवढा गाजावाजा होतो याचें तुह्माला माझ्याप्रमाणें आश्चर्य नाहीं वाटत?

**मधुकरः**—आश्चर्य! यांत माईसाहेब आश्चर्य तें कसलें? दिनानाथानें दुबळ्या सर्टिफिकेटचे निर्दयपणानें तुकडे करून ते खिडकींतून उन्मत्तपणानें हवेंत फेकून दिल्यानंतर ते तुकडे ध्रुवाच्या अढळ ताऱ्याप्रमाणें हवेंत अधांतरी लटकण्याला, माईसाहेब, त्या बिचाऱ्या निर्जीव तुकड्यांचें तितकें तपःसामर्थ्य आहे कोठें? हवेंत तरंगणाऱ्या कोणत्याही परिमाणूला स्वतःकडे खेंचून घेण्याच्या पृथ्वीच्या नैसर्गिक शक्तीला इतरांप्रमाणें दिनानाथाच्या पक्षपाताचें अंध अनुकरण करण्याचें तिला काय बरें प्रयोजन? अशा रीतीनें पोटावर मारल्यामुळें पृथ्वीच्या पाठीवर उघडे पडलेले ते बहिष्कृत आणि बेवारसी तुकडे पायांखालीं ठेंचले जातांना पाहतांच भग्नदंतासारख्या तत्व-प्रिय माणसाला त्यांची दया आली आणि खरा खूनी हुडकून काढून त्याच्या त्या खुनशी कृत्याचा प्रामाणिक निषेध करण्याकरितां त्यानें सभा बोलावली यांत, माईसाहेब, भग्नदंत अपराधी कसा ठरतो हेंच माझ्या अल्पमतीला कळत नाहीं!

**लिलाः**—पण असें आधीं ह्मणतें कोण? तें राहूं द्या, पण मधुकर, बरोबरीच्या मित्राची बेअब्रू उघड्या कांनांनीं ऐकण्याचा दुर्धर प्रसंग कोणालाही केव्हांही प्रिय असणार नाहीं हें अगदीं उघड आहे ना? मग आपण उद्यांच्या सभेचें अध्यक्ष-स्थान पत्करण्याचें कबूल कसें केलें? आपल्या समत्तीशिवाय कां ह्या 'वाङ्मय विहारमंडळा' च्या सेक्रेटरींनीं आपलें नांव अध्यक्ष ह्मणून प्रसिद्ध केलें? शिवाय दुसरें आह्माला सांगोवांगी असें कळलें कीं, त्या तुमच्या 'वाङ्मय विहारमंडळा' चें ह्मणें, समाजांत तसेंच विशेष वजन आहे असेंही नाहीं.

**मधुकरः**—छे! छे! माईसाहेब असें कसें होईल? दिनानाथाच्या एकट्या एकनिष्ठ अनुयायाखेरीज असलें विधान करण्याचें कोण धाडस करील? माईसाहेब, खुद्द बाबासाहेब हे स्वतः त्या संस्थेचे पेट्रन आहेत ही एकच गोष्ट आपली ही अस्थानीं शंका निरसन होण्याला पुरेशी आहे. आतां माझ्या अध्यक्ष-पदाविषयीं ह्मणाल, तर माईसाहेब, अशा या कसोटीच्या प्रसंगीं केवळ तत्वाकरितां ह्मणून मला हे सारे खासगी नाजुक संबंध क्षणभर

विसरून निष्ठुर झालेंच पाहिजे. असें करतांनां मला कोण यम-यातना होतात हें त्या एकट्या परमेश्वरालाच माहीत. असो! नशीब आमच्या लोक-नियुक्त पुढाऱ्यांचें!

**लिला:**—एकूण काय मधुकर, अद्याप दिनानाथांचें खडतर दैव संपलें नाहीं असेंच कां ह्मणाना? मधुकर, शपथपूर्वक सांगतें, मला त्यांच्या केवीलवाण्या स्थितीची खरोखरच कींव येते पण तिचा काय उपयोग? अघटित घटनापटो दैव-दुर्विपाका, झाले एवढे दिनानाथांचे सोहाळे तुला पुरे नाहीं कां झाले? मधुकर, अशा वेळीं दिनानाथांनां एकट्या परमेश्वरा-खेरीज दुसरा कोण सांभाळणार?

**नोकर:**—( प्र० क० ) माईसाहेब, बाबासाहेब आपणाला वर बोलावताहेत.

**मधुकर:**—बरें आहे माईसाहेब, माझाही वेळ बराच गेला तेव्हां ह्मणतों मीही आपली आतां रजा घेतों.

( लिला व नोकर जातात व मधुकर पुढें आल्यावर मागें पडदा पडतो.)

**मधुकर:**—फाटक्या सुधारकाच्या फाजील लाडांत वाढलेल्या पांढऱ्या पायाच्या कपाळकरंटे सुधे, माझ्या दर्शनानें तुझ्या त्या अभद्र आणि बेवारसी कपाळाची तिडीक उठली अँ! तसेंच, त्या चवचाल सुधेचें अंध अनुकरण करूं पाहणाऱ्या वेडसर आणि मूर्ख लिले, तुला सुद्धां त्या दरिद्री दिनानाथाच्या केवीलवाण्या स्थितीची अद्याप किंवच येते अँ! उर्मट आणि अजाण पोरींनों, तुह्मांला या मानी मधुकराच्या प्रखर क्रोधाग्नीची काय कल्पना असणार? माझ्या तप्त डोळ्यांतून निघणाऱ्या कोणत्याही प्रखर ठिणगीचा कसलाहि कण, निरुपद्रवी मदनाला जाळणाऱ्या त्या नेभळ्या पशुपती-सारख्या शेंकडों जोगड्यांनां फक्त एकाच निमिषार्धांत खात्रीनें बेचिराख करून सोडील. अरे! पण या वेळीं आकाशांत हें कसलें दृश्य? कामातुर तारकांनों! या तुमच्या मधून मधून मिचकावण्याचा अर्थ या मानी मधु-कराला कळत नसेल अशी कां तुमची वेडी समजूत आहे? अल्लड दिवट्यांनों!

इतक्यांतच असा उल्लू बनूं नका. निराधार विधवेच्या पांढऱ्या फटफटीत कपाळाला लाजविणारा हा तुमचा पर-प्रकाशित दरिद्री चंद्र, आणि त्याच्या मधु-मीलनासाठीं अत्यंत थिल्लर झालेल्या तुह्मीं स्वतः, यांच्यामध्यें हा केवढा असुरी कृष्ण-मेघ उभा आहे याची तुमच्या अदूर दृष्टीला थोडी तरी कल्पना आहे काय? या सामर्थ्यवान मेघाच्या अवाढव्य कृष्ण-पटलांत हा तुमचा निस्तेज आणि नादान चंद्र एकदां कायमचा गुरफटून गेल्यानंतर, सहाय्याकरितां यमधर्माला ठोकली जाणारी त्याची शेवटची कर्कश किंकाळी, तुमच्या नाजुक कर्णरंध्रांत शिरतांच, तुह्मीं असाच नंगानाच घालाल कीं नाहीं याची मला शंकाच आहे! प्रियकराच्या भावी निराशेचें दैन्य ध्यानांत येतांच, भीतीनें तुह्मीं लटलट कांपत असतांनां, उनाड तारकांनों! तुमच्या शरिराचा तोल जाऊन तुह्मीं पदभ्रष्ट होत असतांनां पाहणें, ही एकच गोष्ट आतां या मानी मधुकराच्या मनाची करमणूक होऊन बसली आहे. ( जातो. )

पडदा.

## प्रवेश ४ था.

स्थळः—भ्रमरदंताच्या घराची पडवी.

पात्रेंः—भ्रमरदंत व लघुनासिका.

**भ्रमरदंतः**—ये, ये, लघुनासिके, अशी जवळ ये. हं इतकें कांहीं लाजायला नको. अग! हा काळ आतां कांहीं संकुचित प्रेमाचा नाहीं तर उलट प्रेमविकासाचा आहे प्रेमविकासाचा बरें!

**लघुनासिकाः**—बरें! बरें अँ! लाजायला माझें अडलें आहे खेटर! जसा हा काळ प्रेमविकासाचा आहे तसा तो मतस्वातंत्र्याचाही आहे. हें पहा! मला वाटलें तर मीं येईन नाहींतर इथें मी पुस्तक वाचीत अशी उभी राहीन.

**भग्नदंतः**—छे! छे! लघुनासिके, इथें तूं चुकते आहेस. अग पाण्यांतच राहून माशांशीं वैर काय बरें कामाचें? हें पहा, सृष्टींतच असें बाजूला राहून तिच्या एका सुवासिक आणि कल्याणप्रद मानवी-पुष्पानें प्रेमाचा आलवा हजर असतां असें हट्टीपणानें सुकून जाणें ह्मणजे त्या सृष्टि-देवतेचा भयंकर अपमान करण्यासारखें आहे! शिवाय हें पहा, या आकाशाच्या मंडपांत हे उडुगण कसे जोडीनें पिंगा घालित आहेत. तशाच या तारका! यासुद्धां ह्या प्रेमळ चंद्राला पाहून अनुरागानें वेड्या झाल्यामुळें या पहा अगदीं जवळ जाऊन त्याला बिलगल्यासुद्धां! (जवळ जातो.) अहाहा! याचें नांव मनोधैर्य! नाहींतर तूं! अजून दूरच ना उभी? मूर्ख! वेडी! अगदींच अपक्व! खरेंच लघुनासिके, तुला प्रेमाची खरी किंमत कळतच नाहीं. अग, प्रेम ही एक स्वर्गीय देणगी आहे! वेड! तिचा असा अनादर करूं नये.

**लघुनासिका:**—हें पहा! तुह्मीं माझा असा छळ आणखी किती दिवस करीत राहणार? अशा या ह्यातारपणीं निदान जनाची नाहीं तरी मनाची तरी मेली लाज वाटावला पाहिजे होती! लग्नापूर्वी आपल्या स्वभावाची मला जर अंधुक कल्पना असती तर आपले हे असे प्रेमाचे वेडेचार पाहण्याचें पाप निदान माझ्या नशीबीं तरी आलें नसतें. लग्नांत बाबांनीं आपल्या पैशाच्या थैलीबरोबरच माझेंही तोंड असें कायमचें बंद केलें!

**भग्नदंतः**--नुसतें तोंडच बंद केलें ना? पाय नाहींना बंद केले? मग अशी पुढें ये पाहूं! ह्मणजे माझ्या अधरामृताच्या एकाच संजीवनी-झटक्यानें तुझें तें बंद पडलेलें तोंड एकदम उघडें करून शिवाय हांसरेंही करून देतों. हो! अग! मुक्या तोंडाला वाचाळ बनविण्याचें सामर्थ्य एकट्या परमेश्वरांतच नसून त्याच्या विविक्षित अंशांतही असूं शकतें. वेडे लघुनासिके! तुला माझ्या शक्तीची कल्पनाही नाहीं. लोकसंख्येंत स्वतःच्या सामर्थ्यानें भर टाकून आमच्या दयाळू साम्राज्य-सरकारच्या सुबत्तेची ग्वाही फिरवण्याचा पहिला मान सांप्रत तुझ्यापुढें उभा असलेल्या याच हिंद-पुत्राला होता! ब्रह्मदेवाच्या मांडीला मांडी ठोकून बसणाऱ्या या आर्य-पुत्राचा तो विजयी सन्मान त्या नतद्रष्ट काळाला कां खपला नाहीं हा प्रश्न अगदींच अलाहिदा आहे!

**लघुनासिका:**—आणि तसाच तो मलाही खपणार नाहीं! काय बाई त्रास हा! लग्नानंतर प्रथम प्रथम स्वभाव कसा अगदीं शान्त होता!

**भग्नदंत:**—हो कबूल, आणि मीं तरी कुठं नाकबूल जातो आहे? पण वेडे! वयाच्या वाढीबरोबर स्वभावाचा साधेपणा बदलत जातो ही साधी गोष्टसुद्धां तुला कळूं नये अँ! मूर्ख! अगदींच अजाण! अग, माझ्या लहानपणीं शेजारच्या स्त्रिया मला डोकीवर घेऊन नाचत होत्या नाचत! पण आतां तसें कुठें आहे! अग! हा कालमहिमा आहे! असें हें चालायचेंच! मनुष्याच्या शरिरांतील परिमाणू प्रत्येक सात वर्षांनीं बदलतात असें खुद्द स्वामी रामतीर्थ आपल्या एका व्याख्यानांत ह्मणतात! इतकेंच नव्हे तर, अलिकडचे हे बेट उत्क्रांति-तत्त्ववेत्ते तर ही सृष्टि दर सेकंदाला बदलते ह्मणतात! पण लघु-नासिके! याचा प्रत्यय मला कांहीं निराळाच पटतो आहे! कारण, अजूनही तूं तेथेंच उभी!

**लघुनासिका:**—यांत आश्चर्याचें काय कारण? समान वेगानें धांव-णाऱ्या दोन वस्तूंमधील मूळचें अन्तर केव्हांही कायम राहणारच!

**भग्नदंत:**—कबूल! पण हीं अगदीं एकमेकांच्या विरुद्ध दिशेला अस-लली तोंडें आतां एकमेकांत मिसळायला काय बरें हरकत आहे? कां लघुना-सिके, कांहीं काल मी माझ्या पायाचा वेग बंद करूं ह्मणजे तसें घडून येईल!

**लघुनासिका:**—पायाचा वेग बंद करण्यापेक्षां आधीं हा तुमच्या मोकाट जीभेचा पट्टा आंवरा! शिवाय, तुमच्या उत्क्रांति-तत्वाप्रमाणें गेल्या-पांच सहा महिन्यांच्या बऱ्या अवधींत तुमच्या स्वभावांत फारच मोठा फरक व्हावयाला पाहिजे होता! इतर कोणताही महत्वाचा फरक दिसून येण्यापूर्वी, पहिल्यानें हे तुमचे मुळचेच लांबलेले कान आणि ही सारखी वटवट करणारी बेताल जीभ निदान आतां तरी मर्यादेंत यायला पाहिजे होती! बाई! बाई! बाई! कोण मेला त्रास हा! ऐकलंत कां? मला असा निष्कारण त्रास जर द्याल तर किनई मी आपली जीभ हांसडून प्राण देईन! त्रासाला जरी झाली तरी मेली कांहीं तरी मर्यादा ही असतेच!

**भग्नदंतः**—वेडी! मूर्ख! अगदींच अपक्क! अग मानवी-जीवन हें एक सुंदर परमेश्वरी-काव्य आहे आणि या असल्या स्वर्गीय काव्याचा 'डबक्यांतील फुला' प्रमाणें वाटेल तसा चोळामोळा करण्याचा आह्मां मानवांनां मुळींच अधिकार नाहीं! लघुनासिके, असा निष्कारण त्रागा करण्यांत काय बरें अर्थ आहे? या त्राग्यानें आजपर्यंत कधीं कोणाचें चांगलें कां केलें आहे? वेडे, या त्राग्यानेंच—या कलहानेंच—आह्मीं आमचें सर्वस्व गमावून बसल्यामुळें आज दुसऱ्यांच्या तोंडाकडे आशाळभूत दृष्टीनें पाहण्याचा दुर्धर प्रसंग आह्मावर आला आहे! याच त्राग्याला कंटाळून, दुसऱ्या बाजीरावानें मालकम् साहेबाच्या हातावर पेशवाईचें उदक कायमचें सोडलें! आणि याच त्राग्याला बळी पडून, आजचें हें सुधारलेलें शहाणें विसावें शतकसुद्धां जातीजातींत मत्सर वाढवून निष्कारण कलह करतें आहे! ह्मणून ह्मणतों, तूं हा त्रागा सोडून दे आणि माझ्या हातांत हात घालून उभयतांच्या संघशक्तीचा प्रेमी महिमा या तुझ्या भांडखोर विसाव्या शतकाला दाखवूं ये! ये! ये! लघुनासिके ये! हें काय बरें? असा हा असहयोग बरा नव्हे! हें पहा, माझ्या नवरेपणाची सोटेशाही सुरू झाली नाहीं तोंपर्यंतच बऱ्या बोलानें तूं माझ्याशीं सहकारिता कर!

**लघुनासिका**:—सहकारिता! आणि ती तुमच्याशीं? तुमच्याशीं सहकारिता करून असें जन्मभर दास्य पत्करण्यापेक्षां त्या चिताहारी मृत्यूशीं सहकारिता करून तळमळणाऱ्या जीवाला कायमचें स्वातंत्र्य दिलेलें मी ह्मणतें काय वाईट?

**भग्नदंतः**—वेडी अगदींच वेडी! पुरी अनक्ष अँ! अग, मला असें बाजूला सारून त्या मृत्यूला कवटाळण्यांत मीं तुला असें विचारतों, माझ्यापेक्षां त्या मृत्यूंत तुला अधिक तें काय दिसलें! माणसानें कसें अगदीं विचारपूर्वक बोलावें; नाहींतर, त्याची बाष्कळ बडबड अशी चव्हाट्यावर येते! अग! एवढी मोठी सुशिक्षित तूं! अँ! आणि असें वेड्यासारखें बरळतेस! खरेंच! लघुनासिके! शिक्षणाचे असे धिंडवडे पाहिले ह्मणजे जीव कसा कासाविस होऊन हृदयाचें पाणी पाणी होते आणि......

लघुनासिका:—आणि तें असें ह्मातारपणीं लाळेच्या रूपानें नाकातोंडांतून सारखें गळत असतें असेंच ना तुमचें ह्मणणें?

भग्नदंत:—पाहिलेंस! हेंच तें! अलिकडील तरुण मंडळीचें चुकतें तें इथेंच! अग, ह्याच तरुणापिढीचा उद्धट उताविळपणा आह्मांसारख्या पोक्त पुरुषांनां अस्सा पदोपदीं नडतो! ऐकलंस कां! माणसानें केव्हांही घाई करूं नये. काय? लघुनासिके! कसल्या विचारांत आहेस? बोल, बोल, अशी लाजूं नकोस!

लघुनासिका:—हें पहा! तरुणांच्या उताविळपणानें मी आपणाकडे धांवून येण्याच्या उद्धट विचारांत होत्यें; पण आपला हा आतांचा सुंदर उपदेश कानीं पडतांच मला माझा बेत रहित करावा लागला! असो! जाऊं द्या! आतां त्याचें काय! खरेंच! हा आपला सुंदर उपदेश मला वेळींच न कळता तर मोठीच आपत्ति ओढवणार होती!

भग्नदंत:—अँ! लबाड लघुनासिके! असें मला नुसतें शब्दांत धरण्यापेक्षां तूं मला स्वतःच्या बाहूंत पकडले असतेस तर याहीपेक्षां मला अधिक आनंद झाला असता! पण तसें तरी नसेलच हें कशावरून ह्मणा! हो! कदाचित् तुझ्या प्रणय-पुस्तकांतील ही आरंभीची शाब्दिक प्रस्तावना असेल! बाकी, प्रणयाची इमारत शहाणपणाच्या पायावर रचलेली केव्हांही चांगलीच!

लघुनासिका:—अहाहा! काय पण कल्पनेची कसरत ही! जसे कांहीं प्रतिभासंपन्न कवीच! जणूं काय दिनानाथच!

भग्नदंत:—दिनानाथ! शिफारस-पत्र फाडण्याच्या अक्षम्य अपराधाबद्दल विश्वविद्यालयानें बहिष्कृत केलेला तो तुझा उद्धट दिनानाथ? वेडे, त्या नतद्रष्ट नादानाचें नांवही काढूं नकोस! सुधेच्या कुशींत शिरून मधुकरांनां उद्धट बोलणाऱ्या त्या चवचाल कारट्यानें, एकदां तर आमचा 'वाङ्मय विहार मंडळ' ह्मणून पाडण्याचा घाट घातला होता; पण मधुकरांनीं पाण्यासारखा पैसा खर्च करून त्याला दे माय धरणीं ठाय करून सोडलें!

**लघुनासिका:**—अहाहा! उजेड! सारेच झाले! दिवे ओंवाळा दिवे!

**भग्नदंत:**—खरेंच, लघुनासिके! तसाही सुयोग लवकरच येणार अशीं स्पष्ट स्पष्ट चिन्हें मला कालपासून दिसूं लागलीं आहेत. कारण, यंदाच्या अखिल संस्कृत-परिषदेचें अध्यक्ष-स्थान मीं मंडीत केल्यानंतर इतरांनीं तिकडे ढुंकूनसुद्धां पाहण्याचें कारण नाहीं असें कालच स्वतः मधुकर दीक्षिकाजवळ ह्मणत होते. काय? लघुनासिके? अग! तूं आहेस कुठें? येत्या दिजेवरांत मी मोठा होणार मोठा!

**लघुनासिका:**—मग आतां लहान कां आहांत? अहो, साधारण पंचवीस वर्षांनंतर माणसाची वाढ खुंटते ह्मणतात! मग आपण अश्या जख्खड ह्मातारपणीं मोठे कसें होणार?

**भग्नदंत:**—अग, 'कीं तोडतां तरु फुटे आणखी भरानें' हा मोरोपंडिताचा संस्कृत अभंग कालच भिकंभटानें मला समजावून दिला! वेडे, तुझ्या हिशेबानें माझी वाढ अशी जवळ जवळ तीन वेळां खुंटल्यामुळें आतां येणारे अंकूर मात्र तिप्पट जोरानें बाहेर पडणार हें अगदीं उघड आहे!

**लघुनासिका:**—हें लांबलेल्या कानांवरुन दिसून येतेंच आहे! अहाहा! काय पण जाडे विद्वान! त्या संस्कृत-परिषदेचे अध्यक्ष होण्यापूर्वी आपल्याला आधीं मराठी मुळाक्षरें तरी पुरतीं येतात का?

**भग्नदंत:**—मुळाक्षरें! हूँ! हूँ! हूँ! मूर्ख, वेडी, पुरी अपक्क अं! वेडे, कोणत्याही गोष्टीच्या मुळाकडे धांव घेणें धोक्याचें असतें आणि हें जाणूनच आमच्या पूर्वजांनीं 'नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ' शोधूं नये असें स्पष्ट ह्मटलें आहे. कोणत्याही गोष्टीचा आरंभ आणि अंत यांविषयीं मनुष्यानें अगदीं निष्काळजी राहून नेहमीं मधल्या स्थितीचा आश्रय करावा! आणि हा व्यवहाराचा वस्तुपाठ आमच्या मनांत चांगला बिंबवण्यासाठीं त्या पंढरीच्या विठोबानें आपले हात देखील कसे अगदीं मध्यावर ठेवून दिले आहेत. आणि एवढ्याच करितां मीही त्या 'हरी नारायणा'जवळ नेहमीं आपली 'मधली स्थिति' मागत असतों!

**लघुनासिका:**- पण नुसतें मागून काय मिळणार! त्याच्याकडे जात कां नाहीं?

**भग्नदंत:**—समजतात हं मला ही सारीं कुजकीं बोलणीं! (वेडावून) बरें! बरें! त्याच्याकडे सुद्धां जाईन अं! पण आधीं तूं माझ्याशीं मुकाट्यानें सहकारिता करणार कीं नाहीं बोल, कां दाखवूं तुला माझा रुद्राचा अवतार! हो! माझा राग फार मोठा आहे! रागाच्या भरांत मी काय करीन आणि काय नाहीं याचा कांहीं नियम नाहीं. रागाच्या भरांत कदाचित् मी ही जागा सोडून अगदीं तुझ्याजवळसुद्धां येईन. हं! हसूं नकोस, आणि तसें झालें म्हणजे उगाच तुझ्या हट्टाचें हसूं होऊन माझा मात्र हट्ट पुरा होईल. मग आतां सांग बरें लघुनासिके, मी तुझ्यावर अगदीं शान्तपणानें रागावूं कां? आणि दाखवूं कां तुला रुद्राचा अवतार!

**लघुनासिका:**—भावी अवताराचा पोरखेळ करायला तुम्ही एकादी स्त्री कां आहांत? कधीं कधीं चांगल्या चांगल्या सुशिक्षित स्त्रियासुद्धां या अवताराच्या बाबतींत खट्टू होऊन जगाच्या निंदेला पात्र झाल्या आहेत. शिवाय, तुम्ही आपला अवतार मला दाखवायला मला तो दिसत कां नाहीं? खरेंच! रुद्रांत आणि आपणांत फरक कसा तो मुळींच नाहीं! कारण, त्यानें जटेला राख फांसून केसांनां कृत्रिम पांढुरता क्षणिक आणली असेल तर आपले हे केस कायमचेच वास्तविक पांढरे झाले आहेत! त्याच्या जटेंतून ज्याप्रमाणें गंगामाता सारखी वाहत असते त्याप्रमाणेंच तुमची ही चिकटगंगा अशा म्हातारपणीं कधीं डोळ्यांच्या खांच-खळग्यांतून तर कधीं या फेंदऱ्या नाकातोंडातून कशी सारखी वाहत असते. मदनाला जाळणारा त्याचा तो तिसरा डोळा...

**भग्नदंत:**—हं. हं. हं! तोंड आटप! बस्स कर हा तुझा चावटपणा! लघुनासिके, हा तुझ्या हिंदुपतीचा धडधडीत अपमान आहे! बस्स! बस्स! कर येथून काळें आणि हो चालती!

**लघुनासिकाः**—( जातांना ) आणि मलाहि तेंच पाहिजे होतें!

( जाते. )

**भग्नदंतः**—( स्वगत. ) नायको झाली ह्मणून काय झालें! बस्स! तें कांहीं नाहीं! याचा इन्साफ हा झालाच पाहिजे! जों जों या गोष्टीकडे काना-डोळा करावा तों तों कानच डोळ्यांवर येऊन पडतात. ( विचार करून. ) बस्स ठरला विचार! आत्तांच्या आतां मंडळांत जाऊन त्याच्या विद्येमार्ने अखिल ब्रह्मवृंदाची खास सभा मधुकराच्या नेतृत्वाखालीं कपिलेश्वराच्या मंदिरांत बोलावतो आणि हिच्या आतांच्या या कृत्याचा उघड निषेध करून त्याचा खास ठराव अध्यक्षामार्फत हिच्याकडे रवाना करतों. हिचे एवढे तीन, तेरा नऊ अठरा पाहिजेत कशाला? मूर्ख! वेडी! अपक्क! अक्कलच नव्हती तर आधीं लग्न कशाला करावयाचें होते!

पडदा.

---

# प्रवेश ५ वा.

स्थळः—बागेतील व्हरांडा.

**दिनानाथः**—माईसाहेब! असें हें चालावयाचेंच! भरती मागून ओहटी! दिवसा मागून रात्र! उत्कर्षा मागून अपकर्ष! यांतच या अखिल विश्वाची सारभूत चमत्कृति आणि त्या अनंत कालाचें अद्‌भुत् महात्म्य सामावलेलें आहे! या भीषण कालाच्या अनंत उदरानें आजपर्यंत कोणकोणत्या गोष्टी पचनीं पाडल्या हें क्षुद्र मानवी दृष्टीला कसें कळणार? हेतू धरणें, मनोरथांचे नसते बंगले उठविणें, इच्छेला मनमुराद अवकाश देणें आणि फारच झालें तर, तदनुसारी एखाद्या निश्चयाचा चंग बांधणें, या पलिकडे मानवी सामर्थ्याला अधिक तें काय करतां येणार आहे?

**लिला:**—पण दिनानाथ! अशक्य असें या जगांत कांहीं नाहींना?

**दिनानाथ:**—माईसाहेब! ही मानवी शक्तीची वृथा घमेंड आहे! या सर्वसंपन्न महाराष्ट्र-देशाला देशोधडीला लावून त्याला गुलामगिरीच्या अठरा विश्वे दारिद्र्यांत निर्दयपणानें लोटून देणाऱ्या त्या अमंगल अठराव्या शतकाचेंच उदाहरण घ्याना! श्रीमंत भाऊसाहेबासारखा कसलेला योद्धा, विश्वासरावा-सारखा निधड्या छातीचा धडाडी सेनानी, नाना फडणविसासारखा लोकोत्तर तैल-बुद्धीचा समयज्ञ मुत्सद्दी, शिंदे, होळकर यांच्यासारखे स्वामी-सेवा-तत्पर अत्यंत प्रबल लढवय्ये—सारांश, अखिल महाराष्ट्राचें मूर्तिमंत शौर्य आणि शहाणपण—त्या पानपतच्या रणसंग्रामावर जातीनें हजर असतां, आमच्या या महाराष्ट्र-देवीच्या भाल-प्रदेशावर अक्षय झळकणारा तो स्वातंत्र्याचा सौभाग्य-तिलक याच निर्दय काळ-पुरुषानें त्या समरवीरांच्या छातीवर पाय देऊन आपल्या जुलमी हातानें अखेरीस पुसून टाकलाच ना! हा सारा कोणाचा प्रभाव बरें? अर्थात् प्रतिकूल दैवाचा! माईसाहेब! कोणत्याही मानवी-निश्च-याची पूर्तता होण्याला सुदैव आणि प्रयत्न या जोड-गोळीची जोड असावी लागते.

**लिला:**—खरेंच दिनानाथ! प्रत्यहीं नव्हे, मी ह्मणतें, प्रत्येकक्षणीं अशीं चमत्कारिक स्थित्यंतरें घडवून आणणाऱ्या त्या कालाच्या अनंत उदरांतील भावी गोष्टींचें अंधुक ज्ञान जर मनुष्याला झालें असतें तर कितीतरी दुःखांची होळी होऊन मनुष्याला मौज वाटली असती!

**दिनानाथ:**—मौज? छे! माईसाहेब! हा आपला निव्वळ भ्रम आहे. काळाच्या उदरांतील कसलीही गोष्ट मानवी-बुद्धीला कळत नाहीं ह्मणूनच तर मानवी-आयुष्यांत मोठी मौज भरून उरली आहे! केवळ अज्ञानामुळेंच ज्ञानाची खुलावट होते! गूढांनींच वस्तु-स्थितीला मनोहर केलें आहे! आणि आयुष्याच्या चढ-उतरतेची रम्यता जी आपल्या मनाला पटते तीसुद्धां याच सुखदुःखांच्या अनिश्चित हेलकाव्यामुळेंच! माईसाहेब! सुखाची विशेष कल्पना समोर ठेविली ह्मणजे तेथें हटकून दुःखाचाच प्रवेश होतो. सुखाचा खरा जन्म नेहमीं समाधानांत होत असतो. मनुष्याच्या अंतरभेदी-दृष्टीला

आशेच्या गोड पडद्याआड चाललेले भविष्याचे भयानक खेळ पाहतां आले असते, तर कल्पनेच्या चेतनेनें उद्दीपित होणारी मानवी-कर्तबगारी, उत्साहाच्या अभावीं जागच्या जागीं हबकून जाऊन, तिचें नुसतें निराशमय प्रेतच पाहाण्याला सांपडलें असतें! हा दुर्दैवाचा अपूर्व घाला चुकविण्यासाठीं, आणि प्राणिमात्रांचा उत्साह कायम राखण्यासाठींच, मला वाटतें, माईसाहेब! परमेश्वरानें तशी ती योजना मुद्दाम केली असावी.

**लिला:**—दिनानाथ! हें तुमचें समाधानाचें दुष्प्राप्य साधन संपादणें, एकाद्या लोकोत्तर बुद्धीलाच शक्य दिसतें. दैवाच्या वक्रगतींत पूर्ण चिरडल्या गेलेल्या सामान्य बुद्धीच्या माणसानें, तुमच्या ह्मणण्याप्रमाणें जरी त्यानें सुखाची विशेष कल्पना समोर ठेवली नाहीं, तरी स्वभावधर्माप्रमाणें, सुखाची–नुसती तरळती कां होईना पण--कल्पना ही त्याच्यापुढें अगदीं नकळत येऊन उभी राहणारच; आणि मग अशा वेळीं त्या विपदाग्रस्त व्यक्तीचे अधाशी डोळे हाताजवळच्या अवाढव्य वैभवाकडे सहज-सुलभ स्वार्थाच्या एकाग्रतेनें पाहत असतांना, चुकून मिटले गेले तर तें त्या दीनदयाळ प्रभूच्या दरबारांत पाप ठरेल काय?

**दिनानाथ:**—माईसाहेब! या जगांत जें कांहीं सुंदर, उन्नत् आणि महत् असेल त्यांच्याच ललाटीं त्या दीनदयाळ प्रभूच्या चरणांचा आश्रय लिहिलेला असतो. बाह्य मोहाचा परित्याग करून विनम्र हृदयानें त्या सर्व-साक्षी, अज्ञेय आणि अचिंत्य शक्तीचा एकदां आश्रय केल्यावर, दैवाच्या वक्रगतींत सांपडलेल्या अगदीं सामान्य बुद्धीलाही अलौकिक शक्तीचीं अचाट कार्यें सहज करितां येतात; शिवाय माईसाहेब! मला वाटतें, त्या स्वर्गीय दरबारच्या कायदे-कानूंचें ज्ञान करून घेण्यापेक्षां आपल्या नैतिक आचारांच्या जोरावरच त्या न्यायी जगत्-पित्यापुढें छातीठोकपणानें उभें राहण्यांतच मानव्याची खरी सार्थकता दिसून येते!

**लिला:**—हा मानवप्राणी प्रेम, स्नेह, दया इत्यादि स्वर्गीय गुणांनीं नटला नसता तर दिनानाथ! मानवांच्या आणि जंगली हिंस्र पशूंच्या जीवन-

क्रमांत कोणताही फरक न राहतां त्या दयाघन परमेश्वराचा मानव-सृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न खचित फोल ठरला असता. प्रेमस्नेहादि स्वर्गीय सद्गुण-परंपरेची जर मानवांनीं आस्थापूर्वक जोपासना केली नसती—हा ईश्वरी-अंशाचा पुण्यनिधि मानवांकडून नादानपणानें पायांखालीं तुडवला गेला असता—तर केवळ प्रेममय परमेश्वराच्या प्रचंड शक्तीनेंच घडून येणारीं अलौकिक, अद्भुत् आणि उदात्त कार्यें आज जीं मानवांच्या इतिहासांत झळकत आहेत, तीं खास झळकलीं नसतीं. दिनानाथ! कोणत्याही मनुष्यानें मानव्याच्या पूर्ण-तेस पोहोंचूं नये असा जणूं काय ईश्वरी संकेतच दिसतो. पूर्णत्वासाठीं अगदीं किमानपक्षीं त्याला दुसऱ्या एखाद्या माणसाची जरूरी असावी लागते. अशा वेळीं मात्र ही सद्गुण-परंपरेची कोमल लता, कोणत्या वज्रदेही-वृक्षावर चढवली असतां, ती विशेष नयन-मनोहर ठरेल ही गोष्ट मात्र मानवी-कौशल्यावर खास अवलंबून आहे.

**दिनानाथः**—माईसाहेब! लता-वृक्षाच्या या स्वार्थ-मूलक संयोगी-शक्तीपेक्षां मला वाटतें, स्वार्थशून्यतेची एकेरी शक्तीच अधिक प्रबल ठरेल! निष्काम धर्माच्या गरीब पाऊल वाटेवरून संथपणानें जाणारा तेजस्वी निःस्वार्थ जगांतील पापी वासनांचा दाट अंधार समूळ नाहींसा करून तो त्याचें खरेखुरें नंदनवन सहज करूं शकतो. ‘स्वार्थ-संन्यास’ हीच एक यशाची अजब गुरुकिल्ली आहे. माईसाहेब! जेथें जेथें ह्मणून ‘स्वार्थ-संन्यास’ आहे, तेथें तेथें त्या भगवान् परमात्म्याचें अधिष्ठान खात्रीनें असूं शकतें.

**लिलाः**—एकूण दिनानाथ! तुह्मांला ‘स्वार्थ-संन्यास’ मान्य आहे तर?

**दिनानाथ**—मला? माईसाहेब! आपल्या या व्यक्तिविषयक प्रश्नानें—मग तो सकारण असो अगर अकारण असो—कसेंही असलें तरी त्यानें या चाललेल्या सर्व-साधारण विषयाची चारुता थोडी नष्ट झाली असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. असो; माईसाहेब! ह्या ‘स्वार्थ-संन्यासा’ची मान्यता पटावयाला सर्वथैव उदात्त विचारांनीं मंडित झालेलें जात्या उदार हृदयच

असावें लागतें; आणि ह्मणूनच असल्या परमेश्वरी-हृदयाचा अधिकारी-संन्यासी आपणाला या संसाराच्या निबिड-विपिनांत क्वचित्च भेटतो. स्वार्थी-डोहांत सतत पिचत पडलेलें सैतानी-हृदय विवक्षित कारणांनीं प्रसंगवशात् उच्च आणि उदात्त मनोवृत्तींच्या वाऱ्यानें जरी वर आलें तरी तेवढ्यानें तें परमेश्वरी-हृदय ठरत नाहीं! मग माईसाहेब! 'स्वार्थ-संन्यासा' सारख्या जात्या सुंदर आणि निर्दोष वस्तूचा कोण हव्यास धरणार नाहीं?

**लिला:**—पण आधीं दिनानाथ! पूर्ण निर्दोषी अशी वस्तु या जगांत आहे कोठें? कोणतीही वस्तु घेतली तरी तिला अवगुणाचें थोडेंफार गालबोट हें लागलेलें असतेंच. गुलाबाचें सुंदर फूल कांट्यांतूनच काढून घ्यावें लागतें. सुवर्ण-केतकीवर तर भयंकर भुजंगाचा नित्य पहारा असतो. तेजस्वी मौक्तिका-साठीं सरित्-पतीचें सारखें मंथन करावे लागतें. मग दिनानाथ! या जगांत अगदीं सर्वांग सुंदर आणि पूर्णांशानें निर्दोष अशी एकही वस्तु नाहीं, ही तरी गोष्ट आपणाला कबूल आहे ना?

**दिनानाथ:**—माईसाहेब! इतक्या निर्वाणीच्या स्वरानें उच्चारलेला आणि अपेक्षित उत्तराच्या आतुरल्या आशेनें विचारलेला हा प्रश्न माझ्या उभ्या आयुष्यांत पहिलाच दिसतो! सर्वांग-सुंदर अशी एकही वस्तु नाहीं याचा अर्थ, माईसाहेब! विधात्याला ती साधली नाहीं असें नाहीं; तर जात्या सुंदर वस्तुला सर्वांग-सुंदरतेचें कोंदण बसविण्याच्या बिकट परीक्षेंत त्यानें मानवी-कौशल्याला अवकाश ठेवला आहे. या परमेश्वरी परीक्षेचा मार्ग कसोटीच्या कंटकांनीं आक्रमलेला असतो. या कसोटीच्या कंटकांचीं स्वतःच्या शीलाच्या कांडीनें नाजुक फुलें करणारा जादुगार त्या परमेश्वरी-परीक्षेंत विजयी झाल्यानंतर जगानें त्याचा आदरयुक्त गौरव करणें अगदीं स्वाभाविक आहे.

**लिला:**—पण मी ह्मणतें, इतकेंच नव्हें, तर अशा वेळीं जगानें त्या विजयी वीराचा आपलेपणाच्या प्रेमी दृष्टीनें असा गौरव केला नाहीं तर मात्र जगाची अरसिकता पूर्ण व्यक्त होते! (लिलेचा प्रेमकटाक्ष, दिनानाथाचा गोंधळ व उभयतांचें स्थानांतर.)

दिनानाथः- ह्मणजे? हे काय?

लिलाः—हें त्या विजयी-वीराचें विजय लांछन! हा त्या जगाच्या जादुगाराचा आदरयुक्त सन्मान! दिनानाथ? पण खोटें बोलून मूळच्या पापांत आणखी भर कशाला घालूं? माझ्या जिवाच्या जिवलगा मी—

दिनानाथः—माईसाहेब! आपण शुद्धीवर आहांत काय?

लिलाः—भाग्याच्या भगवंता! तुझ्या रसाळ रसवंतीनें माझी शुद्धी केव्हांच हिरावून नेली! गुणाच्या गुणवंता! हेलकावे खाणाऱ्या माझ्या आयुष्य-नौकेखालीं असणाऱ्या काळ्याकभिन्न खडकांची यथार्थ कल्पना, प्राणा, तुझ्या विचार-दीपानें मला वेळींच करून दिली नसती तर मी अशी लाचार बनून तुझ्याकडे अशी धांवत कां बरें आली असतें. (आलिंगनार्थ धांवतें.)

दिनानाथः—हं! हं! थांबा माईसाहेब! उत्तान-शृंगाराच्या पापी-लहरींत आपण काय करीत आहांत, याची आपणाला थोडी तरी जाणीव आहे कां? आजपर्यंत चालत आलेल्या आमच्या आर्य सतींच्या उज्ज्वल चारित्र्यावर अशा घाणेरड्या कृत्यानें डांबर फासतांनां तुह्माला शरम वाटायला पाहिजे होती! मी कोण? व आपण कोण? याचा कांहीं एक विचार न करतां मला विलगण्यासाठीं पुढें सरसावतांनां परमेश्वरी-साम्राज्यांत कोठें तरी अन्याय घडतो, आहे, हें तुमच्या ध्यानांत कसें येत नाहीं! ऐहिक-मोहाला असें नादानपणानें बळी पडतांनां, पाप-पुण्याच्या कल्पनेची होळी करून, पशू-कोटींत स्वतःला सामील करून घेण्यांत तुह्मांला काय भूषण वाटतें?

लिलाः—काय भूषण वाटतें? काय भूषण वाटतें हें त्या प्रेमाच्या परमेश्वराला विचारा! हें त्या जरठपतीचा जीर्ण चेहरा ध्यानांत येतांच, निराशेनें फजीत पावल्यामुळें, हाताजवळच्या मोहक परिस्थितीकडे अवेळीं वळणाऱ्या त्या तरुण-पत्नीच्या ओशाळलेल्या दृष्टीला विचारा! हें त्या मृत्युच्या जबड्यांत बसलेल्या वृद्ध-वराच्या थरथरणाऱ्या हातांत, अजाण बालिकेचा कोमल हात लौकिकदृष्ट्या विधिपूर्वक देऊन, खऱ्या लग्न-संस्काराची पोरखेळांत जमा करणाऱ्या त्या तुमच्या समाजाच्या सर्वेश्वराला विचारा! आणि इतकेंही

करून नाथ—नका! नका! असें तोंड फिरवूं नका.—आपलें व्हावें तितकें समाधान झालेंच नाहीं, तर आपण आपल्या सद्-सद्विवेक-बुद्धीला एका तरुण स्त्रीच्या निराश-अंतःकरणानें विचारा; नाथ! आजपर्यंत अव्याहत चालत आलेल्या तुमच्या आर्य स्त्रीयांच्या उज्ज्वल नीतिमत्तेवर असा कायमचा काळीमा फांसून, स्वतःची पशू-कोटींत गणना करून घेण्याची नुसती ओझरती कल्पनासुद्धां, मला आपल्या इतकीच दुःसह वाटते! पण नाथ! मी तरी काय करूं? निसर्गाचा ओघ मला थांबवितां कसा येणार? खरेंच नाथ! माझा यावेळीं अगदीं नाईलाज झाला आहे! हृदयांत प्रेमाचें अंकूर उत्पन्न करणाऱ्या परमेश्वरानें मला बहाल केलेली इंद्रिय दमनाची सुरी अगदींच बोंथट आहे! आणि अशा या बोंथट सुरीनें हे नकळत वाढीस लागून जून झालेले प्रेमाचे अंकूर आतां कांपले कसें जाणार?

**दिनानाथः**—माईसाहेब! आपण असें निराश होऊं नका. प्रत्येकाची हीं इंद्रिय-दमनाची सुरी प्रथमतः अशीच बोंथट असते; माईसाहेब! आपली हीं बोंथट सुरी अभ्यासाच्या सहाणेवर जर घांसली गेली तर मला वाटतें—नव्हे माझी खात्री आहे—आपली हीच बोंथट सुरी आपल्या कल्पनेपेक्षांही अधिक तीक्ष्ण होईल! माईसाहेब! अभ्यास काय करूं शकत नाहीं! पापाच्या पंकांत पिचत पडलेल्या पंगु पतिताला परमेश्वराच्या परमोच्च पदवीला पोहोंचविणारा अभ्यास माईसाहेब, आपल्या जून मनोवृत्तींचें उच्चाटन् करण्यास असमर्थ ठरेल असें आपणाला वाटतें तरी कसें? शिवाय माईसाहेब—

**लिलाः**—नका! नका! नाथ, मला आतां त्या नांवानें संबोधूं नका! दैवी-प्रेमानें दोन समान अंतःकरणें एकमेकांत पूर्ण विरून गेल्यानंतर, त्यांनां मूळच्या नामनिर्देशानें जागें करून भिन्नत्वाची कल्पना करून देणें, मला वाटतें, बरेंच कठोरपणाचें होईल, त्यापेक्षां नाथ! आपण मुक्या मनानेंच मायेचा मोहक मनोरा उठवून देऊन, त्यांत उभयतांच्या लाडक्या प्रणय-

देवीची प्रेमानें प्राणप्रतिष्ठा करूं या! नाथ! आपण बोलत कां नाहीं? हृदयानें हृदयाला ओळखल्यावर हा संकोचाचा आडपडदा उभयतांनां तापदायक नाहीं काय!

**दिनानाथः**—माईसाहेब! उच्छृंखल मनोवृत्तींनां असें मनमुराद वाहूं देणें श्रेयस्कर नाहीं हें मात्र आपण केव्हांही विसरूं नका. शिवाय, अशा सैतानी सूरावर आपण असें बेताल गातांनां, माझ्या निर्विकार हृदयाच्या आपण काय चिंधड्या करीत आहांत, याची आपल्याला काय कल्पना असणार? आपल्या तोंडून निघणारा प्रत्येक विषारी शब्द ह्मणजे दुसरें तिसरें कांहीं नसून, माझ्या निष्पाप अंतःकरणाला चाटून जाणारा विजेचा लोळ आहे! माईसाहेब! आपण सोडलेल्या पापी निश्वासामुळें दूषीत झालेल्या या विषारी वातावरणानें, मला अगदीं कोंडल्यासारखें होऊन, माझे प्राण कसे कंठीं आले आहेत! अरेरे! निष्पाप-प्रेमाचें अशा बेताल प्रणयांत रूपांतर करूं पाहणाऱ्या पापी परमेश्वरा! आधीं हें अधोगामी प्रेम तरी कशाला उत्पन्न केलेंस?

**लिलाः**—नका नका! नाथ, परमेश्वराच्या ह्या प्रेमी कृत्याचा आपण असा अनादर करूं नका! प्रेम हा जगाचा आत्मा आहे! प्रेम हें मानवी हृदयाचें शिरोभूषण आहे! नाथ! कंदमुलादि वस्तु सेवन करून जगापासून अगदीं अलिप्त राहणाऱ्या छिन्न-संशय योग्यालाही आपलें हृदय प्रेमशून्य करितां येत नाहीं. नाथ! ही अजब वस्तु या चर्मचक्षूंनां जरी दिसली नाहीं, तरी तिचे भावी परिणाम हृदयाला कसें अगदीं स्पष्ट दिसतात. माझ्या जिवाच्या जिवलगा, तो परमेश्वर या सुखाच्या जननीचा ज्या घटकेला गळा दाबेल, त्याच घटकेला त्याला या साऱ्या जगांत माणूसकीला पूर्ण फारकत मिळालेली दिसून येऊन, राक्षसांचें रानटी साम्राज स्थापलें गेल्याचें आढळून येईल! ह्मणून ह्मणतें, नाथ! अशा या चमत्कृतिजनक प्रेमाची आपण विशेष मनोभावानें जोपासना करावयाला नको काय?

**दिनानाथः**—माईसाहेब! इकडे पहा! आपल्या सहस्र किरणांनीं मानवीहृदयांत ज्ञान-ज्योत प्रदीप्त करणाऱ्या या मावळत्या भगवान् सूर्य-नारा-

यणाकडे पहा! इंद्रिय-दमनाच्या अभावीं, आपण अंतःकरणांत पापी वासनेला अवकाश दिल्यामुळें, काळवंडून काळ्या ठिक्कर पडलेल्या या आपल्या चेह-ऱ्याकडे या प्रतापी सूर्याचें लक्ष्य जातांच, हा पहा! माईसाहेब! हा पहा! रागानें वेडावून जाऊन, निराशेच्या भ्रमांत या पश्चिम क्षितीजाच्या कड्यावर डोकें आपटून घेतल्यामुळें, त्यांतून साहजिक उडालेल्या रक्ताच्या चिळकां-ड्यांनीं हा पहा! हा पहा! माईसाहेब! यानें पश्चिम-दिक-प्रान्त कसा रक्त-बंबाळ करून सोडला आहे! माईसाहेब! आपल्याला ही त्याची दैना पहावतें कां? केवळ नीतीच्या संवर्धनासाठीं, स्वतःच्या रक्ताचा असा सडा शिंपणाऱ्या या दिनमणीकरतां तरी निदान, आपण यापुढें हा पापाचा चिखल तुडविण्याची ही अधोगामी कल्पना सोडून द्या, नाहींतर—

**लिला:**—नाहींतर! नाहींतर काय होईल?

**दिनानाथ:**—नाहींतर आणखी एका क्षणानें, हा लोक-मणी कसोटीच्या कड्यावरून निराशेनें पश्चिम समुद्रांत खालीनें उडी घेईल! आणि मग या जगती-तलावर पापी वासनांचें सैतानी साम्राज्य सुरू होऊन, जिकडे तिकडे अनीतीच्या अमावास्येचा काळाकुट्ट अंधःकार पसरेल!

**लिला:**—नाथ! ही सूर्यानें केलेली जनतेची दिशाभूल आहे! रोजच्या मरणानें याची पुनर्जन्माची कल्पना बळावल्यामुळें, याला असलें हें नाटकी दिव्याचें नकली अवसान आणतांना, या तुमच्या स्वार्थी सूर्याचें स्वतःचें असें थोडेंच खर्चतें आहे! सवंग-सुकाळ लोक-प्रियतेला बळी पडलेल्या या लब्ध प्रतिष्ठित सूर्याला ही मिळत असलेली परमेश्वरी शिक्षा, मी ह्मणतें, अगदींच अपुरी आहे! नाथ! ह्या किर्ती-लंपट सूर्याची आपण कितीही प्रशंसा केली, तरी जाती-धर्माप्रमाणें मला त्याचा रागच येणार; हें पहा नाथ! आपण होऊन चालून आलेल्या आरक्त उषा-सुंदरीला परोपकाराच्या वेगळी अवसानांत त्या बिचारीला निर्दयपणानें हातावेगळी करून या तुमच्या कपटी-सूर्यानें दिवसाढवळ्या जनतेच्या डोळ्यांत धूळ फेंकून, त्यांच्याकडून फुकटचे धन्य-वाद माल वसूल केले! पण प्रहरा दोनप्रहरानंतर, प्रियकरणीच्या विरहा-

नलानें तप्त होणाऱ्या याच सूर्याला, तुमच्या त्या लोकापवादाच्या बागुलबोवाचें भय वाटलें नसतें, तर नाथ! हा उषेच्या उज्ज्वल प्रियकर चालून गेलेल्या अर्ध्याधिक मार्गावरून सुद्धां तिच्याकडे खालीनें परतला असता! पण अंधतेनें एकदां स्वीकारलेल्या चुकीच्या मार्गाची तरफदारी करण्याच्या वेड्या मोहांत, ह्या आकाशाच्या मोकाट मैदानांत हट्टीपणानें असा एकटाच भटकत असतांनां, वाटेंत एकही प्रेमीजीव न आढळल्यामुळें, अखेरीस हताश होऊन, असा हा निराशेनें या पश्चिम-क्षितिजाच्या कड्यावर आपलें डोकें आपटून कपाळ मोक्ष करून घेत आहे. प्रेमळ स्त्री-जातीशीं अशी निमकहरामी केल्यामुळें, नाथ! तो प्रेमाचा परमेश्वर ही त्याला शिक्षा देत आहे. नाथ! आपण अशा कपटी आणि हट्टी सूर्याची आतां कींव कराल काय?

**दिनानाथः**—हा केवळ दृष्टी-दोष आहे! अरेरे! माईसाहेब! त्या उच्छृंखल उषेला निर्दयपणानें हातावेगळी करतांनां, हा धर्मनिष्ठ सहस्र-रश्मी कोणत्या सद्हेतूनें प्रेरीत झाला होता, याची आपणाला जर अंधुक कल्पना असती, तर आपल्याला ही पुढची पापी कल्पना मुळीं सुचलीच नसती. या तेजस्वी सूर्यावर असें निष्कारण तोंडसुख घेण्यापूर्वी, माईसाहेब, याच उषेच्या उदरीं जन्म घेणाऱ्या ह्या सूर्याचा तिच्याशीं असलेला माय-लेंकराचा पवित्र संबंध आपण क्षणभरही विसरूं नका. शुद्ध प्रेमानें उषा-मातेला कडकडून भेटतांनां, तिच्या कामी हृदयाची पापी धडपड या सच्छील प्रभाकराच्या ध्यानीं येतांच, त्या उच्छृंखल दिवटीला नीतीचा अवघड पाठ शिकविण्या-साठीं, ह्यानें प्रसंगीं स्वीकारलेला कठोरपणा, आपणासारख्या स्त्री-जातीला कितीही हृदयस्पर्शी भासला, तरी माईसाहेब! तो धर्माच्या आणि नीतीच्या दृष्टीनें उचित नव्हता असें कोण बरें म्हणेल? शिवाय माईसाहेब! या दिन-मणीला एकंदर स्त्री-जातीशीं निमकहराम होऊन, त्यांचा द्वेषच करावयाचा होता, तर केवळ नीतीच्या संरक्षणासाठीं, पश्चिम-समुद्रांत स्वतःच्या जीवाची आहुती टाकण्याच्या दुर्धर प्रसंगापूर्वी, हा रक्तानें रंगलेला आरक्त सूर्य आपल्या लाडक्या संध्या-देवीच्या मृदु कानांत खऱ्या प्रेमाचा मंजुळ महिमा सांगण्यासाठीं, हा तिच्याभोंवतीं इतका वेळ कां बरें रमला असता!

**लिला:**—नाथ! असें मला जेथें तेथें निरुत्तर करून माझा उत्साह-भंग करूं नका. नाथ! तें बाकीचें कसेंहि असलें, तरी या तुमच्या प्रेमानें रंगलेल्या सूर्यानें निदान या संध्यादेवीच्या कानांत तरी आपलें गोड प्रणय-गीत अखेरीस सांगितलेंच ना! मग नाथ! माझ्या या प्रणय-सूर्यानें या त्याच्या संध्या-देवीच्या कानांत आपलें मंजुळ मनोगत कळविण्याला आतां काय बरें हरकत आहे? प्राणेश्वरा? मग आतां हा निष्कारण अवधि कां बरें? या उज्वल-संधेची ही प्रेमी आरक्तता आपणाला या माझ्या कोमल गालांवर नाहीं कां दिसत?

**दिनानाथ:**—माईसाहेब! समयज्ञ सूर्यानें आपल्या प्रेमसाम्राज्याचा विलासी राजदंड अगदीं बिनहरकत या सती-संध्येच्या हवालीं करून, तिला आपली खास पट्टराणी केली ही एकच गोष्ट या उज्वल संध्येच्या अद्वितीय सद्गुणांची मूर्तिमंत साक्ष देत असतां, या शीलवती संध्येला असें खेंचून आपल्या जोडीला बिनदिक्कत बसविण्यांत, आपण तिचा अमर्याद अपमान करीत आहांत! माईसाहेब! ही सती-संध्या ह्मणजे आपण कोण समजतां? दोन तळमळणाऱ्या जीवाकरितां—माईसाहेब! दिवस आणि रात्र या प्रेमी जोडप्याच्या मधु-मीलनाकरितां—निष्काम प्रेमाच्या पायावर स्वतःच्या जीवाचा सेतू बांधणारी ही पवित्र सती-संध्या ह्मणजे कांहीं जिवंत नवऱ्याचा सौभाग्य-तिलक दृष्टीआड करून एकजात पुरुषजातीला निर्लज्जपणानें कवटाळणारी या हतभागी दिनानाथाची माईसाहेब नव्हे?

**लिला:**—नाथ! मला आतां हे दृष्टांत पुरे झाले! आपल्या या विप्रयां-तरानें आतांपर्यंत थोंपवून ठेवलेली ही अंतस्थ प्रेमाची लाट मला आपणा-कडे अशी ढकलते आहे (जरा चालून.) नाथ, आपल्या मुखचंद्राच्या दर्शनानें माझा प्रणय-सागर उचंबळून आल्यामुळें हा पहा, त्याचा ओघ डोळ्यांतून अश्रूंच्या रूपानें असा जोरानें बाहेर येत आहे. (रडते.) डोळ्यांत अश्रूंची एकच गर्दी उडाल्यामुळें, नाथ! मी आपणाकडे चालून येत असतांनां माझी चुकूनसुद्धां दिशाभूल होऊं नये ह्मणून—माझ्या

जिवाच्या जिवलगा—आपण मला आपल्या प्रेमी हाताचा आश्रय देणार ना? (हात पुढें करितें.)

**दिनानाथः—** (मागें सरून.) नका! नका! माईसाहेब! पुण्यस्त्रीयांच्या पदारविंदांनीं पावन झालेल्या या पवित्र भारत-मातेवर आपण असा हा पापी अश्रूंचा अमंगल अभिषेक करूं नका! आपल्या पापी डोळ्यांतून गळणारा एखादा मलीन अश्रूसुद्धां आमच्या भारतीय स्त्रीयांच्या निर्मल पातिव्रत्याला अगदीं कायमचा कलंक लावेल. माईसाहेब! कसेंही करा पण आपण हा अश्रूंचा पूर आंवरून धरा; नाहींतर, आर्य-सतींनीं आपल्या जीवाभावांनीं थाटलेला त्यांचा सनातन सुंदर संसार त्यांतून पार वाहून जाईल! खरेंच माईसाहेब! रात्र बरीच झाली. हो खरें! पण आज मला बाबासाहेबांचें औषध नाहीं का आणावयाचें? येतों मी, माईसाहेब! तो शीलाचा सर्वेश्वर आपलें रक्षण करो. (जातो.)

**लिलाः—** काय गेले! मला टाकून गेले! माझ्या जिवाच्या जिवलगा! माझ्या प्रणयचंद्रा! ही आपली लाडकी लिला आ...प...(बेशुद्ध पडते.)

**मधुकरः—** (एकदम प्र० क०) सुधा आपल्या आईच्या दगडी पुतळ्याच्या दर्शनाला येणार ह्मणून त्या पलिकडच्या लताकुंजांत मी दडून बसलों असतांना, येथें आतां कसला आवाज झाला! हें काय! अरेरे! कोणत्या बेअकली अरसिक गाढवानें हा अमुल्य अमृताचा कुंभ असा उपडा केला! छे! प्रथम या अमृताचें पान करून अमर झाल्यानंतरच इतर गोष्टींची चर्चा केलेली बरी. एकूण! परमेश्वर प्रयत्नवाद्यांचा पाठीराखा असतो असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं! (जवळ जातो.)

**लिलाः—** (बेशुद्ध स्थितींत.) मग नाथ! देतांना मला आपला प्रेमी हात?

**मधुकरः—** हो! त्याला काय हरकत आहे! लाडके लिले! मी आज तुला अगदीं निरिच्छ करून सोडतों. (तोंडाजवळ जातो.)

**लिलाः—** (शुद्धीवर येऊन.) कोण? मधुकर? आपण?

**मधुकरः**--छे! छे! लाडके! मधुकरानें या फुलांतला रस चाखून तो केव्हांच परागंदा झाला! रंगाच्या सानिध्यानें रंगण्याइतकी त्याची वृत्ति रंगेल असल्यामुळें या असल्या जात्या सुंदर वस्तुचा तो सुखास्वाद घेतल्याशिवाय कसा राहील? लिले! मी आतां तो पूर्वीचा मधुकर नसून तुझ्या अधरामृताचें पान करून अमर झालेला तुझ्यासारख्या दीनेचा मी आतां दीनानाथ आहे!

पडदा.

: अंक पहिला समाप्त. :

म. ग्रं. सं. ठाणे.
क्र. ......

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळः**—( सुधेचा दिवाणखाना. )

( सुधा वाचनांत पूर्ण मग्न असतां सत्यव्रत प्रवेश करतो. )

**सुधाः**—( पुस्तक मिटून. ) कोण भाई? तूं कां!

**सत्यव्रतः**—होय ताई! मीच तो तुझा हतभागी भाई! पण ताई? माझ्या अशा आकस्मिक येण्यामुळें तुझ्या वाचनांत आलेल्या व्यत्ययानें तुझा खरोखर रसभंग तर झाला नाहीं ना!

**सुधाः**—माझा रसभंग? आणि तो माझ्या भाईच्या येण्यानें? छे! छे! भाई! अशी गोष्ट कधींकाळीं तरी संभवेल काय? अरे! प्रत्यक्ष विधीनें विस्कटलेला माझा भातुकलीचा लग्न-संसार, ज्याच्या सानिध्य-सौख्याच्या जोरावर मला बेधडक—अगदीं उघड्या डोळ्यांनीं—पाहतां आला; इतकेंच नव्हे, तर पुण्यश्लोक मातेच्या मरणानें मला मिळालेला विद्युताघात ज्याच्या शान्तिप्रद शब्दामुळें सहन करतां आला, त्या या माझ्या लाडक्या भाईच्या येण्यानें माझा रसभंग होईल हें संभवतें तरी कसें?

**सत्यव्रतः**—ताई! तुझें बंधुप्रेम तसेंच उज्वल आणि अलौकिक आहे यांत बिल्कूल शंका नाहीं. ताई! तुझ्या तळमळणाऱ्या जीवाला समाधानाचे बोल एकवून, त्यावर प्रेमाची पुंखरें घालण्याऐवजीं, त्यावेळीं म्यां दुष्टानें बोलण्याच्या भरांत, पति-निधन आणि मातृ-मरण यासारख्या भयानक दुर्दैवांना तुझ्यापुढें निष्ठुरपणानें उभे केले, याबद्दल मला आतां त्याचे राहून

राहून वाईट वाटतें आहे! माझ्या अगदीं साहजिक पण उतावळ्या प्रश्नानें जागे झालेल्या या दारुण दुर्दैवांनीं तुझ्या जात्या कोमल मनावर केलेला हा परिणाम पाहून मला पराकाष्ठेचा खेद होतो आहे!

**सुधाः**—पण मी ह्मणतें, भाई! इतकें वाईट वाटून घेण्याचें मुळीं प्रयोजनच नाहीं; कारण, तुझ्या प्रश्नानें माझें खडतर दुर्दैव जागें होण्याला, भाई, तें आधीं झोपीं कोठें गेलें होतें? आयुष्य-पटलावर निराशेच्या कुंचल्यानें दैवाच्या कठोर हातांनीं चित्रित केलेली भेसूर लिला, निग्रही मनाच्या हट्टी स्वभावालासुद्धां दृष्टीआड करतां येत नाहीं! आणि मग मी तर बोलून चालून हृदयाची क्रिया सुरू असलेली एक अजाण अभागी पोर!

**सत्यव्रतः**—ताई! खरोखरच आह्मी अभागी! आह्मा उभयतांच्या जन्माला अशी कोणती अभद्र वेळ लागली होती कोण जाणे! प्रत्यक्ष जन्मदात्या पित्यानें आह्मा मातृसौख्यास पारख्या झालेल्या पोरक्या पोरांना निष्कारण पाण्यांत पाहावें, इतकेंच नव्हे तर, दुःखाचा कडेलोट करण्यासाठीं ह्मणून, गत-मातेच्या विरहानलांत आह्मी त्याच्या बरोबरीचीं मुलें अशीं उभीं जळत असतां त्याच्या त्या साठीं उलटलेल्या नाठाळ बुद्धीला द्वितिय-संबंधाची अक्कादाई आठवावी, यापरतें आह्मा मातृ-निष्ठ मुलांचें घोरतम दुदैव तें काय असूं शकणार?

**सुधाः**—जाऊं द्या भाई! जों जों कोळसा उगाळावा तों तों काळाच! दैवावर हवाला ठेवून प्रचलित अन्यायांना तोंड देण्याखेरीज आतां अन्यमार्ग उरलाच नाहीं.

**सत्यव्रतः**—शिवाय ताई! इतकेंही करून जरी या दुर्विपाकानें एवढ्यावरच आपला पूर्णविराम देण्याचें मनांत आणलें असतें तरीसुद्धां; ताई! स्वतःला भाग्यवान समजून घेण्याला आह्माला पुष्कळ जागा होती; पण गत-पत्नीच्या शव-संस्काराबरोबरच घिसाडघाईनें उरकून घेतलेला हा द्वितिय-संबंध, आमच्या आठवले-घराण्याची प्रतिष्ठित अब्रू थोड्याच काळांत

चव्हाट्यावर आणील अशीं स्पष्ट चिन्हें आज दिसूं लागलीं आहेत. ताई! या साऱ्या गोष्टी पाहून आईच्या तेजोमय स्वर्गस्थ आत्म्याला कोण क्लेश होत असतील!

**सुधाः**—भाई! परमेश्वराच्या साऱ्या कृती केवळ मानवांच्या कल्याणाकरतांच असतात ना! मग अशा या पोकळ निराशा-वादाला उगाच महत्व देण्यांत तरी काय अर्थ आहे? भाई! दुःखांच्या खडकांखालींच सुखाचा झरा वाहत असतो! संकटाच्या कुंपणाशेजारींच उपायांचा गराडा पडलेला असतो! भाई! असा निराश होऊं नकोस, आपले हेही दिवस निघून जातील!

**सत्यव्रतः**—ताई! सापत्न-भावानें अंध झालेल्या माईच्या मत्सरी-दृष्टीला हा प्रचलित अन्याय दिसत नसला, तरी मी ह्मणतों, तात्यासाहेबांनीं आमच्या सुख-संपन्न वाड्यांत सोडून दिलेल्या या सापाच्या पोरानें—संपत्तीच्या मदानें धुंद झालेल्या या द्रव्यांध पिशाच्चानें—या फरसबंदी हृदयाच्या खुनशी मधुकरानें आमचा कारणाविना हेवा करून, आमच्याविरुद्ध बाबांचे पितळी कान भरावेत, आणि त्या बिचाऱ्या सत्वस्थ दिनानाथावर दुराचाराचा वृथारोप करून, अजागळ जगाच्या उतावळ्या उपहासाला पात्र करण्याचा प्रयत्न करावा, असें आह्मी अगर त्या सच्छील दिनानाथानें या अवजड लक्ष्मीपुत्राचें असें काय घोडें मारलें आहे कोण जाणें! शिव शिव! असें आमचें व्यर्थ धिंडवडे होण्याइतकें, मी ह्मणतों, असें आमचें तें पूर्व-संचित तरी कोणत्या अवलादीचें होतें कांहीं कळत नाहीं!

**सुधाः**—भाई! दैवाला अभद्र शब्दांनीं संबोधल्यानें त्याचें नैसर्गिक काठीण्य थोडेंच कमी होणार आहे! मग त्याच्यावर असें वैतागून मन मानेल तसें तोंडसुख घेण्यांत तरी काय मतलब? सुधारलेल्या बौद्धीक युगांत हें खडतर नशीबाचें अवघड घोडें पुढें सारतांनां, भाई! तुझ्यासारख्या प्रयत्नवाद्याला पराकाष्ठेचें वाईट वाटत असेल; पण जेथें परिस्थितीच्याः प्राबल्याचें समर्पक निदान ठरविणारीं व्यक्ताव्यक्त कारणें, मानवी बुद्धीला आकलन करितां येत नाहींत, तेथें याच पराक्रमी प्रयत्नाला नशीबाच्या अवघड घोड्यावर

स्वेच्छेविरुद्ध स्वार होऊन, अखेरीस आपली पळवाट काढावीच लागते! ह्मणजे भाई! मी तुझ्या प्रयत्न-वादाची निंदा करतें किंवा तो तुच्छ लेखतें असें मात्र समजूं नकोस अं!

**सत्यव्रत:**—छे! छे! ताई! या तुझ्या विधानाची सत्यता मला अगदीं तंतोतंत पटते. दैव आणि प्रयत्न यांच्या विवक्षित घर्षणाखेरीज यशाची मंगल-विद्युत् चमकणार नाहीं, हें मी कबूल करितों; पण दैव-प्रयत्नाच्या द्वंद-युद्धांत प्रयत्नाची पिछेहाट होईपर्यंत, आशावादी-जीवाचें समाधान कसें होणार? बस्स! तें कांहीं नाहीं! ताई! हें दुर्दैवाचें उग्र स्वरूप आतां माझ्याच्यानें पाहवत नाहीं! हा दुःखाचा हलकल्लोळ शमविण्यासाठीं, मी त्या परम-मंगल यशोधामाच्या पूजा-यज्ञांत अगदीं शिकस्तीच्या प्रयत्नांचा हविर्भाग अर्पण करणार! ताई! या माझ्या अंगीकृत अवघड कार्यांत मला तुझी मदत मिळेल अशी आशा धरणें फारसें विसंगत नाहींना दिसणार?

**सुधा:**—विसंगत? आणि तें काय ह्मणून दिसल? भाई! समाज-सेवे-साठीं स्वतःच्या सुखाचा संन्यास करण्याच्या आह्मीं केलेल्या प्रतिज्ञा माझ्या स्मरण-पटावर अद्याप कायम आहेत. तसेंच भाई! तूं, मी, दिनानाथ आणि मधुकर अशा आह्मीं चौघांनीं आईच्या प्रेम-स्मृतीचें पुण्यस्मारक ह्मणून प्रस्थर–चौकांतल्या आईच्या प्रतिमेला साक्ष ठेवून, देशोद्धाराकरितां वाहिलेल्या शपथा, भाई! मी विसरेन तरी कशी?

**सत्य:**—ताई! भावी-आयुष्याच्या निश्चित-ध्येयासंबंधी मित्र-मंडळांत मोकळ्या मनानें चालविलेल्या चर्चेच्या दिवसाचा कोणालाही विसर पडणें शक्य नाहीं. मधुकरासारखा क्वचित एखादा चुकारतट्टूच अशा निय-माला अपवाद असूं शकतो. ताई! त्या अक्षय कान्तीप्रद सुंदर दिवसाचें स्मरण झालें ह्मणजे माझें हृदय कसें उत्साह-लहरींनीं अगदीं तुडुंब भरून येतें. अहाहा! धन्य! धन्य तो दिवस! तसेंच "सामाजिक-मांगल्याचें उदात्त-कार्य तरुणपिढीनें स्वतःच्या हातीं घेतल्याखेरीज आमचा हल्लींचा पतित-समाज पाशवी-सामर्थ्याच्या मगर-मिठींतून सजीव सुटणें शक्य नाहीं," हे आईचे मृत्यु-शय्येवरचे शेवटचे शब्द, ताई! तुला पुरते आठवतात ना?

**सुधाः**—भाई! मला ते सारे शब्द अगदीं पुरते आठवतात. आयुष्य ही भोग-भूमी नसून केवळ कर्तव्य--क्षेत्र आहे, ही दिव्य-भावना सक्रिय... आचरणांत आणणाऱ्या आपल्या आईचा दिवंगत आत्मा, शिरजोर इंद्रियांच्या आसुरी सौख्यासाठीं, माईसारख्या एका अल्लड अबलेचा स्वतःच्या कामाग्नींत बळी घेणाऱ्या दगलबाज बाबांनां पाहून काय ह्मणत असेल! बोलक्या सुधारकांनीं प्रसंग येतांच, मध्यमपद-लोपाचा स्वीकार केल्यानेंच सुधारणा-देवीचे असे हे व्यर्थ धिंडवडे चालले आहेत! भाई! ही घातकी लोकांची अवसान-घातकी प्रवृत्ति आमच्या देशाला मातीला मिळविल्या खेरीज राहणार नाहीं.

**सत्यः**—ताई! फार लांब कशाला! आमचे बाबाच पाहाना. स्वतःला सुधारकांचे आद्य-गुरू ह्मणवून घेतात! आणि सरकारी ' सर ' कीच्या आशेनें मधल्या अधिकाऱ्याशीं अधिक दळणवळण ठेवतां येण्याकरितां, स्वतःच्या मुलीचें बाशींग तिच्या लहानपणींच बांधून टाकतात! पूर्वसंचितामुळें घरीं परत आलेल्या त्या दुर्दैवी मुलीच्या मनोविकारांची कदर न बाळगतां, हे पुनर्विवाहाचे पोपटी पुरस्कर्ते, मुलीला वैधव्यानलांत पिचत ठेवून, स्वतःमात्र द्वितीय संबधाचें लोढणें गळ्यांत अडकवून घेतात हें आश्चर्य नव्हे काय? अरेरे! कोण ही पाजी स्वार्थांधता! ताई! विवाहासारख्या पवित्रतम विधीचें दैवी मांगल्य या शिरजोर समाज-कंटकांनींच नष्ट केलें आहे. विवाह! विवाह! ह्मणजे हे स्वार्थी बृहस्पती समजतात तरी काय? ताई! विवाहाची खरी व्याख्या अशी कां आहे?

**सुधाः**—( स्वगत. ) माझ्यावरील निरतिशय प्रेमामुळें विचारल्या जाणाऱ्या प्रश्नाचें भाईला भान रहात नाहीं असें दिसतें! तसें नसतें तर विवाहाच्या व्याख्येसारखा अवघड प्रश्न त्यानें माझ्यापुढें कधींच ठेवला नसता!

**सत्यव्रतः**—ताई! तूं अशी स्तब्ध आणि खिन्न कां? विवाहाची चर्चा मी तुझ्यासारख्या एका बाल-विधवेपुढें सुरू केली ह्मणून कां तुला वाईट वाटतें? बोल! बोल! ताई! तुझ्या या कर्तव्य-प्रेमी भाईला प्रस्तुत प्रश्नाचें निश्चयात्मक उत्तर मिळवून देण्यासाठीं, तुझा अनुभाविक अधिकाराचा

एकच शब्द बोल! ताई! बंधु या नात्यानें माझ्यावर पडलेलें पवित्र भगिनी-कर्तव्य मला तुझें हृत्-कपाट फोडून, अंतस्थ कडाडणाऱ्या दुःखांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याला बजावीत आहे! शिवाय ताई! मी असें विचारतों कीं, जगदीशाच्या कृपेमुळें मला तुझ्या ऋणांतून अंशतः मुक्त होतां आलें, तर तेवढेंच आत्म-समाधान माझ्या दुःखीकष्टी जीवाला नाहीं कां मिळणार?

**सुधाः**—भाई! माझ्या दुःखाच्या यथार्थ कल्पनेनें भांबावून जाणाऱ्या तुझ्या कर्तव्य-दक्ष चित्ताला माझ्यासाठीं—प्रेमळ भाईच्या या लाडक्या ताईसाठीं—एखादें अलौकिक स्वार्थ-त्यागाचें भयंकर दिव्य करण्याचा मोह पडला, तरी तसल्या असाधारण दिव्याचा सहानुभूतीनें आणि दयार्द्र अंतःकरणानें खोल विचार करण्याइतका आमचा हल्लींचा हट्टी समाज तितका समंजस आहे कोठें? श्रद्धेचें माहेरघर सोडून स्तुतिपाठकांच्या पोपटी-वनांत मांड ठोकून बसलेला हा पांचामुखीं परमेश्वर, तुझ्या तसल्या सद्-वासनेबद्दलसुद्धां तुला पढतमूर्खांच्या प्रभावळींत पहिल्यानें बसविण्याला मागें पुढें पाहणार नाहीं! नको! नको! भाई! मला माझ्या नैसर्गिक मरणानेंच मरूं दे! माझ्याकरितां, भाई! तूं समाजाच्या रोषाला पात्र होऊं नकोस! (नोकर-येतो.)

**नोकरः**—दादासाहेब, खालीं डॉक्टर वैशंपायन आले आहेत.

**सुधाः**—तर मग जा, जा, त्यांनां बाबांच्या दिवाणखान्यांत घेऊन जा. (नोकर जातो.) चल, चल, भाई! मधुकराच्या फाजील तोऱ्यामुळें आमची पितृ-सेवा तर दूरच राहिली पण दिवाणखान्याबाहेर उभे राहून डॉक्टर-मजकूर बाबांनां काय उपचार सांगतात ते तरी निदान ऐकूं चल! (जाते.)

**सत्यव्रतः**—(जातांनां) अरेरे! कोण दुःखद प्रसंग हा! असो; पण जाण्यापूर्वी ताई काय बरें म्हणाली? "माझ्या करितां भाई! तू समाजाच्या रोषाला पात्र होऊं नकोस" अरेरे! समाज! समाज!! कसला समाज!!! स्वातंत्र्य, समता आणि बंधु-प्रेम यांनां कायमचा पारखा झालेला हा एक-

हाती जुलमी समाज, समाज नसून खऱ्याखुऱ्या समाजाचा हा निव्वळ उपहास आहे! परमेश्वराचें पितृत्व आणि मनुष्याचें भ्रातृत्व सक्रिय आचरणांत आणणारा फक्त एक समाजच, समाज या नांवाची सार्थकता पटवितो. या सध्याच्या दांभिक समाजाच्या बोलघेवड्या तोंडांत तो सत्व-संपन्न सर्वेश्वर खात्रीनें एक क्षणभरही विसांवा घेणार नाहीं. विश्वबंधुत्वाची होळी करून, जाती-भेदाच्या द्वारें प्रखर विषमता अनुभवण्यास लावून, स्पर्शास्पर्शाचें सोंवळें बंड उभारणाऱ्या या अर्वाचिन स्वार्थी समाज-पुरुषावर त्या दयाघन परमेश्वराचा आरोप करून, त्याच्या निष्कलंक किर्तीला बट्टा लावण्याची माझी मुळींच तयारी नाहीं. व्यक्तीच्या वाढीला पूर्ण विरोध करून, केवळ लिंग-भेदावरून तिचा सामाजिक दर्जा ठरविणारा हा धांडुटीचा पक्षपाती समाज कोणाला आदर्शवत् होणार? ( जातो. )

## प्रवेश २ रा.

स्थळः—लिलेचा दिवाणखाना.

**दिनानाथः**—माईसाहेब! इतक्या तांतडीनें आपण मला कां बोलावलेंत? कालच्या प्रसंगाच्या पश्चात्तापानें आतां आपण पूर्ण शुद्ध झालां आहांत हेंच आनंदाचें शुभ-वर्तमान पहिल्यानें मला ऐकवण्यासाठींच ना मला इतक्या जरूरीनें बोलावलेंत? खरेंच! माईसाहेब! अंतःकरण-शुद्धीला या एका पश्चात्तापाखेरीज दुसरा कसलाच मार्ग नाहीं. माईसाहेब! आपल्या चेहेऱ्यावरील कालचा तो अनीतीचा ओसाडपणा लोपून जाऊन आज आपलें हें मुखमंडल मला कितीतरी प्रफुल्लित दिसतें आहे! सौंदर्यात सर्वेश्वराचा पुण्यांश असल्यामुळें आज आपण मला फार फार आवडत आहांत! पण माईसाहेब! आपण बोलत कां नाहीं? हा निष्ठुर अबोला सोडून देऊन आपण या आपल्या गरीब दिनानाथावरोबर प्रेमाचा एकसुद्धां शब्द नाहीं कां बोलणार?

**लिला:**—अवघा एकच का पण दिनानाथ! आपणाकरितां प्रेम-साम्राज्यांतलें सारें शब्द भांडार लुटायला माझी अगदीं तयारी आहे.

**दिनानाथ:**—माईसाहेब! आत्म्याच्या उच्च-नीचत्वावर ह्या साऱ्या गोष्टी अवलंबून असतात. कसेंही असलें तरी आज आपण मला एक चांगली गोष्ट ऐकवलींत हें फार बरें झालें! माईसाहेब! ह्याऱ्या गेल्या गोष्टींत माझा दिसलेला अनादर आपण विसरून जा आणि आपल्या कृपाछत्राखालीं मला पुनः सुखानें विसांवा घेऊं दे!

**लिला:**—पण तो क्षणिक? कां चिरकाल?

**दिनानाथ:**—अर्थात् चिरकाल! माईसाहेब!

**लिला:**—मग जनापवादाच्या भयानें डळमळणारें माझें कृपा-छत्र या गळ्यांतल्या जुन्या मंगळ-सूत्रानें तें आधीं कायमचें बांधून टाकायला नको काय?

**दिनानाथ:**—अरेरे! माईसाहेब! अखेरीस माझा तर्क खोटा ठरला! माझी चुकून दिशाभूल झाली! अज्ञानामुळें मी कावळ्याला राजहंस समजलों! परमेश्वरा! तुझ्या सत्-सृष्टीच्या या केलेल्या अपमानाबद्दल तूं मला क्षमा कर! (हात जोडून आकाशाकडे पाहे.)

**लिला:**—म्हटलें पुरे झाला हा परमेश्वराचा धांवा! भगव्या वस्त्रानें भगवंत भाळता तर हें वेदान्ताचें वेड जीव धरून अद्याप करायला राहिलें असतें! कामदेवा! ही प्रेम-लता आतां निष्ठुर हातांनीं दूर लोटूं नका! माझ्या प्रेमाच्या परमेश्वरा! तुझ्या हटी यज्ञांत, हा पहा! मी माझ्या प्रेमी जीवाचा बळी देतें. (त्याच्या पायांशीं पडतें तोंच रावबहादूर व मधुकर येतात.)

**रावबहादूर:**—(सक्रोध.) कोण दिनानाथ! आणि हें काय?

**दिनानाथ:**—(सहास्य.) हें काय? बाबासाहेब! ही आज्ञा आर्यांच्या सनातन हिंदु-धर्माची जिवाच्या मोलानें चालविलेली सात्विक जोपासना आहे! भटकलेली खालगामी चंचल चित्त-वृत्ति स्वतःच्या सामर्थ्यानें सत्स्वरूपीं स्थीर करण्यासाठीं, हा मी जपलेला महामंत्र आहे! किंबहुना, शीलाच्या सर्वेश्वराला

साक्ष ठेवून कर्तव्याच्या प्रखर प्रांगणांत हा मी केलेला पदन्यास आहे! बाबा-साहेब! हें माझ्या शीलाचें सामर्थ्य-चिन्ह! ही आपल्या प्रेमळ कृपेची प्रसाद-वृष्टि! हा त्या सच्चिदानंद--आनंदकंदाचा प्रेमळ अनुग्रह आहे! किंवा बाबासाहेब! याहूनही थोडें स्पष्टच सांगायचें ह्मटलें ह्मणजे ही माझ्या सामर्थ्याची लीला आहे!

**मधुकरः**--( कपटी आश्चर्यानें. ) काय ह्मणतोस दिनानाथ? एकूण! ( लिलेकडे बोट करून. ) ही लिला तुझ्या सामर्थ्याची अँ!

**दिनानाथः**—आणि यांत मधुकर! तुला नवल तें काय वाटलें? होय! ही लिला केवळ माझ्या सामर्थ्याची आहे!

**मधुकरः**—ऐका! ऐका! बाबासाहेब! आपल्या मवाळ मनासाठीं नसलें तरी जहाल जनापवाद चुकविण्यासाठीं, आपण आतांचा हा कवि-श्रेष्ठाचा काव्यमय कबूली-जबाब जरूर लक्षांत ठेवा. (दिनानाथाकडे वळून.) खरेंच! दिनानाथ! मनोरथांचे मोकाट घोडे स्वार्थाच्या पटांगणांत भरधांव पळत असतांना, निराशेच्या खड्यांत न पडतां इच्छित स्थलीं पोहचलेलें पाहणें फारच थोड्यांच्या नशिबीं असतें! तरीपण महाभाग कविवर! मी असें विचारतों, काव्याला आत्मा असला तरी आत्म्याला सर्वकाळीं काव्य असतेंच असा एखादा नियम आपल्या काव्य-शास्त्रांत मला आढळेल कां?

**रावबहादूरः**—मधुकर! तूं ह्मणतोस तरी काय? अरे! हा आहे तरी काय प्रकार?

**मधुकरः**—तसा कांहीं विशेष प्रकार नाहीं बाबासाहेब! हा एक आपला आत्यंतिक प्रेमाचा बालबोध परिणाम आहे!

**रावबहादूरः**—मधुकर! अशा संदिग्ध बोलण्यानें माझें समाधान होणार नाहीं. माझ्या इच्छेकरितां-नव्हे माझ्या वाढत्या उत्कंठेकरितां तुला वस्तु-स्थितीचें दिग्दर्शन केलें पाहिजे. ठेव, ठेव, बाळ मधु! जरी तो कठोर वस्तुस्थितीचा विषारी प्याला असला तरी तो माझ्यापुढें बेधडक ठेव!

**मधुकरः**—बाबासाहेब! हा आपला आग्रह अगदीं अनाठायीं आहे! आपल्या इच्छेचा असा अनादर करण्यांत, शिस्तीचा थोडा भंग झाला तरी बाबासाहेब! तसें करण्यांत व्यवहाराचें स्वारस्य मुळींच नाहीं, असें कोण बरें ह्मणेल? सत्याभिलाप आणि स्पष्टोक्ति या सद्गुण-द्वयाला व्यवहारी जगांत मिरवितांनां त्यांनां सारासार-विचाराची थोडीतरी सोबत पाहिजेच पाहिजे. तें कसेंही असो, पण बाबासाहेब! मेल्या मनाच्या एक लाजेसाठीं जरी नसलें तरी जित्या जगाचा जळता जनापवाद टाळण्यासाठीं ह्मणून, आपण प्रथम या सिद्ध—मांत्रिकानें भारून टाकलेल्या या मोहक जागेपासून, अगदीं जीवाच्या तांतडीनें तडक निघून जाऊं या! नाहींतर, या धर्माच्या लिलेची काव्याच्या कट्यारीवर सैतानी सत्तेची होणारी तोंड—मिळवणी......

**रावबहादूरः**—बस्स! बस्स कर मधुकर! एक शब्दही तोंडावाटें काढूं नकोस ( स्वगत. ) हा काय चमत्कार! कालपासून माझ्या हृदयांत डोकावणारें संशय-पिशाच्च ह्या याच्या संदिग्ध शब्दाच्या सहाय्यानें सत्य-सृष्टींत येऊं पाहत आहे! अरेरे! हा प्रकृत प्रसंग ह्मणजे कालरात्रीं या मधुकराच्या फ्रँचटनें दिलेल्या अभद्र उत्तराचा तर हा प्रतिध्वनी नसेल ना? शिव! शिव! कोण हा दैवाचा दारुण दुर्विलास! माझी लिला आणि ती........अरेरे! अपमानानें काळें ठिक्कर पडलेलें हें शरमिंदें तोंड मी आतां जगाला कसें दाखवूं? ( प्रगट. ) पण मी ह्मणतों, मधुकर! अगदीं जीवाच्या तांतडीनें येथून निघून जाण्याइतकें तुला या प्रकारांत विशेष असें काय बरें दिसतें?

**मधुकरः**—काय! बरें दिसतें! अँ?

**दिनानाथः**—माईसाहेब! सावध व्हा! सावध व्हा! हे पहा आपले बाबासाहेब येथें कितीवेळतरी उभे आहेत.

**मधुकरः**—काय दिसतें? बाबासाहेब! लग्न—बोहल्याच्या आत्मविश्वासी उंचवट्यावरून तळाशीं लपलेली ही सामर्थ्यवान मांत्रिकाची धर्माची लिला आपल्या सनातन डोळ्यांना दिसत नाहीं! दीनदुनियेचा दुबळा संसार

स्वतःच्या सामर्थ्यानें थाटण्याची याची विश्वव्यापी-कल्पना प्रकृति-भेदामुळें आपणाला जरी मानवली, तरी मानधन पौरुषाच्या सत्यप्रिय स्वभावाला तशी ती रुचेलच हा फाजील विश्वास कोणीं द्यावा? म्हणून म्हणतों, बाबासाहेब! केवळ माझ्याकरितां-या आपल्या आवडत्या मधुकरितां-आपल्या अवशिष्ट आयुष्यावर नागव्या निराशेचा भयाण पडदा पडण्यापूर्वी, आपण येथून जीवाच्या तांतडीनें निघून जाऊं या. चला बाबासाहेब! यावेळीं हा माझा शब्द ऐकांच. हूँ! विचार कसला करतां? जाऊं द्यात त्या गोष्टी! हें पहा! बाबासाहेब! चिंतनापेक्षां चिरपरिचयानेंच चमत्कारांचें चित्ताकर्षण हिणकस ठरत असतें!

**रावबहादूर:**—मधुकर! जीभेप्रमाणें, गध्या! तुझे कानही लांबू लागले. मूर्खा! या तुझ्या एकजात संदिग्ध बोलण्यानें तूं माझ्या हृदयाचा मात्र चुराडा करीत आहेस. मधुकर! माझ्या संशयाच्या पूर्तते-करतां--माझ्या ढळलेल्या मनःशांतिकरतां-माझ्या ईभ्रतीच्या इज्जतीकरतां-मी विचारलेल्या प्रश्नाचा तुला सरळ जबाब हा दिलाच पाहिजे.

**मधुकर:**—दिलाच पाहिजे? बाबासाहेब? हा सत्तेचा सौदा मला बिलकूल मान्य नाहीं. मी आपला संबंधी असलों, किंवा माझ्या वडिलांनीं-तात्यासाहेबांनीं--मरण-समयीं मला आपल्या हवालीं केलें असलें, तरी केवळ एवढ्याच स्वस्त्या सबबीवर, मी आपणाला माझ्या स्वातंत्र्याचें शरसंधान करूं देणार नाहीं! शिवाय दुसरें असें कीं, चालू प्रकाराचें एकजात अज्ञान हेंच एक आतां आपल्या मनःशांतीचें शेवटचें साधन उरल्यामुळें, त्या बिनमोल साधनाची निष्ठुरपणानें विल्हेवाट लावण्यांत, बाबासाहेब! आपल्या लाडक्या हट्टाची तात्पुरती पूर्तता होईल खरी; पण हित-चिंतकाच्या निराशे-वर उभारलेली ती मित्रद्रोहाची पातकी पताका हातीं घेऊन, या अव्वल व्यवहारी जगांत मला माझी जीवित-याला संपविणें कठीण जाईल. बाबा-साहेब! आपल्यासारखे केवळ जगण्याकरतां कां मला जगायचें आहे? शिव!

शिव! उभ्या आयुष्यांत असा हा आडवा प्रसंग पाहतांनां कच्च्या दिलाला कौतुकाच्या गुदगुल्या होत असल्या तरी मानवन माणसाच्या सत्यप्रिय स्वभावाला एका सूडाच्या रखरखीत कल्पनेखेरीज दुसरें काय सुचणार?

**रावबहादूरः**—बेशरम बेताल पोरा! हें तूं काय बरळतो आहेस?

**मधुकरः**—बाबासाहेब! बरळणारा मी नसून, ही तुमची चालूं परिस्थितीच कंठरवानें साऱ्या जगाला जाहीर करते आहे! थंड्या प्रकृतीला सूडाची रखरखीत कल्पना मानवणें जितकें दुर्घट असतें तितकेंच (खिशांतून ऱ्हॅंचेट काढून) या माझ्या त्रिकालज्ञ ऱ्हॅंचेटची आतां पोरखेळांत जमा होणें अशक्य आहे. बाबासाहेब! मृताला सजीव करणारें हें माझें ऱ्हॅंचेट कसल्याहि सत्तेच्या धाकानें दिपून जात नाहीं. मानवी-बुद्धीच्या आत्यंतिक टोंकांनां वचकत नाहीं, किंवा धर्माच्या म्यानांत लपून बसलेल्या कायद्याच्या खुनशी कट्यारीनें मरूंहि शकत नाहीं. बाबासाहेब! हे तीन पायांचें लांकडी त्रिकूट चतुष्पाद माणसाच्या हिडीस हृदयाचा पुरता ठाव लावण्यांत पुरें पटाईत असतें!

**रावबहादूरः**—अरेरे! मधुकर! आतां मात्र दुःखाचा कडेलोट झाला! हरहर! बाळ मधु! केतकीच्या कौतुकानें मी कांटेरी कुंपणांत अडकलों! विश्वबंधुत्वानें माझें जीवित मातीमोल केलें! सिध्या सौजन्यानें मला पाजी जगाचा कटु अनुभव पाजविला!

**दिनानाथः**—माईसाहेब! शुद्धीवर या! हे पहा बाबासाहेब आपली वाट पाहत कितीवेळ तरी उभे आहत! उठा! उठा! माईसाहेब! आणि मला एकदां बाबासाहेबांच्या देखत अगदीं उजळ माथ्यानें चमकूं द्या. अहाहा! खरेंच! या पहा हालूं लागल्या! (झटकन् बाबासाहेबाकडे जाऊन.) बाबासाहेब! बाबासाहेब! या पहा माईसाहेब हालूं लागल्या. आतां इतक्यांत त्या शुद्धीवर येतील; आणि मला वाटतें बाबासाहेब! आतां त्यांच्याकरितां इतकें कष्टी होण्याचें कांहीं कारण उरलें नाहीं.

**रावबहादूर:**—मधुकर! पाहिलेंस? चोर कसा अगदीं मर्मी घांव घालतो आहे तो! पाजी! बंडखोर!! सारा चोरांचा बाजार!!!

**मधुकर:**—अरे! ए बेहद नादान! तूं तोंडावाटें एक अक्षरही काढूं नकोस!

**दिनानाथ:**—नादान? कोण नादान?

**मधुकर:**—तूं-तूं नादान! बेशरम उर्मट पोरा! तूं नादान!

**दिनानाथ:**—मधुकर! असले पाजी शब्द उच्चारणारी चवचाल जीभ या तुझ्या साडेतीन हात देहाच्या मालकीचीच काय? मधुकर! मी नादान आहें असें कोण ह्मणतें?

**मधुकर:**—हें माझें त्रिकालज्ञ प्लँचेट ह्मणतें! हे तीन पायाचें लांकडी तिकूट बोलतें! हे निर्जीव छिद्रान्वेषी सत्य-सुदर्शन सांगतें! पाजी माणसा! अगम्य गोष्टींचें ज्ञान करून देऊन मानवी-कल्याणांत भर टाकण्यासाठीं जन्माला आलेल्या या त्रिकालज्ञ प्लँचटनें ( प्लँचेटनें कागदावर काढून. ) असें हे वेड्या वांकड्या शब्दांत कोंडलेलें, मूर्खा, हें तुझ्या अपूर्व नीतिमत्तेचें हें आसुरी आक्रंदन पहा! ( दिनानाथास कागद देतो. दिनानाथ तो सखेद वाचतो व रावबहादूरांचा संशय दुणावतो. )

**दिनानाथ:**—( कागद वाचून. ) अरेरे मधुकर! माझ्या निष्काम प्रेमाला पाशवी प्रवृत्तीचा पायबंद घालणाऱ्या या तुझ्या तिकालज्ञ लांगड्यानें आज मला ठार केलें. अरेरे! कोण हा विषदग्ध आरोप! ( क्षणभर मूर्च्छित. गळलेला कागद रावबहादूर घेतो. )

**रावबहादूर:**—( वाचून. ) चोर! हरामखोर! अरे ए बेसुमार पागल! नाटकी हांवभावानें इतरांनां फसविण्याचे आतां तुझे दिवस संपले! मूर्खा! पिंजारलेल्या डोळ्यांच्या विशाल वर्तुलांत यांतला हा अनीतीचा वेडा-वांकडा कबुली-जबाब सामावण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे सत्याशीं प्रतारणा करण्यासाठीं हिणकस बुद्धीनें लढविलेला कपटी डाव आहे. पाजी! बंडखोर!

**दिनानाथ:**—बाबासाहेब! काय हा अविचार! परिस्थितीच्या पेंचांत सांपडलेल्या निरपराधी प्राण्यानें आपल्या वाजवी हक्कांचें संरक्षण करणें ह्मणजे

कांहीं पाजीपणाच्या बंडाचा वावटा उभारणें नव्हे. असो! जगदीशाच्या साऱ्या कृतीवर माझा पूर्ण भरंवसा आहे. सत्याला स्मरून केलेल्या सत्व-संपन्न कर्त्तव्याबद्दल मी आतांपर्यंत जगापेक्षां त्या जगदीशालाच अधिक जबाबदार धरीत आलें आहे. आणि त्याच्याच कृपेनें लाभलेलें सात्विक आणि शुद्ध मनोबल पाठीशीं हजर असतां, बाबासाहेब! हें माझें जीवाच्या मोलानें चालविलेलें शीलाचें व्रत-पालन माझ्या विचित्र विधि-घटनेमुळें आपल्या चरणीं जरी रुजूं झालें नाहीं, तरी त्याची कदर बाळगण्याचें बिलकूल कारण नाहीं.

**रावबहादूर:**—बेशरम कृतघ्न कारट्या! तुला काळाच्या कराल कक्षेंतून काढल्याच्या उपकाराबद्दल तूं माझें चांगलें पांग फेडलेस!

**मधुकर:**—बाबासाहेब! जाऊं द्यात त्या गत-गोष्टी. केतकीच्या कौतुकानें एकदां कांटेरी कुंपणांत अडकल्यावर तळाशीं लपून बसलेल्या कृष्णसर्पाचे विखारी फुत्कार सहन करावेच लागतात!

**दिनानाथ:**—( स्वगत. ) मधुकराच्या या अकालीं मेघ-गर्जनेचा अभद्र अर्थ माझ्याइतका स्पष्ट इतरांना कळणें शक्य नाहीं; असो. ( प्रगट. ) बाबासाहेब! मधुकर! मनुष्याची नीतीमत्ता जोखण्याचें हें तुमचें अजब साधन मात्र खरोखर अपूर्व आहे! मधुकर! तुला माझी नीतीमत्ता जोखावयाचीच होती तर ती चिकित्सेच्या धारवाडी कांट्यानें कां जोखली नाहींस? बाबासाहेब! या असल्या निर्जीव लांकडाच्या पट्टीनें मनुष्याच्या नीतिमत्तेचें मोजमाप निदान यापुढें तरी घेऊं नका. मधुकर! जगांतील सत्याचा दीप नामशेष होण्याला तूं समजतोस त्याहून बराच अवधि असावा अशी माझी नम्र समजूत आहे! मानवांच्या या असल्या लांकडी कल्पनेच्या कुतर-ओढीनें मधुकर! त्या विश्व-साम्राज्याच्या प्रभूचें अधिष्ठित सिंहासन डळमळत नसते! बाबासाहेब! या आपल्या फ्रॅंचेटच्या अजब संशोधनाबद्दल मी आपली स्तुति करूं? कां हें माझ्या कर्माचें फल ह्मणून आपल्या भोळसट स्वभावाची कींव करूं?

**रावबहादूरः**—मधुकर! या कृतघ्न कुत्र्याला प्रथम बंगल्याच्या फाटकाबाहेर हांकलून दे. दिनानाथ! मी तुला इतउत्तर या माझ्या 'शान्ति-निकेतनां'त पाऊल ठेवण्याची सक्त मनाई करतो आहे.

**दिनानाथः**—बाबासाहेब! बिंदुचा सिंधु करणाऱ्या एका उपद्व्यापी व्यक्तीनें आपल्या पितळी कानांत हें कालकूट विष ओतल्यामुळें, आपल्या भोळसर स्वभावाला साध्या शून्यांत सैतानी सृष्टी दिसूं लागली! निर्लज्जपणांत निढावलेल्या असुरी व्यक्तीला असल्या हिडीस गोष्टींचें बाळंतपण करण्याला फारसे सायास पडतात अशांतला मुळींच प्रकार नाहीं. मत्सरानें पिडलेल्या दृष्टीला—द्वेषानें थबथबलेल्या राक्षसी हृदयाला—निराशा-वादामुळें स्तंभित झालेल्या नेभळट दिवाभीत-मतीला इतरांची प्रगति असह्य वाटली, जगांतल्या सौंदर्याच्या ठिकाणीं तिला अनीतीचें काळेंकुट्ट साम्राज्य दिसूं लागलें, तर त्यांत नवल कसलें? पण बाबासाहेब! ज्या पडदानशीन बुरख्या वीरानें आपल्या सडलेल्या मेंदूतून या विषारी वार्तेला जन्म दिला त्याच्या सैतानी सुरांत अविचारानें आपला आवाज मिळवून देण्यांत, आपण आज तारतम्य-बुद्धीचा खून पाडलांत असें मला दुर्दैवानें ह्मणावें लागतें आहे. तथापि बाबा-साहेब! अखिल जगाचा नियंता तो सर्व साक्षी प्रभू एखादे दिवशीं माझ्या या कृत्यावर सत्याचा दैदिप्यमान प्रकाश पाडील असा मला पूर्ण भरंवसा आहे!

**मधुकरः**—ए सत्यसृष्टींतल्या दैदिप्यमान कांद्या! हा तुझा वेडा वेदांत या बंगल्याच्या बाहेर चालूं दे. आणि मूर्खा, ( लीलेकडे वळून. ) अरे! पण हें काय? बाबासाहेब! या पहा माईसाहेब शुद्धीवर येऊन कायशा बोलताहेत!

**लिलाः**—( मुर्च्छितावस्थेंत. ) प्रणयचंद्रा! मग करतांना माझी इच्छा तृप्त? दिनानाथ! आपल्या प्रेमी अधरामृताचें पान देऊन, गडे, करणार मला अमर? बोला, जीवाच्या जिवलगा, या दीन दीनच्या दिनानाथा—माझ्या प्रेमाच्या परमेश्वरा! ह्या हतभागी जीवाशीं प्रेमाचा एकच शब्द बोला!

**मधुकरः**—चला! चला बाबासाहेब! आतां या प्रेमाच्या दरबारांत आमचें काय काम?

**रावबहादूरः**—( जातांनां. ) अरेरे आकाश कोसळलें! घात झाला! मधुकर या नत-दुष्ट नादानाला आधीं बंगल्याच्या बाहेर घालवून दे.

( उभयतां जातात. )

**दिनानाथः**—( साश्चर्य. ) सच्चिदानंद आनंदकंदा! ही तुझी लीला मात्र खरोखर अतर्क्य आहे!

पडदा.

## प्रवेश ३ रा.

स्थळः—( भग्नदंताचें घर. )

**भग्नदंतः**—( प्र० क० ) अग ए ऐकलेंस कां? अग ए! ए! ऐकलेंस कां? जरा बाहेर ये पाहूं. अग ए आलीस कां? ए! आलीस कां?

**लघुनासिकाः**—( शृंगार-साधनांसह ) हं! ही आलें! असें अगदीं सारखा जीव चाळण्यासारखें तें मेलें काम तरी काय तें कळूं द्या! हं! बोला बोला लवकर, तिकडे माझ्या सभेची वेळ भरत चालली! हं! बोला बोला लवकर आणि ऐकलेंत कां! सभा-गृहांत जर मला वेळेवर जातां आलें नाहीं, तर त्या बिचाऱ्या 'अबलोन्नति--मंडळा'ला माझ्या गैरहजरीबद्दल दुखवट्याची जादा सभा बोलवावी लागेल आणी त्या सभेंत माझ्या या गैरहजिरीची कारण-चिकित्सा सुरूं झाली ह्मणजे तुमची अब्रू उगाच चव्हाट्यावर येईल.

**भग्नदंत**:—वेडी! मूर्ख! अगदींच अपक्क! अग! आतां माझी अब्रू चव्हाट्यावर येण्याला ती आधीं शिल्लक आहे कोठें? तुझ्या लग्नाच्या लाजा-होमांत माझी लाज-लज्जा पार जळून गेली! विमा-कंपनीच्या फिरत्या एजंटांनीं

मला इतकें भंडावून सोडले असतांनाही, त्यावेळीं लाजेचा विमा उतरण्याची मला मुळीं कसली ती आठवणच राहिली नाहीं! पण कारग लघु-नासिके! पुरुषांत मिसळण्याचें हें तुझें वेड जाणार तरी केव्हां? परवां मला नकळत त्या मागल्या दारानें माधवबागेंतल्या सभेला गेलीस, ह्मणून लागलीच गवंड्याकडून तें दार लिंपून घेतलें; आणि आज तर माझ्यादेखत या दारानें बेधडक जाऊं पाहतेस! वेडे! अशा रीतीनें ही दारेबंदी करायला लावून तूं मला आणि त्या बिचाऱ्या गवंड्याला संभाजीच्या सोयराबाईप्रमाणें असें कोंडून कां मारणार? मूर्ख! वेडी! पुरी अपक्व अँ! वेडे! पति देवाचें आज्ञा-पालन ह्मणजे प्रत्यक्ष भगवंताची सेवा बरें!

**लघुनासिका**:—हें पहा! उठल्या सुटल्या पतीची प्रत्येक आज्ञा मान्य करावयाला मी ती इसवी सनापूर्वीची अगदीं कपाळभर कुंकवाची आणि दंडभर कांकणांची कां साधी भोळी जगदंबा आहे? आणि हा कुठला काढला तुह्मीं नवीन पतिदेव! बाई! बाई! बाई! एक एक ऐकावें तें तें भलतेंच! अहो! हिंदुस्थानच्या तेहतीस कोटी लोक-संख्येला अगदीं ह्मारापोरापासून तो सधन श्रीमंतापर्यंत एक एक आकबंद देव प्रत्येकाच्या वांटणीला येत असतांनां, बोकाळलेल्या अर्वाचिन धर्म-पंथाप्रमाणें आणखी ही देवाची पुन्हां पैदास कशाला? ती बिचारी देव-नगरी आकाशांतल्या अंतराळांतच आहे ह्मणून बरें आहे; नाहींतर मुंबईच्या गिरणी-कामगारांची स्थिती आज सर्वांनां आली असती!

**भग्नदंत**:—बरें बरें! बस्स कर हा तुझा फाजीलपणा! अवघ्या अडीच इयत्तेची ही अवस्था! मग साताची साडेसाती तर विचारायलाच नको! मी आपला सरळमार्गी माणूस! मला हे शिक्षित बायकोचे शिक्षेचे प्रकार काय माहित? बाबासाहेबांनीं दुसरें लग्न केलें ह्मणून 'महाजनो येन-गतः' या न्यायानें मीही रुईच्या झाडाला थोडासा वळसा घालून उगीच जरा कोठेसें हें चवथें लग्न आटपतें घेतलें! थोरांचें अनुकरण करावें ह्मणतात, तें मग सारें खोटेंच तर?

**लघुनासिका:**—बाई! बाई! बाई! शर्थ आहे बाई पुरुषांच्या पाजी पाल्हाळाची! तुमचें तें मेलें काय काम आहे तें सांगा लवकर, माझ्या सभेची वेळ भरत चालली ना?

**भग्नदंत:**—अशी काय तेथें लग्न-घटिका लागून राहिली आहे? येऊन जाऊन त्या साळकायांच्या भोळकायांच्या गोमकाल्यांत कानांत वारें शिरलेल्या स्वच्छंदी मृग-बालेसारखें मनसुराद बागडावयाचें असेल हेंच कीं नाहीं? मूर्ख! वेडी शिंची! शिवाय पुरी अपक्क! अग! मतस्वातंत्र्याचा वणवा युरोपांत पेटल्या दिवसापासून मताभिलाषी बायांनीं तेथें घातलेला धिंगाणा येथें तुला सिंह-नादानें ऐकूं येत असतां, वेडे! तुझें आपलें पूर्वीचें पावणेपांच आहेत ते आहेतच.

**लघुनासिका:**—( रिस्टवॉचकडे पाहून. ) अगबाई! आणि खरेंच घड्याळांतही बरोबर पावणेपांचच झाले! आतां काय करूं बाई? सभेच्या सुरवातिला सारी मेली पंधराच मिनीटें उरलीं. ऐकलंत कां, संध्याकाळीं मला घरीं परत यायला थोडा उशीर झाला तर परवांसारखे घर डोक्यावर घेऊन सारा गांव गोळा करूं नका अं! नीटनेटका पोशाख करून सभेला जाणें, ह्मणजे जुलमी सासूच्या अमानुष छळाला त्रासलेल्या सुनेनें जीव देण्यासाठीं एखादी खोल पाण्याची विहीर जवळ करणें नव्हे; बरें कां? राहील कां लक्षांत?

**भग्नदंत:**—राहील! राहील! चांगले लक्षांत राहील बरें! परमेश्वरा! तुला डोळे असूं दे रे बाबा!

**लघुनासिका:**—हो, नाहींतर देवघरांत शेजारच्या बुढ्या बायांचे त्या दिवसासारखें कौन्सिल बसेल ह्मणून हें मुद्दाम सांगून ठेवतें! तसेंच सकाळच्या जेवणानें तुमची रात्रीची भूक शमलीच नाहीं तर चुलीजवळच्या उघड्या पडताळांत परवां तुह्मी काढलेला तो कोळसा—खरेंच गडे! तुह्मीं तो कोळसा किती नामी काढला ह्मणतां! अहाहा! एकाच फुंकाऱ्याबरोबर

एखाद्या म्हाताऱ्याच्या जठराग्नीप्रमाणें हां हां म्हणतां तात्काळ पेट घेतो! इश्य हें काय? किती अंवट चेहरा केलांत हा! काळा-वेळाची शकुनवंती मोठी वाईट असते म्हणतात हो!

**भग्नदंतः**—पण लघुनासिके हे शकुनाचे शुभाशुभ खरें होण्याइतका मी शिकंदर भाग्याचा आहे कोठें? तसें असतें तर हें कशाला होतें!

**लघुनासिकाः**—जाऊं द्या त्याला काय करावयाचें आहे! सुखाच्या रम्य वर्तुलाभोंवतीं दुःखाचा जागता पाहरा असतो. फार लांब कशाला, खास स्त्रियांच्या सभेभोंवतीं पुरुषांचा गराडा नाहीं कां असत? म्हणून कां, इच्छित ध्येय साधूं पाहणारी खंबीर-स्त्री प्रसंगीं पुरुषांशीं खेंचाखेंची करायला मागेंपुढें कां पाहते! छट्! नांव कशाला पाहिजे!

**भग्नदंतः**—स्वर्गस्थ पंच-सतीनों! पहा ही चिकाटी! नाहींतर तुम्हीं! खेरंच! उत्कट मनोधैर्य अँ! लघुनासिके, विविक्षित धातुवर रासायनिक प्रयोग करून लोखंडाच्या भावानें सोनें विकण्याची घोर प्रतिज्ञा करणारा तुझा तो किंवडा एडीसन किंवा झाडांफुलांनां सप्रयोग हंसवून रडविणारा तो बंगालचा जादुगार जगदीश या शास्त्रसम्राटांनीं वृद्ध-वराच्या तरुण-वधूंचे मज्जातंतु हमखास कां बिघडतात याकडे आपली सारी अक्कल खर्च केली असती तर मस्तवाल आणि भांडकुदळ पोरींच्या गळ्यांतल्या मंगलसूत्रांच्या वांचलेल्या पैशानें त्या उभयतांनां अगदीं अलिकडच्या पाश्चिमात्य धर्तीवर उद्धट पोरीं करितां एक मोठें वेड्याचें इस्पितळ स्थापन करतां आलें असतें! वेडे! अतिक्रमणाला झाली तरी सीमा ही असतेच.

**लघुनासिकाः**—मेलें येऊन जाऊन या मोडक्या मंगळसूत्राच्या सहा मण्यावरच ना, ही नवरेशाहीची एवढी उडी? सहा पाव दीड. दीड रुपयावरच ना हें असें टाकून बोलणें! ऐकलेंत कां! हें आपलें मंगळसूत्र जर आपल्याला गळ्यांत बांधून घ्यावयाचेंच असेलतर माझी कांहीं ना नाहीं; देऊं कां हें काढून? मेलें हें दीड रुपयाचे तुटकें मंगळसूत्र म्हणजे कांहीं

एन, पॅावेल कंपनीचा पेवलचा सोनेरी चष्मा नव्हे! देवाच्या नांवानें हा मंगळसूत्राचा धोंडा गळ्यांत बांधल्या दिवसांपासून तो मेला देवच धोंडा होऊन त्यानें माझ्याकडे पाहण्याचें अगदीं सोडूनच दिलें. ( रडते. )

**भग्नदंतः**—अहाहा! काय हाल चालले आहेत पण अगदीं! हाड हाड जाऊन मांस मांस उरलें, डोंगऱ्याचें बालामृत करूं कां सुरूं? नाहींतर ही क्षयाची भावना विकोपाला जाईल हं!

**लघुनासिकाः**—पण माझ्यापेक्षां आपणालाच त्याची अधिक जरूरी आहे; पण सगळें मुसळ केरांत, मला आधीं मुकाट्यानें सभेला जाऊं द्या; अगबाई! माझी मद्रासी चप्पल काय झाली?

**भग्नदंतः**—लघुनासिके! प्रत्यक्ष पतीची आज्ञा उल्लंघल्याबद्दल तुला पाप लागेल बरें?

**लघुनासिकाः**—पण अवघ्या दीड रुपयांत 'पापाचें प्रायश्चित्त' घेतां येण्यासारखें असतांनां मी माझी मनीषा तरी मारूं कशाला! ( जाते. )

**भग्नदंत**:—सती सावित्री! ऐक बाई! ऐक! तुझ्या बहिणीची ही पतिनिष्ठ वाणी! हेंच खरें कीं, कालाय तस्मै नमः नमोनमः (नमस्कार करतो.)

**तीर्यकः**—( प्र० क० ) नमोनमः नमोनमः कायरे भग्नदंता! अगदीं दुरूनच नमस्कार करण्याइतका खरोखरच कां मी दुर्जन आहे?

**भग्नदंत**:—बाबारे! जेथें जगालाच नमस्कार करणेची वेळ आली तेथें सुजन-दुर्जनाचा भेद-भाव राहिला आहे कोठें? इतर वेळेचा एक राहो पण निदान सध्याचा तरी कालमहिमा तसा खास आहे!

**तीर्यकः**—अरे! असें जेव्हां तेव्हां तुला एखाद्या पिसाटाप्रमाणें चिंध्या फाडायला होतें तरी काय! शिवाय, जातांनां वहिनीही थोड्याश्या फुणफुणतच गेल्या, काय! थोडी खडाजंगी झाली वाटते?

**भग्नदंत**:—(स्वगत) परमेश्वरा! आतां माझी लाज तुलाच! (उघड.) वेड्या! नुसती खडाजंगीच नाहीं तर बुक्यांचा बैठी खुराक पांच मिनिटें

सारखा सुरूं ठेविला होता. पाहिलेंस! अजून हे हात कसे शिवशिव करताहेत ते. अरे! लकडीशिवाय मकडी वळत नाहीं. बेशरम! मस्तवाल!! भांड-कुदळ!!! चारचौघांत अगदीं बेशक तोंडाला तोंड देते! आणि ह्मणे मला चिंध्या फाडायाला काय झालें!

**तीर्थंकः**—भग्नदंता, शपथ या प्रकारांतलें मला एक अक्षरही माहीत नाहीं.

**भग्नदंतः**—मग निरक्षर गाढवा, माझ्या निर्दोष कपाळावर चिंध्या फाडल्याचा वृथा आरोप तूं आपल्या हातांनीं कां लिहिलांस! घर फिरलें ह्मणजे घराचे वांसेही फिरूं लागतात. छे! हा माझा पेटलेला क्रोधाग्नि आतां शांत होणें शक्यच नाहीं. जाऊं दे, जाऊं दे, तिला वाट फुटेल तिकडे जाऊं दे. माझ्या घरांत ह्मणून मी आतां तिला क्षणभर सुद्धां राहूं देणार नाहीं. उठल्या सुटल्या मला आपलें माहेरीं जाण्याचें भय घालते. जाऊं दे, तिचा तो त्रिक्कू बाप हिला आतां किती दिवस पोसतो तेंच मला पहावयाचें आहे. येथून तेथून सारा चोरांचा बाजार......

**तीर्थंकः**—ह्मणजे? वहिनी माहेरीं निघाल्यांत कीं काय? अरेरे! असें रुसून माहेरीं जाण्यासारखें आधीं झालें तरी काय? बोल भग्नदंता! अरे बोल काय झालें तें?

**भग्नदंतः**—पुन्हां तोंड काढतोस? बऱ्यां बोलानें तूंच एथून आधीं चालता हो नाहींतर तिच्याप्रमाणें तुझेंही मुस्कट रंगवून टाकीन. हो! सोडणार नाहीं! मितर बितर हम कुछ अबी जानता नहीं! मऊ लागलें कीं लागले कोपरानें खणायला. ( स्वगत. ) भले भग्नदंत! खाशी ठेऊन दिलीत! काय करतां! उद्धट बायकोचा जळता निखारा अस्तनींत अडकला आहे ना?

**तीर्थंकः**—तसें नव्हें भग्नदंत मी आपला.........

**भग्नदंतः**—(वेडावून.) तसें नव्हेरे भग्नदंत तर कसें रे बाबा भग्नदंत! तसें नव्हें आणि असें नव्हें. बस्स! तें कांहीं नाहीं, तिनें आपलें काळें हें

केलेंच पाहिजे. पुरे झाले हे सुधारकी चोचले. हा सारा माईसाहेबांच्या वर्तनाचा प्रताप बरें? खरोखर तर्यिका! बाबासाहेबांनीं माझा अगदीं केंसानें गळा कांपला रे!

**तीर्यक:**—तो कसारे बाबा! काय कृतघ्न मांग आहेसरे? तुझ्या-करतां चांगले हजार बाराशें रुपये खर्च करून कशी सोन्यासारखी बायको करून दिली.

**भग्नदंत:**— बस्स, बस्स. तेथेंच-तेथेंच त्यांनीं अगदीं अरबी घोड्या एवढी मोठी चूक पहिल्यानें केली! बाकी सोन्यासारखी बायको ह्मणशील, तर अस्सल हळदीनें कृष्णावधु सोन्यापेक्षांहि पिंवळी करितां येतें.

**तीर्यक:**—असें कां ह्मणतोस भग्नदंता, सुशिक्षित बायकोचा सहवास तुला घडावा ह्मणून हेंच स्थळ जुळविण्याच्या बाबतींत बाबासाहेब आणि मधुकर यांनीं थोडे थोडके कां श्रम घेतले? आणि त्यांनींच तुझा गळा कांपला ह्मणतोस हें तुला शोभते कां? अहाहारे! वेडा कुठला!

**भग्नदंत:**—बाबारे! परदुःख शीतल असते. अरे! हिचा तो सहवा-सच्च मला आतां जन्मभर नडणार आहे. शुभमंगलाच्या सावधान-चित्तानें केलेली क्षणिक चूक स्मशानांतल्या सर्पणावर विराम पावत असते. तीर्यका! असले हे वेडे वांकडे प्रश्न उपस्थित करून माझ्या मुळच्या दुःखीकष्टी हृदया-वर उगाच त्रासाच्या डागण्या देऊं नकोस बापा! कृपा करून एक क्षणभर अगदी देवासारखा गप्प बस. तुला देवाची आकृतिच पाहिजे असेल तर, ही भोळ्या सांबाची तसबिर पहा! (टांगलेली तसबिर दाखवितो. तसबिरी-कडे एकाग्रतेनें पहात असतां लघुनासिका सभेसाठीं त्यांच्या पुढून झटकन निघून जाते.)

**तीर्यक:**—(चाहूल ऐकून.) अँ! कोण! वहिनी? अरे ए! ए भग्नदंत! ह्या पहा वहिनी खरेंच गेल्या! मी असा जाऊन त्यांना आणूं कां बोलावून.

**भग्नदंत:**—वेड्या! जाऊं दे रे तिला मसणांत—

**तीर्थक:**—नाहीं पण त्या पहा, त्या पहा बऱ्याच दूर गेल्या! आतां रे भग्नदंत! पुढें कसें?

**भग्नदंत:**—पुढें कसें? तरी पण तीर्थका! पाहिलेंस! कोण बेशरम उद्धटपणा तो? अरे! जातांनां माझ्या एक राहो पण निदान तुझ्या तरी पाया-वर तिनें डोकें टेंकावयाला पाहिजे होतें ना! अरे! शिष्टाचार—चालरीत-ह्मणून कांहीं तरी कीं नाहीं? आणि तूं ह्मणतोस आणवूं कां तिला परतवून? अँ! मला काय तिचें कौतुक! प्रत्यक्ष माझ्या मित्राला ओलांडून गेली अं! वेडी! मूर्ख! शिवाय अपक्क अँ! तीर्थका! जातांनां निदान तुला जरी तिनें नमस्कार केला असता, तरी मी तिला खचित ठेवून घेतलें असतें. पण विनाशकाले विपरीत बुद्धिः ही व्हावयाचीच. तीर्थका! पाहिलास सुधारकांच्या पोरींचा कोण ताठा असतो तो!

**तीर्थक:**—तें जाऊं दे रे. पण भग्नदंता! वहिनी अगदीं सड्याच गेल्या! जातांनां वहिनींनीं आपली ती हिरवी ट्रंक आणि खोलींतली एखादी लहानशी वळकटीसुद्धां बरोबर घेतली नाहीं. रात्रीं थंडी नाहीं कां वाजणार? ट्रंक वळकटी बरोबर........

**भग्नदंत:**—ट्रंक? वळकटी? अरे! तूं माझें घर ह्मणजे काय चोराच्या जामदारखाना समजतोस? घरांतल्या नुसत्या सुतळीच्या तोड्याला तिनें जर हात लावला असतां तर तोडल्या हातांनींच तिला घराबाहेर पडावें लागलें असतें! माझा राग ती पुरता जाणून आहे. तुला वाटत असेल मी आपला आहे कांहीं तरी झालें पण माझ्यांत पाणी कांहीं और आहे. अरे! पायांतली वहाण पायांतच राहिली पाहिजे आणि त्यांतही पटेल-बिल होतां कामा नये.

**तीर्थक:**—पण गड्या! स्टेशनवर उतारूंच्या गर्दींत पोलीसांच्या लाठ्या खावून जेथें पुरुषांनां तिकीट मिळत नाहीं तेथें स्त्रियांनां सहजीं तिकीट कसें मिळणार? क्वचित् प्रसंगीं रेल्वेचे अरेरावी अधिकारी जरी अपवादादाखल

आपलें सौजन्य दाखवीत असतात, तथापि मी ह्मणतों निदान स्टेशनपर्यंत तरी मी जाऊन येतों!

**भग्नदंतः**—तीर्थका! अव्याहत चालत आलेला माझा आजपर्यंतचा स्नेह तोडून टाकण्याची तुझी इच्छा असेल तर तूं खुशाल जा, इतकेंच नव्हें तर स्टेशनपर्यंत जाण्याचें टांगा-भाडेंसुद्धां मी तुला माझ्या पदरचें देतों, पण हें तुझें काळें तोंड मला पुन्हां कधींहि दिसतां कामा नये? आहे कां तुझी तयारी. आज माझा एक स्नेही मेला असें मानण्याइतकी माझ्या मनाची तयारी आहे. तुझ्यानें करवेल कां असें धाडस?

**तीर्थकः**—राहिलें बाबा! या बाबतींत आपण एक चकार शब्दसुद्धां आतां बोलणार नाहीं, पण गड्या! असलें कांहीं अभद्र बोलूं नकोस बाबा!

**भग्नदंतः**—अरे बोलूं नको तर करूं काय? तूंच सांग बरें? अरे तीच जाऊं दे कुठें मसणांत जाते ती! अरे! पोलक्याच्या खिशांत एक फुटकी कवडी देखील नाहीं. वेड्या! तिकीटाचे अभावीं ती जातें कोठें? आपोआप नाक मुठींत धरून रात्रींच्या आंत घराकडे खात्रीनें परतलीच पाहिजे. उद्यां सकाळीं तिचा तो ओशाळलेला चेहरा तूं खात्रीनें पहाशील! बाकी एवढें खरें कीं, ओशाळलेल्या जीवाला गत गोष्टीचें स्मरण देणें थोडें न्यायाला आणि व्यवहाराला धरून होत नाहीं.

**तीर्थकः**—हें केव्हांहि बरोबरच आहे. भग्नदंता! झाल्या गोष्टीचें वहिनीला मी स्मरण देणें तर दूरच राहिलें पण ही गोष्ट माझ्या कानीं आल्याचेंही भासवीत नाहीं. तुला वाटतें मी जसा कांहीं अगदीं निर्बुद्ध दगडच आहे! अरे! उगाच नाहीं दक्षिण-काशींतल्या नगर-शाळेंत बारा वर्षें काढलीं!

**भग्नदंतः**—तूं आहेसच तसा यांत शंका नाहीं. तुझ्या ठिकाणीं जर दुसरा कोणीही असतां तर मात्र माझी खरोखर फार पंचाईत होती!

**तीर्थकः**—बरें तें राहूं द्या. पण आतां तुझें कसें होणार?

**भग्नदंतः**—अरे हीच तर आतां मित्र-प्रेमाची खरी कसोटी आहे! प्रसंगाला मित्र उपयोगी पडतो ह्मणतात! पाहूं या! आमचें नशीब कसें आहे तें!

**तीर्थंकः**—बरें तें एक असो. पण तूं आधीं संध्याकाळचा चहा तरी घेतलास कां? नसलास तर चल बघूं माझ्या घरीं. मी तुला वहिनीपेक्षां फक्कड चहा करून देतों!

**भग्नदंतः**—चल बाबा! आतां तिच्या ठिकाणीं मला तुलाच मानलें पाहिजे! त्याला कांहीं इलाज नाहीं! ( जातांना. ) फिरत्या पगडीचा माणूस ह्या जगांत केव्हांही उपाशी मरत नसतो! ( जातात. )

## प्रवेश ४ था.

स्थळः – बागेंतील आईसाहेबांचा पुतळा.

( दिनानाथ प्रतिमेची पूजा केल्यानंतर स्तवनांत मग्न. )

**मधुकरः**—( एकदम प्र० क० ) काय दिनानाथ? अद्याप तूं इथेंच? आतां मात्र धन्य आहे तुझ्या या बेशरम लोचटपणाची! वेड्या! या निर्जीव दगडी पुतळ्याच्या भोंवतीं घुटमळत राहून त्यावर फुकटच्या अश्रूंचा असा भरपूर अभिषेक केल्यानें, याच्या या फरसबंदी हृदयाला दयेचा पाझर फुटेल अशी कां तुझी कल्पना आहे? शिवाय घटकाभर मी असें ह्मणतों, या तुझ्या निराधार कल्पनेनें जरी तुझ्याकरतां सत्य-सृष्टींत उडी घेतली, तरी पश्चात्तापाच्या विदग्ध खाईंत सूडाच्या इन्धनानें पेट घेत राहिलेल्या बाबासाहेबांच्या अंतःकरणांत आतां निराळ्या विचाराचा उदय होणें शक्यच नाहीं!

**दिनानाथः**—मधुकर! बाबासाहेबांनीं मला आपला बंगला बंद केला ह्मणजे विश्वाच्या रंगणावर उभे राहण्याचा माझा नैसर्गिक हक्क नष्ट झाला असें नाहींना होत? ज्यांच्या कृपा-प्रसादामुळें, मधुकर! बाबासाहेबांच्या रोमा-

सारख्या दैवी-आपत्तीशीं झगडण्याचें हें जें मला आज अतुल सामर्थ्य आलें आहे, त्या या माझ्या परमपूज्य पालन-कर्तीच्या पवित्र प्रतिमेला माझा शेवटचा प्रेमपूर्वक प्रणाम करण्यांत होणाऱ्या कालाच्या अतिक्रमणाला जरी बेशरम लोचटपणाचें स्वरूप आलें तरी समाधानाचा सत्य-प्रकाश दाखविणारी ही अपूर्व पर्वणी मी सुखासुखी दृष्टीआड कशी करूं? नाहीं! नाहीं! मधुकर! माझ्या हातून ही गोष्ट होणें शक्यच नाहीं.

**मधुकरः**—दिनानाथ! बाबासाहेबांच्या अधिकारी रोषाचा अविचारी परिणाम प्रसंगीं कशांत होईल हें तूं पुरतें जाणतोस ना? वेड्या! पुतळ्याच्या मोहानें पस्ताव्याच्या खड्यांत पडूं नकोस!

**दिनानाथः**—मधुकर! मातृ-सौख्याचा आनंद केवळ माणुसकीलाच कळत असतो! मातेच्या रक्षणाकरितां जीवाचें लिंबलोण उतरून देहाचे पर्वत रचणारे वसुंधरेचे सत्पुत्र कोणत्याहि काळीं असतातच! सत्तेच्या भरंवशानें आणि संपत्तीच्या मदानें धुंद झालेल्या शिरजोर लोकांनीं अशा मातृभक्त लोकांचा कितीही आणि कसाही अमानुष छळ केला तरी अखेरीस विजय हा त्या सत्पुत्रांचाच होणार हें तूं पक्कें समज. मधुकर! आईसाहेबांच्या या प्रतिमेच्या दर्शन-सुखापुढें मी बाबासाहेबांच्या रोषाची कदर बाळगत नाहीं.

**मधुकरः**—पंख फुटलेल्या पक्ष्याची ही उलटी विचार-सरणी केवळ कृतघ्नतेलाच पटणारी आहे. चारचौघांत मात्र कृतज्ञतेचा लटका डांगोरा पिटवून सद्दीच्या सबबीचा जयघोष करणाऱ्या उलट्या काळजाच्या कृतघ्न मांगांना हे असले दरिद्री दगडी देव उलट मदतच करीत असतात. या दगडी पुतळ्यांच्या कल्पनेचा आद्य-प्रवर्तक, मला वाटतें, अस्सल लोंचट अवलादीचा असला पाहिजे. ए मतिमंद! हा दगडमातीचा मोह धरून स्वतःची दगडांत जमा करून घेऊं नकोस! मूर्खा! बऱ्या बोलानें आधीं बागेचें फाटक गांठ!

**दिनानाथः**—मधुकर! मी तुझ्याशीं याहून अधिक शब्द-विनियम करून वृथा कालापहरण करूं इच्छित नाहीं. आईसाहेबांच्या पवित्र प्रति-

मेच्या सानिध्यानें ह्या रमणीय बाग पावन झाला नसता तर मधुकर! अगदीं क्षणार्धाचीसुद्धां वाट न पाहतां, मी आधीं तडक बागेचें फाटक गांठलें असतें; पण मित्रा, ह्या पुण्य-प्रतिमेला शेवटचें अभिवादन करितांना, सुधाताईनें स्वतःच्या हातांनीं लावलेल्या या मनोहर लता–कुंजांना सोडून जातांना, तसेंच सत्यप्रिय सत्यव्रतानें आईसाहेबांच्या मरण-दिवसापासून वाढविलेल्या सृष्टि-सुंदरीच्या या चिमण्या बालकाला–या निशीगंधाच्या नाजुक झाडाला आंचवतांना मनाच्या होणाऱ्या दारुण यातना कोत्या बुद्धीच्या दरिद्री हृदयाला कशा कळणार?

**मधुकरः**—आणि त्या कळूं नयेत म्हणूनच तर हा माझा सारा खटाटोप आहे. दिलवर! जग जिंकूनही रडणारा शिकंदर आणि रडून जग जिंकू पाहणारा तूं, या उभयतांमधलें असलेलें जमीन-अस्मानाचें अंतर तुझ्या संस्कार-युक्त म्हणविणाऱ्या बुद्धीला यापूर्वीच पटायला पाहिजे होतें. दिनानाथ! दगडाच्या आराधनेनें कृपेचा पाऊस पाडण्याचें ते तुझे दिवस केव्हांच संपले! वेड्या! बाबासाहेबांच्या आज्ञेला मुकाट्यानें मान दे!

**दिनानाथः**—मधुकर! मला एकदां या प्रेमळ प्रतिमेचें पुरतें दर्शन घेऊं दे! या मूर्तीचें दैवी-सौंदर्य एकवटून माझ्या डोळ्यांत भरल्यानंतर पावन होणाऱ्या माझ्या दिव्य दृष्टीला माझ्या जीवन--क्रमाचा अचुक मार्ग तात्काळ सांपडणारा आहे; म्हणून म्हणतों, मधुकर! कृपा करून फक्त एकच क्षण मला या पवित्र मूर्तीकडे अगदीं बांधलेल्या नजरेनें पाहूं दे. मधुकर! हें सकल तीर्थांचें सार! हें माझ्या सुखांचें माहेरघर! हा माझ्या हृदयाचा हृदयेश्वर मला एकदां डोळे भरून पुरता पाहूं दे!

**मधुकरः**—दिनानाथ! बाबासाहेबांच्या रक्तामांसांचा अगर निकटच्या नात्याचा कोणताही संबंधी इतक्या इरसाल लोचटपणानें या निर्जीव दगडी पुतळीजवळ घुटमळत राहिला नसता. अविचारी मूर्खा! साठी उलटलेल्या त्या नाठाळ बुद्धीच्या वयातीत विश्वविद्यालयानें तुझ्या तोंडावर फुकटचा

फेंकून दिलेला तो भाकरीचा तुकडा—अधिकाऱ्यांच्या जवळ संभावित भीक मागण्याचा तो लेखी-परवाना—तें तुझें विद्वत्तादर्शक बी. ए. चें सर्टिफिकेट माझ्या कारस्थानी कपट-प्रबंधानें काळाच्या पोटांत गडप झाल्यामुळें, या तुझ्या दरिद्री पोटाच्या खोल खळगीला माध्यान्ह-भ्रांतीच्या भयानें पुढें पाऊल टाकवत नाहीं हें मी जाणतों; पण त्याला माझा नाईलाज आहे. सारस्वत! विश्वाच्या रंगणावर प्रतिष्ठेनें चढून जाण्यासाठीं आपल्याला ती पदवीची पायरी पाहिजेच होती नाहीं?

**दिनानाथः**—अरेरे! मधुकर! कोण कोती कल्पना ही! स्वत्व विसरून जुलमी सत्ताधाऱ्यांचा बोजड लंगर गळ्यांत अडकवून घेऊन, खोट्या प्रतिष्ठेनें अधिकाऱ्यांशीं केलेल्या लांगूल-चालनानें, माझ्या पोटाची ही टीचभर खळगी भरण्याकरितां मला दारोदार भीकच मागावयाची होती, तर काळ, बळ आणि संपत्ति यांचा अमोल्य बळी देऊन, त्या सदोष विश्व-विद्यालयाच्या कांतेरी चरकांतून मी कशाला गेलों असतों!

**मधुकरः**—तर मग, त्या विश्व-विद्यालयानें आपण होऊन त्या सदोष आणि टाकाऊ शिक्षणाचा जड धोंडा तुझ्या पदरीं जुलमानें बांधला अँ! अरेरे! मूर्ख बिचारें तें वयातीत विश्व-विद्यालय! नट-सम्राट! ही आपली कपट-नाटकाची नांदी आतां पुरे करा. मूर्खा! तुला पदवीचा हव्यासच नव्हता तर तिला दृष्टीआड करितांनां स्वतः सृष्टीआड झाल्याचें दुःख कां बरें झालें असतें!

**दिनानाथः**—बरोबर आहे. दुःख झालें तें माझ्या लाडक्या समाजाकरितां! मधुकर! अलिकडील सामान्य लोकांची अंध प्रवृत्ति केवळ पदवीधरांच्याच लेखनाकडे आणि भाषणाकडे विशेष ओढ न घेती, कर्त्याची कर्तबगारी केवळ पदवीच्या अक्षरांनींच मोजण्याकडे या जनता-जनार्दनाचा कल वाहिला नसता, तर हल्लींच्या सदोष शिक्षणानें मेंदूच्या होणाऱ्या एकांगी वाढीमुळें विचार आणि कल्पना शक्तींचा ऱ्हास करणाऱ्या या तुझ्या विश्व-विद्यालयाकडे मी माझा मोर्चा मुळींच वळविला नसता.

मधुकर! अवनतीच्या ओहटीस लागलेल्या माझ्या समाज-पुरुषाच्या आर्त-हांकेला मला वेळींच धांवून जातां यावें एवढ्याच पवित्र हेतूनें मी तें पदवीचें शेंपूट स्वतःला मुद्दाम जोडून घेतलें होतें. मधुकर! असें तें जात्या सदोष शिफारस-पत्र माझ्यासारख्या माणसाचें जीवित-साधन कसें होऊं शकणार? मधुकर! शिफारस-पत्राच्या प्रत्येक तुकड्याबरोबरच माझ्या निसर्ग-दत्त बुद्धीचेही तुकडे पडले असतील अशी कां तुझी समजूत आहे?

**मधुकरः**—बस्स कर! दिनानाथ! तुझ्या गतगोष्टींचा हा रडका पाढा ऐकण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. समंजस मूर्खा! बऱ्या बोलानें आपली ही धिडका आधीं या बागेच्या बाहेर पडूं द्या, नाहींतर द्वेषांध दुष्ट—बुद्धीला सुचणारे सारे आसुरी उपाय मला नाईलाजास्तव अमलांत आणावें लागतील. जगदरण्यांतील नशीबाच्या परिसाशीं हें तुझें दरिद्री डोकें घांसून घेण्यासाठीं, पाद्यपूजेसाठीं हपापलेल्या आचरट समाजाच्या लाडक्या सेवेसाठीं आपली ही मूर्तिमंत नीतीची आदरणीय विभूति फुकटच्या बोलबाल्याकरितां एकदांची संचारार्थ बाहेर पडूं द्या. हं, आटप, आटप दिनानाथ!

**दिनानाथः**—मधुकर! एकच विनंती आणि तीही पण शेवटचीच! मित्रा! प्रेम-सूत्रांत निर्व्याज भक्ति—भावानें गुंफलेली ही माझी पुष्प-माला पाहिलीस काय? मधुकर! कृतज्ञतेच्या भरलेल्या अंतःकरणानें स्वतः गुंफलेली ही माझी शेवटची सुमन-माला आईसाहेबांच्या पवित्र चरणावर प्रेमपूर्वक अर्पण करून, या माझ्या उपकार-कर्तीच्या अतर्क्य ऋणांतून मला अंशतः तरी मुक्त होऊं दे! अहाहा! हें पहा मधुकर! मालेच्या या मध्यवर्ती निशिगंधाच्या फुलाला आज आईसाहेबांच्या उच्चतम हृदय—सिंहासनावर विराजमान होतां येणार असल्यामुळें भावी विजयोत्सवाच्या भरानें याचें हें मूळचें हांसरें तोंड कितीतरी मनोहर दिसतें आहे! अहाहा! भाग्यशाली सुमन-वर! आज तूं सृष्टिसुंदरीचा कुसवा धन्य केलास! मधुकर! हृदयाची क्रिया हृदयाला कळत असल्यानें या निशिगंधाच्या निकटवर्ती मुग्ध-कलिका ह्या विजयी वीराचा

गौरव--संदेश थोड्या फार उघड झांपीनें परस्परांनां पाठवीत आहेत. निसर्ग--रमणीचें हें कोमल बालक--हें निशिगंधाचें नाजूक फूल--आज आई-साहेबांच्या हृदय-प्रीतिमुळें माझ्याप्रमाणेंच आनंदीत होणार आणि माझ्या अभागी मित्रा! तूंच एकटा मात्र तसाच राहणार अँ! अरेरे! किती खेदाची गोष्ट!

**मधुकरः**—आग लाव तुझ्या त्या दगडी आईच्या फरसबंदी हृदयाला! बेवकूब! हीं असलीं मानभावी प्रेमाचीं कुटील काव्य-गीतें त्या तुझ्या एकजात अह्लड सुधेला ऐकवून तिच्या सिध्या सौजन्याचा फाजील फायदा करून घे. पण मूर्खा! इतक्या उतावळपणानें काळाच्या कानांत हें तुझें कपटी काव्य-गूढ कशाला ओतलेस! दिडदमडीच्या नादान पोरा! या तुझ्या छिनाल आईच्या फिरत्या पायाला पायबंद घालण्यासाठीं लटक्या लाडानें हातांत घेतलेली ती घाणेरडी माळ प्रथम बागेच्या त्या वाहत्या गटारांत फेंकून दे. आणि ए अव्वल दरिद्री नादान! तुला......... ( सुधा प्र० क० )

**सुधाः**—नादान! कोणाची पागल जिव्हा माझ्या दिनानाथांनां नादान ह्मणते? कोण? मधुकर! कोणाला दरिद्री नादान ह्मणतोस? दिनानाथांनां? सद्गुणांच्या या मूर्तिमंत पुतळ्याला? या सत्यनिष्ठ शीलाच्या सर्वेश्वराला? अविचाराच्या बेअकली कांद्या! यांच्या कल्पनातीत दैवी संपत्तीची तुझ्या-सारख्या मूर्खाला काय कल्पना असणार?

**मधुकरः**—बेशरम उर्मट पोरी! रात्रीं बेरात्रीं बाबासाहेबांनीं रंग-महालांत स्वेच्छेविरुद्ध केलेल्या अप्रिय विलासांचा साहजिक परिणाम केवळ तुझ्या अनिष्ट जन्मांत झाला एवढयाच वळकट नात्यावर जर तूं हें भरपूर तोंडसुख घेत असशील तर अजाण पोरी! तुझ्या बापानें सरकारची 'सर' की मिळवितांनां सरकारशीं लढविलेले गुप्त..डाव-पेंच आणि त्यासाठीं त्यानें माझ्या अपरंपार इस्टेटीची केलेली बेकायदा अफरातफर जर मी उद्यां जाहीररीत्या प्रसिद्ध केली तर मलासुद्धां तुझ्या तोंडचें सुख भरपूर घेतां

येईल! पण अविचारी पोरी! काव्याच्या काल्पनिक सृष्टींत स्वैर संचारणाऱ्या या सुशिक्षित संबंधासाठीं तूं आपल्या आठवले-घराण्याची प्रतिष्ठित अब्रू लोकांच्या आठवणींतून नाहक गमावूं नकोस. जन्मदात्या ह्याताऱ्या बापाला त्याच्या उतार-वयांत डोंगरीची चक्की पिसायला लावून प्रेमाच्या कल्पतरूची मशागत करण्यांत कसलाच कन्याधर्म होऊं शकत नाहीं. पोरी! तूं कोणापुढें उभी आहेस याची तुला अद्याप कल्पना नाहीं!

**सुधा:**—आहे! मला त्याची पुरती कल्पना आहे! परोत्कर्ष सहन न होणाऱ्या एका द्वेषांध दुष्ट-बुद्धीपुढें, जिवलग मित्राचा अगदीं केसानें गळा कापणाऱ्या एका विश्वास--घातकी नादान नर-पशूपुढें, उपकार-कर्त्याला उलटून दंश करणाऱ्या एका विखारी सापाच्या अस्सल अवलादीपुढें मी उभी आहें, याची मला पुरती कल्पना आहे. रौप्य-नादाच्या तालावर अजागळ समाजाला नाचवूं पाहणाऱ्या कुटील लक्ष्मीपुत्रा! तुझ्या डोळ्यांवरची ही सांपत्तिक धुंदी उतरण्याची वेळ आतां अगदीं नजीक येऊन ठेपली आहे हें तूं पक्कें लक्षांत ठेव.

**मधुकर:**—शब्दशूर नाटकी पोरी! राजस्थानाचा कोणता भाग आपल्या क्षात्र-जन्मानें पावन केला ह्मणतां? वेडे! जीभेला वेडा वांकडा व्यायाम दिल्यानें हातांत शक्ती उतरत असती तर शौर्याचा सारा इतिहास केवळ कांकणी हातांनींच लिहिला गेला असता. सापाला बुद्धिपुर:सर डिवचण्यांत काव्यापेक्षां कमदृष्टीच दिसून येते. दिव्यावर झडप घालणाऱ्या अविचारी पतंगाची अखेरीस काय दशा होते हें तूं जाणतेस ना! सुधे, निकटच्या नात्याच्या पडक्या जोरावर मी या तुझ्या फाटक्या गमजा चालूं देणार नाहीं. प्रसंगीं बापाला बाप न ह्मणणाऱ्या या मधुकराचें विधान ह्मणजे काव्याची काल्पनिक कसरत नसून सत्याचा कटु इतिहास असतो!

**सुधा:**—मधुकर! दिवा आपलें अस्तित्व संपविण्यापूर्वीं असेंच क्षणिक विराट स्वरूप धारण करित असतो; तसेंच शिरावर जबाबदारीचें ओझें

नसलें ह्मणजे जिव्हा-यंत्राची वाचाळ गती अशीच अव्याहत चालत असते. मूर्खा! हा तुझा आसुरी-सामर्थ्याचा तोरा आतां फार वेळ टिकणें शक्य नाही ( वळून. ) दिनानाथ! एकूण! तुह्मी आह्माला सोडून जाणार तर?

**दिनानाथः**—होय सुधाताई! तसेंच करणें प्राप्त आहे. कारण, आतां या 'शांतीनिकेतनां'त क्षणभर वास्तव्य करणें ह्मणजे स्वतःचें मरण स्वतःच्या डोळ्यांनीं पाहणें आहे. शिवाय, स्वावलंबनाचा कष्ट--साध्य पुरुष माझी येण्याची अत्यंत आतुरतेनें वाट पहात आहे; त्याला भेटण्याची ही मधुकरानें आणून दिलेली सुसंधी माझ्या भावी आयुष्याला खालीनें गोड वळण लावील, अशी माझी मनोदेवता मला सांगते आहे. सुधाताई! त्या स्वावलंबनाच्या सुखद प्रांतांत नव्या दमानें मी पहिलें पाऊल टाकण्यापूर्वी मला आपल्या आशीर्वचनांची अत्यंत जरूरी आहे.

**सुधाः**—माझ्या आशीर्वचनांची? समाजानें त्याज्य मानलेल्या एका दुर्दैवी विधवेच्या आशीर्वचनांची? दिनानाथ! विधवेच्या अमंगल दृष्टीची सत्कार्याला दृष्ट लागूं नये ह्मणून हा सारा सोंवळा समाज पराकाष्ठेची खबरदारी घेत असतां, आपण खुद्द तिच्याच आशीर्वचनांची अपेक्षा करितां? आणि तीही एका भावी सत्कार्यासाठीं! दिनानाथ! विधवांच्या आशीर्वादांत सौभाग्याचें सिद्धि--सामर्थ्य कोठून असणार!

**दिनानाथः**—छे! छे! सुधाताई! ही आपली कल्पना चुकीची आहे! असा फरक कसा असेल? सुधाताई! एकंदर स्त्रीवर्ग ह्मणजे तर आमचा पाळणा! त्याची हयगय करूं तर पाळण्यांतच आमचें थडगें डोलूं लागेल. कोणत्याही समाजाचा इतिहास........

**मधुकरः**—अहो इतिहास-भक्तांनो! या तुमच्या ऐतिहासिक प्रेमाच्या रडकथा बागेच्या बाहेर चालूं द्यात! तुमच्या या प्रेमाच्या रडक्या सुरांत कदाचित् बाबासाहेबांच्या आज्ञेचा कडकपणा विराम पावेल. प्रणय-वीर! आतां ही आंधळी कोशिंबीर खेळण्याचें सोडून देऊन तूं येथून एकदम काळें

कर; नाहींतर ( पुतळ्याकडे बोट करून. ) या कलह-सर्वस्वाला—या तुझ्या दगडी पुतळ्याला—या तुझ्या निर्विकार दगडाच्या आईला लाथेच्या एकाच ठोकरीनें हवेंत उडवून देईन!

**सुधाः**—मधुकर! तुझ्यांत काय सामर्थ्य असेल तें सारें खर्च करून तशा कुत्सित भावनेनें या प्रतिमेकडे पाहण्याचें आधीं धाडस कर आणि नंतर तुझ्या अतुल सामर्थ्याची वृथा वाफ तोंडावाटें सोडून दे! दुरात्म्या! या प्रतिमेकडे—या माझ्या परमपूज्य मातेकडे वांकड्या नजरेनें पाहणाऱ्या तुझ्यासारख्या धाडसी चोराच्या पापी डोळ्यांची निगा कशी राहते याचा अनुभव घेण्याची तुझी इच्छा असेल तर या सत्वसंपन्न मातेच्या प्रेमळ-कन्येनें दिलेल्या आव्हानाची तूं हेळसांड करूं नकोस! मधुकर! तुझ्यासारख्या चांडाळाची चवचाल जीभ मुळासकट उपटली जाईल. तुझ्या पापी डोळ्यांच्या प्रथम खांचा होतील.

**मधुकरः**—पोरी! ही वृथा धमकी तूं कोणाला देते आहेस! या तुझ्या दगडाच्या आईकडे मी कुत्सित भावनेनें तर पाहीनच पाहीन, पण अजागळ पोरी! या तुझ्या दरिद्री दगडाला वसुंधरेशीं कल्पान्तापर्यंत गुजगोष्टी करितां याव्यात ह्मणून हें पहा! मातृनिष्ठ पोरी! या माझ्या उगारलेल्या प्रबल पायानें मी हिचें हें मस्तक आतां धडावेगळें करितों. पण बेसुमार आचरट पोरी! तुझ्यासारख्या बोलभांड पोरीशीं वितंडवाद घालून मी माझ्या पुरुषी-सामर्थ्याचें असें हें अन्यथा प्रदर्शन करूं इच्छीत नाहीं. ( मागें सरकतो. )

**सुधाः**—पराक्रमी पुरुष-सिंहा! ये. ये. असा पुढें ये. महाबल! दैत्यमणे! झंझावाताचें भय कमकुवत झाडांनां असते. गंभीर पर्वतराजींनां असत नाहीं. अविचारी अधमा! ये! ये! असा पुढें ये! अरे! बायकी भयानें असा मागें कां सरकतोस?

**मधुकरः**—बेमुर्वतखोर अविचारी पोरी! मर्यादित वर्तुळांत वावरणाऱ्या त्या नादान झंझावाताचा असह्य मारा तितका प्रखरतर नसेल पण

उन्मत्त पोरी! प्रलयकालाला लाजविणारें हें माझें स्फुलींग-द्वय साऱ्या स्थीर वस्तूंनां तर जाळीलच पण तुझ्यासारख्या शेंकडों चंचल पुतळ्यांनां त्यांच्या बेचव प्रियकरांसह जाळण्याचें त्याचे तसें अद्भुत सामर्थ्यही आहे.

**सुधाः**—मग सामर्थ्यवान नर-शार्दूला! असा हात जोडून तूं स्तब्ध कां बसतोस? आणि असा पुरुषी-थाटानें आल्या पावलीं आतां बायकी भयानें असा मागें कां सरकतोस?

**मधुकरः**—मागें सरकतो? वेडे! हें माझें मागें सरकणें नसून पुढें सरसावून जाण्यासाठीं हा मी घेतलेला नेटका जोर आहे. पोरी! वन्य-पशूंच्या हृदयांचे अचुक विदारण करितां यावें ह्मणून पारधीसुद्धां आपल्या धनुष्याची विजयी प्रत्यंचा मागेंच सारीत असतो! इच्छित सावजावर अचानक झडप घालून त्याला जागच्याजागीं जगावेगळें करण्यापूर्वी मानी मृगराजसुद्धां मागल्याच पावलीं सरकत जातो! उन्मत्त आणि धाडसी पोरी! या तुझ्या उनाड अदृश्य-शक्तीला या-तुझ्या आधुनिक नारसिंहाच्या दुसऱ्या आवृत्तीला-वारा, ऊन आणि पाऊस यांच्याशीं विनतक्रार झगडणाऱ्या या तुझ्या दरिद्री दगडी-आईला माझ्या प्रबल लत्तेच्या पहिल्याच प्रहरांत चूर्ण करतां यावें ह्मणून उद्दाम पोरी! ही पहा! ही पहा! माझ्या या सामर्थ्य-संपन्न पायानें सुद्धां आतां माघार घेतली. ( प्रहारासाठीं उचलेला पाय सत्यव्रत अकस्मात येऊन धरतो व त्यास खालीं पाडतो. )

**सत्यव्रतः**—( उरावर बसून. ) ताई! या कृतघ्न चांडाळाचा कसा चेंदा मेंदा करूं तें सांग. माझ्या वज्रमुष्टीच्या एकाच प्रहारानें याला मी यमसदन दाखवूं? कां, काळाच्या कराल हातानें याचा हा दरिद्री गळा असा दाबून याचा अस्तित्व-दीप कायमचा मालवून टाकूं? कां, याच्या नरडीवर माझ्या डाव्या पायाचा आंगठा रेटून याला पाताळांत गाडून टाकूं? कां, टांचेच्या एका ओझरत्या फटकाऱ्यानें याला अंतराळांत अधांत्री उडवून देऊं! बोल! बोल! ताई! याची कशी दशा करूं तो बोल! नरकर्म्या! तुझी

कोणती अवस्था करूं तें तूं तरी बोल! वाचाळा! मचाशीं बाष्कळ बडबडणारी ती तुझी बेताल जीभ आतां बंद कां पडली! बोल! अरे बोल!

( बुक्क्यांचा वर्षाव. )

**दिनानाथः**—सोड! सोड सत्यव्रत! गळा दाबल्यानें मधुकराचा श्वासोश्वास बंद पडला असेल. जाऊं दे! सत्यव्रत! तूं माझ्याकरितां या मधुकराला सोडून दे.

**सत्यव्रतः**—नाहीं! दिनानाथ! तुह्मी चुकतां आहांत. समाज-वाटिकें-तील हे असले अवघड कंटक कायमचे दूर केल्याशिवाय माझ्या भारत-वर्षाचा भाग्यतारा उजळ माथ्यानें केव्हांही चमकणार नाहीं. या शिरजोर चोरांची अशी गठडी वळल्याशिवाय माझ्या संत्रस्त समाजाला शांतीचा खरा लाभ होणें शक्य नाहीं. सामाजिक मांगल्यासाठीं अशा नादान नर-पशूंनां नेस्तनाबूत करून—( मधुकर पँटमधलें रिव्हाल्व्हर काढून रोखतो; सत्यव्रत मागें सरतो. )

**मधुकरः**—( उठून. ) नेस्तनाबूत? आतां कोण कोणाला नेस्तनाबूत करितो तेंच पाहूं या. मूर्खा! उतावीळपणानें एकच पाऊल पुढें टाक कीं, टाकल्या पावलाबरोबरच तूं नेस्तनाबूत झालासच ह्मणून समज. पाजी! हरामखोर! ( सगळे दचकून मागें सरकत असतां पडदा पडतो. )

**: अंक दुसरा समाप्त :**

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

स्थळः—( भग्नदंताचें घर. )

**भग्नदंतः**—( प्रवेश करून. ) मूर्ख! वेडी! पुरी अपक्व! आपली उचलली जीभ लावली टाळ्याला! कांहीं मागचा पुढचा विचार? अग! आमच्या आर्य तेजाची तुला काय कल्पना असणार? ह्मणे 'गत गोष्टी घेऊन काय करावयाच्या आहेत' वेडे! 'आह्मी आणूं मनांत तें दाऊं जनांत' असा आमचा आर्य--लौकिक आहे.

**लघुनासिकाः**—पण मनांत आणीत नाहीं इतकेंच; बाकी, जेव्हां मनांत आणतां तेव्हां अश्रू ह्मटलें कीं अश्रू! गहिंवर ह्मटला कीं गहिंवर! ही असली तुमची आर्य-धमक मला पुरती माहीत आहे: प्राचीन वैभवाच्या त्या गत गोष्टी आज काय कामाच्या? ऐकलेंत कां! तुमच्या आत्याबाईला मिशा असत्या तर मी सुद्धां काका ह्मटलें असतें!

**भग्नदंत**:—अग! माझी एक आत्याबाई जाऊंदे मसणांत पण तुझा तो सुधारक-काका तरी आपल्या ओंठावर मिशा कोठें ठेवतो आहे? मूर्ख शिंची! आह्मी जेथें लाथ मारूं शकतो तेथें पाणीच काढतो असा आमचा आर्य-महिमा आहे! उगाच 'उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशींग' आह्मी कधींच करीत नसतो.

**लघुनासिकाः**—हें मात्र मला अगदीं तंतोतंत पटतें कारण, आपण माझ्याशीं उताविळपणानें लग्न लावण्याच्या घिसाड-घाईत आपण चुकून एकदांसुद्धां गुडघ्याला बाशींग बांधल्याचें मला स्मरत नाहीं. बाकी डोक्याची मुंडावळ गुडघ्याला जरी बांधली गेली असती तरी जमिनीपासून तिची उंची कायमच राहणारी होती! हो! त्यावेळीं तुह्माला तें पेशवाईतील नानांचें

चाकोरी पागोटें मिळालें नाहीं म्हणून बरें झाले! नाहींतर ते दोन गुडघे आणि त्यांत खुपसून दिलेलें हें तिसरें डोकें अशा त्या त्रैमूर्ति दत्तात्रयाची मी विवाहित पत्नि ठरलें असतें!

**भग्नदंतः**—आणि आपल्या या बेसुमार सौंदर्याचा काय उजेड पडला आहे तो मला दिसत कां नाहीं? अग! कालान्तरानें जशी देवी अहिल्या शीलेंतून वर आली त्याप्रमाणें या तुझ्या बसक्या नाकाच्या सपाट दर्यावर शेंड्याचें शीड केव्हांतरी चमकेल अशी तुझ्या आईची फाजील खात्री होती; पण तसा दैवी चमत्कार पाहण्यापूर्वीच हें तुझें बसकें नाक वर येण्याच्या ऐवजीं ती विचारी प्रत्येक दिवसाच्या वाढत्या चिंतेनें माल वर गेली! आणि मी असा या नाकाच्या पटांगणावर परदेशी बनलों! हँ! हँ! हँ!

**लघुनासिकाः**—हँ! असें हसूं नका. ओंठाच्या तुरुंगांतून पसार झालेल्या किडक्या दांतांनीं जरी मालकाचा दंतमंजनाचा खर्च वांचविला तरी त्यांच्या बेपत्त्यामुळें या तोंडाच्या बोळक्यांत ठिकठिकाणीं खैबर खिंडीची शोभा पसरून राहिली आहे! आणि अगबाई! आधीं हा काय चमत्कार! त्या श्रीकृष्ण परमात्म्याच्या तोंडांतील विराट विश्वस्वरुप पाहून जो चमत्कार यशोदा-मातेला वाटला नसेल तो मला या बोळक्या तोंडांतील जगड्व्याळ जळमटावरून अगदीं स्पष्ट दिसतो आहे!

**भग्नदंतः**— ( कुचेष्टेनें. ) काय लघुनासिके! तुझ्या नाकाच्या शेंड्यावर अगदीं माशीदेखील ठरत नाहीं अँ! आणि माझ्यावर अशी उलटून पडायला तूं तरी अशी काय रति लागून राहिली आहेस हें दिसतेंच आहे! बेढब रतीची ही प्रथम आवृत्ति नमुन्यादाखल काढतांनां आयत्या वेळीं विधात्याला नाकाचा खिळा सांपडला नसावा असें वाटतें.

**लघुनासिकाः**—आतां मी हांसले तर माझे मात्र तेवढे दांत दिसतील हें कांहीं खोटें नाहीं तरीपण ऐकलेंत कां! सूर्य-किरणांनां बाहेरच

थोंपवून धरणारें हें रुपेरी जंगल त्या श्रीकृष्ण परमात्म्याला माहित असतें तर त्यानें आपली प्रेम स्रवणारी संगीत माधुरी त्या कुंजवनांत न वाजवितां ती यांतच बसून वाजविली असती.

**भग्नदंतः**—आणि लघुनासिके! तुझ्या नाकांतला बाल होण्याचें जरी मी मनांत आणलें तरी माझें मनांतले मांडे मनांतच राहणार! कारण तुझ्या नाकाच्या पठारीवर उभे राहिले ह्मणजे शेंड्याचा सुळका दिसण्याचें तर दूरच राहिलें पण खालच्या ओठाचा जाड पर्वत मात्र स्पष्ट दिसूं लागतो. कायग लघुनासिके! तुझ्या ह्या नासिका-घराण्याचा अगदीं शेवटचा तंतु असा कायमचा अन्तर्धान पावल्यामुळें त्या घराण्याची सारी चीजवस्त सरकारच्या गळीं उतरली असेल नाहीं? थुः थुः थुः थुः!

**लघुनासिकाः**—इश्यं! कोण घाणेरडी कल्पना ही! आपल्याला मी मुळीं आवडतच नव्हतें तर माझा असा गळा कापण्यांत तरी तुह्मांला काय प्रेम वाटलें कोण जाणे!

**भग्नदंतः**—प्रेम? लघुनासिके! तुझ्याविषयीं मला प्रेम वाटायला या तुझ्या सरळ भुंवया आड येतात ना? असो; आकाशांतल्या ग्रह-ताऱ्यांनीं वर बांधलेली गांठ खालीं कशी सुटणार? पण कायग लघुनासिके! त्या विधात्यानें माझ्या ललाटीं असें लिहिलें आहे तरी काय तें एकदां पहा बरें! (कपाळ दाखवितो.)

**लघुनासिकाः**—(पाहून.) पानपतच्या धुमश्चक्रींत जसे भाऊसाहेब परागंदा झाले त्याप्रमाणें या आपल्या कपाळावरच्या सुरकुत्यांच्या गर्दीत ती बिचारी ललाट रेषा केव्हांच नापत्ता झाली आहे! मोती गळून खुर्दा राहिलेल्या पैकींच हा प्रकार! तथापि या आपल्या उभ्या आडव्या दैवी धागाच्या काटजालांत एक बिचारी गरीब गाय मात्र कायमची अडकून राहिली आहे!

**भग्नदंतः**—बरें बरें अँ! मूर्ख, वेडी, अगदींच अपक्व! लघुनासिके! हीं हीं कुजकीं बोलणीं बरें! अग! हिंदु पति ह्मणजे तुला काय वाटतें? आणि त्याचें विधियुक्त लग्न ह्मणजे कांहीं पोरखेळ नव्हे!

**लघुनासिकाः**—आणि कसलाही पोरखेळ ह्मणजे तें विधियुक्त लग्नही नव्हे. अहो! शिथिल इंद्रियांच्या उत्तेजित वासनेकरितां लग्नमंडपांत वृद्ध खोंकडांनीं केलेला पोरखेळ ह्मणजे विधियुक्त लग्न कां समजायाचें?

**भग्नदंतः**—पण वृद्धांनीं आजन्म विधुर राहण्याचा हा तुझा हट्ट मी ह्मणतों कशाकारितां? वेडे! एकाद्या तरुणानें विधवेला हात देतांक्षणींच त्याच्या अफाट मनोधैर्याची अपरंपार बोलबाला आणि तेंच एकाद्या वृद्धानें तरुणीला आपला हात दाखविला कीं, यांचा सुधारणा-शकट मोडून जाऊन त्याचे राई राई एवढे तुकडे होतात! काय न्याय आहे पहा! मूर्ख! वेडे! सारेच अपक्व बेटे! कोण माधव? (नोकर येतो.)

**नोकरः**—(प्र० क० ) दादासाहेब आणि सुधाताई हे गेले आठ दिवस बंगल्यांत नसल्यामुळें, बाबासाहेबांना मुळींच करमत नाहीं ह्मणून त्यांनीं आपणाला आतांच बंगल्यांत बोलावलें आहे.

**भग्नदंतः**—बरें आहे आलों चल! ऐक्सलेंस! मी जरा जाऊन येतो. (सर्व जातात.)

## प्रवेश २ रा.

**स्थळः**—( मधुकराची स्टडी. )

**मधुकरः**—( स्वगत. ) पराक्रमाला अवकाश मिळत नाहीं ह्मणून धाय मोकलून चोपदरी सुरांत रडणारा तो जगत्जेता रडवा शिकंदर! सेंट-हेलीनाच्या भयाण भुयारांत स्वतःच्या अप्रयोजक बुद्धीमुळें तोंड घारून

खिचपत पडलेला तो उतावळ्या स्वभावाचा नेभळा नेपोलियन! सिंहगडाच्या पायथ्याशीं उजवा हात कलम होतांच अविचाराची ग्वाही ठोकून लंगोट्या महाराष्ट्राला चकविणारा तो सद्दीचा शेळपट शिवाजी! किंवा मालकाच्या मोकळ्या पाटावर श्रीवर्धनी सुपारी ठेवून फुकटच्या प्रतिष्ठेनें पुणेरी पगडीचें बुजगावणें अटकेच्या झेंड्यावर चुकून लटकावून देणारा तो कारवाई पेशव्यांचा घरभेदी गोतावळा! यांसारख्या कर्तृत्वशून्य, बेहिमती आणि नादान लोकांच्या नेभळट चरित्रांनीं इतिहासाची सुवर्णपानें अडविण्यांत या भेकड जगाला निराळें वळण मिळण्याची मुळींच आशा नको. कारण, नराचा नारायण होण्यांतच कृतीची कमाल समजणाऱ्या या दुधखुळ्या जगाला भोळसर विश्वासानें अकालीं जन्म दिलेल्या काल्पनिक परमेश्वराचा खेळ-खंडोबा आठवावा यांत मुळींच नवल नाहीं! पण त्या रडव्या परमेश्वराचें रत्नखचित सिंहासन पायांखालीं ठेंचून टाकून, स्वतःचें एकछत्री साम्राज्य स्थापणाऱ्या त्या कर्तबगार बुद्धिमत्तेचे गनिमी डावपेंच या अजागळ जगाला कसे कळणार? जगाचें जनकत्व बळेंच पदरीं बांधून घेऊन, स्वतः नामा-निराळ्या राहणाऱ्या त्या अट्टल परमेश्वराला त्याच्या स्वर्गीय सिंहासनावरून खेंचून काढून त्याला देशोधडीला लावण्यांतसुद्धां, मला वाटतें, त्या पाजी परमेश्वराचा फाजील सत्कार होतो आहे! मानवी पेटींतील हृदयाच्या दरिद्री चोरकप्यांत भयानें तोंड लपविणाऱ्या त्या सामर्थ्य-संपन्न ह्मणविणाऱ्या कपटी परमेश्वरानें विशाल बुद्धिमत्तेच्या तीक्ष्ण टोंकापासून स्वतःचें संरक्षण मात्र साधून घेतलें आहे. दयेच्या फक्त एकाच दंव-बिंदुनें निसत्व हृदयाचें एकदां खोबरें झाल्यावर कर्तबगार बुद्धीची खिरापत होण्याला मुळींच अवधि लागत नाहीं ह्मणून आधीं या दरिद्री हृदयाची होळी झाल्याशिवाय कार्यक्षमी बुद्धीची श्रीमंती वाढ होणें शक्य नाहीं. असें असतां, अजागळ जगा! तुझ्या स्वच्छंदी बुद्धीला तूं हा परमेश्वराचा पायबंद कशाकरितां घालतोस? (लिला येते.)

**लिला** :—स्वच्छंदी बुद्धीला हा परमेश्वरी पायबंद नकोच ह्मणतां?

**मधुकर:**—( वळून. ) कोण लिले? नको! लिले! खात्रीनें नको! प्राणा! हा परमेश्वरी पायबंद प्रेमाची आराधना करतांनां उगाच आड नाहींका येणार? जगाच्या बाजारांतला इष्काचा जहरी प्याला घेऊन धुंद बनलेल्या विलासी जीवाचा, लिले! हें तुझें परमेश्वराचें फाटकें बुजगावणें उगाच पित्त-प्रकोप नाहीं कां वाढविणार? खोट्या विश्वासाच्या डळमळीत पायावर कच्च्या दिलाच्या सोंवळ्या हातांनीं काल्पनिक वातावरणांत उभारलेली ही परमेश्वरी सृष्टि, लिले! आज नाहीं उद्यां खात्रीनें लयाला जाणार! तोंपर्यंत प्राणा! इच्छाशक्तीच्या स्वतंत्र मैदानांत मोकळ्या मनानें मनमुराद मौज मारण्या-साठीं आपण आपल्या विलासमंदीरांत खास प्रवेश करूं चल. लाडके! अशी लाजूं नकोस! वेडे! सतीच्या प्रभावळींत मोठ्या दिमाखानें मिरविणाऱ्या त्या पांच पांडवांच्या द्रौपदीची कामी दृष्ट एकदां तर त्या कमजात कर्णाला-सुद्धां झाली होती ह्मणतात!

**लिला:**—पण प्रणयचंद्रा! परमेश्वरी शपथेच्या बंधनानें गळ्यांत अडकवून घेतलेला पतीचा बोजड लंगर मला स्वैर संचार कसा करूं देईल?

**मधुकर:**—लिले! या फाटक्या परमेश्वराची तुला अद्याप भीती वाटते अँ! वेडे! दगडांत दडपल्यामुळें हृदयाच्या सांद्रींत कसा बसा जीव धरून राहिलेल्या या भित्र्या परमेश्वराची शपथ ह्मणजे कांहीं करार-पत्रावर केलेली सही नव्हे.

**लिला:**—पण नाथ! लग्नाची शृंखला आसुरी सामर्थ्यानें तोडून टाकतांनां तिच्या होणाऱ्या बेसुमार आवाजानें नीतिदेवीचे पवित्र कान बधीर नाहीं कां होणार?

**मधुकर:**—लाडके लिले! हा प्रश्न तुझा नसून तो नीति-विद्धारदांचा आहे. सौख्याचा भरलेला विलासी प्याला अधीऱ्या ओठांशीं लावून त्याचें

मनसोक्त पान करीत असतांनां मध्यें येणारी धर्माची निर्जीव काडी फेंकून दिली नाहीं तर ती प्राणासह बाहेर येईल! खरेंच! स्वातंत्र्यावांचून व्यक्तीचा तरुणोपाय नाहीं किंवा मानवी-सौख्याची खरी मशागतही नाहीं. लिले! बंधारा घातला कीं तो ओलांडून पसार होणें हा सृष्ट वस्तूंचा धर्म अगदीं ठरलेला आहे!

**लिला:**—नाथ! पण हें असलें धर्माचरण आपल्या सनातन आर्य-संस्कृतीनें आधीं मान्य नको का करावयाला?

**मधुकर:**—आर्य-संस्कृति! लिले! गुरांचीं खिल्लारीं घेऊन उत्तर-ध्रुवापासून भटकत आलेल्या या वेदकालीन ऋषींच्या रानटी वंशजांची झाली एवढी गुलामगिरी बस्स झाली.

**लिला:**—पण नाथ! विवाह-शृंखलेचा छेदन-आवाज आपल्या अन्या-याचें गाऱ्हाणें स्वर्गातल्या सुर-पतीला सांगण्यासाठीं हृदय फोडून वर जात असतांनां तो समाजाच्या तीक्ष्ण कानांत तिखट आवाज देऊन आपणा उभय-तांनां दगा नाहीं कां देणार?

**मधुकर:**—दगा! वेडी कुठली! समज; आवाजानें दगा दिलाच तर काय होईल? फारच झालें, तर वाली-सुग्रीवांची आलटून पालटून बायको होणाऱ्या सती तारेहून हा नेभळा समाज तुझी किंमत अधिक मानणार नाहीं; इतकेंच होईल ना? कुछ परवा नाहीं! वेडे! आपण मेल्यावर मागें मिरविणाऱ्या जगाचें कसें होईल याची वृथा काळजी पाहिजे कशाला? हातीं पडलेल्या विकसित पुष्पाच्या मनोहर सुगंधानें रंगेल मनाला रिझविण्याचें सोडून देऊन त्याच्या जन्म-इतिहासाची चिवट चिकित्सा काय कामाची?

**लिला:**—प्रणयसागर! स्वच्छंदी सुखाच्या अज्ञात डोहांत अशी बुडी मारतांनां मानवी कायद्याचें चिवट बंधन एखाद्या दिवशीं गळ्याला तांत नाहीं कां लावणार?

**मधुकरः**—लिले! अगदीं कसलेल्या कायदे-पंडितांचे जरी अचल नियम झाले तरी त्यांना अपवाद हा आहेच. तथापि प्यारी! चुकण्यांत माणुसकी असली तरी माणुसकींत चुकणें नसावें असें माझें स्पष्ट मत आहे!

**लिलाः**—नाथ! मनुस्मृतीचा मेलेला मामला जरी पुरुषांचा पक्षपाती एकेकाळीं होता तथापि हल्लींच्या कायद्याची करडी नजर स्त्रियांपेक्षां पुरुषांवरच अधिक आहे, आणि ह्मणूनच माझ्या वेड्या चित्ताला अशा नाहीं नाहीं त्या शंका आठवतात.

**मधुकरः**—लिले! कायद्याचा चिवट बंधनानें प्रसंगीं अपराधी जीव जरी गुदमरला तरी त्यावरून काळाचा कराल हात हमखास फिरतोच असा मुळींच नियम नाहीं! लाडके! सुरवातीची नांदी ह्मणजे जसा ऐन नाटकाचा खरा रंग नव्हे तसा मृत्यूच्या दारापर्यंतचा फेरफटका ह्मणजे त्याच्या अन्तर महालांतला खास प्रवेश नव्हे! तथापि प्रणयदेवी! कायद्यानें दाखविलेल्या या स्त्री-दाक्षिण्याबद्दल मला त्याच्या कर्त्याविषयीं मनस्वी आदर वाटतो!

**तीर्यकः**—( एकदम प्र० क० ) रावसाहेब! ठरल्याप्रमाणें आज दिनानाथ ठार झाला!

**मधुकरः**—ठार झाला! दिनानाथ ठार झाला! अहाहा! तीर्यका! आणि तो कोठें आणि कसा ठार झाला! तीर्यका! सांग सांग लवकर आणि ही त्याच्या मरणाची ही मंगल वार्ता मला त्याचा त्या चवचाल सुधेला प्रथम कळवूं दे! तीर्यका! दिनानाथ कसा ठार झाला?

**लिलाः**—दिनानाथ? कोण? आपला दिनानाथ? गडे! माझ्याकरितां तुह्मी बंगल्यांतून हांकलून दिलेला तो कपटी दिनानाथ?

**मधुकरः**—हो! हो! तोच दीडदमडीचा दरिद्री दिनानाथ! लाडके! तुझ्या प्रेमाचा बेशक अनादर करणारा तो कृतघ्न कुत्रा—सनातन हिंदु-धर्माचा तो कट्टा उपासक—त्या मस्तवाल सुधेचा तो शीलाचा सर्वेश्वर आज ठार झाला! तीर्यका! दिनानाथ कसा ठार झाला?

**तीर्यकः**— रावसाहेब! आपण सांगितल्याप्रमाणें काव्य-चंद्रिका-कार्यालयाकडे नेमक्या वेळीं परतणाऱ्या त्या दिनानाथाला मी बंडगार्डनच्या रस्त्यावर अंधारांत गांठून, या माझ्या लाठीच्या पहिल्या प्रहारानें त्याला खालीं जमिनीवर पाडल्यावर, एका धांवत्या मोटारीच्या रबरी चाकाखालीं त्याला कायमचें यमसदन दिसलें!

**मधुकरः**—तीर्यका! या तुझ्या अपूर्व कामगिरीबद्दल माझ्या लाडकीची ही आवडती मोहन-माळ मी तुला बक्षिस ह्मणून देतों. (लिला माळ काढून देते.) जा तीर्यका! मानवांच्या असल्या सेवेबद्दल परमेश्वर तुला उदंड आयुष्य देवो!

**तीर्यकः**— आणि तो देणारच. कारण परोपकार हें माझें ध्येय आहे. येतो रावसाहेब! ( तीर्यक जातो. )

**मधुकरः**—अहाहा लाडके! आजचा दिवस किती भाग्याचा! लिले कधींकाळीं मला मृत्यु यावयाचा असेल तर तो अगदीं याच क्षणीं यावा!

**लिलाः**—इश्श! हें काय! आज असें मेलें तें अभद्र काय बोलायचें?

**मधुकरः**—कां बरें? कां बोलूं नको? लाडके! याहून अधिक सौख्याचा एकादा मजेदार क्षण अद्याप या कालाच्या उदरांत असेल असें मला मुळींच वाटत नाहीं! अहाहा! अशा नाद-ब्रह्मांतच माझ्या जीवाचें बरें वाईट झालें तर या देहाचें सोनें नाहीं कां होणार?

**लिलाः**—अगबाई! कोण भयाण कल्पना ही!

**मधुकरः**—भयाण? छे! छे! प्राणा! सौख्याचा आनंदी प्याला एका हातांत घेऊन दुसऱ्या हातानें यम-दुतांशीं हस्तांदोलन करतांनां निरिच्छ मनाला कसलीच भीती वाटत नाहीं. याची तुला खातरजमा करून घ्यावयाची असेल तर प्रणय देवी! एक हात तुझ्या मानेवर टाकून दुसऱ्या हातानें ही अस्सल अवलादीची विषारी कुपी ( कुपी काढतो ) पिऊन हा पहा मी आतां जगा वेगळा होतों! ( पिण्यासाठीं खोटी धडपड. )

**लिला:**—( झटकन कुपी काढून घेऊन ) हें काय? असें काय बरें करायचें तें? नाथ! आपण असें वेडेंवांकडें बोलूं लागला कीं माझा जीव तीळतीळ तुटतो गडे! आतां नाहींना तसलें कांहींतरी अभद्र बोलायचें?

**मधुकर:**—लाडके! मी तरी काय करूं. सौख्य-नादाच्या प्रत्येक उतरत्या आवाजाबरोबर मला तुझ्या पतीची प्रतिमा चढत्या रंगात दिसते आहे! प्रिति-देवते! आपल्या सुखाच्या संसारांतला हा तुझ्या पतीचा बोथट कांटा कायमचा निघाल्यावांचून माझा विलासी जीव समाधानाच्या भांड्यांत विराम पावणार नाहीं.

**लिला:**—पण प्राणेश्वर, माझ्या पतीचा निरुपद्रवी कांटा नामानिराळा करून टाकण्याला तो, गडे! आपल्या मार्गांत आधीं येतो आहे कोठें?

**मधुकर:**—लिले! तूं चुकते आहेस! अग! चुकून टांचेखालीं सांपडलेला क्षुद्र किडासुद्धां प्रसंगीं उलटून चावत असतो.

**लिला:**—असें ह्मणतां? पण नकोच गडे! पण कां नको? ( विचार-करून. ) केवळ बाह्यांगावरून पाप-पुण्याची मोजदाद करणाऱ्या नक्कल-प्रिय जगाशीं तशीच शक्कल लढविली पाहिजे. ( उघड. ) नाथ! आपण ह्मणतां तें कांहीं खोटें नाहीं!

**मधुकर:**—अहाहा! लाडके! आज तूं सुधारणा-देवीला जन्म दिलास! स्वातंत्र्य-मंदिरांत प्रिती-देवतेची प्राण-प्रतिष्ठा केलीस! विलास-देवी! चल, चल आणि माझ्या प्रज्ञा-शक्तीच्या विजय-तोरणावर या माझ्या कुपींतल्या विखारी रंगानें तुझ्या मृत-पतीचें रंगीत चित्र कसें काढावयाचें हें तुझ्या रंगमहालांतच ठरवूं चल! (-जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ:—( रस्ता. )

( भग्नदंत व तीर्यक उलट दिशांनीं येतांनां थडक होते. )

**तीर्यक:**—नमोनम: भग्नदंत नमोनम:

**भग्नदंत:**—नमोनम: बेटा तीर्यक! नमोनम: नमोनम: पण कायरे तीर्यका! आधीं हा जगाचा कसा उलटा न्याय आहे तो पाहिलास कां? अरे! आह्मी जरा कोठेंसें उतरत्या वयांत चढत्या संख्येनें एकादें दुसरें लग्न केलें कीं लागलींच या घोंटीव ओठांच्या शिखानष्ट सुधारकांनां अगदीं जवळचा आप्त गमावल्याचें दुःख होतें! आणि तें असें कां? तर ह्मणे मुलींला अकालीं वैधव्य येऊन नीतीची जोपासना राहत नाहीं ह्मणे! हॅं! हॅं! हॅं! मूर्ख शिंचे! पुरे वेडे आणि अगदींच अपक्क बेटे! हॅं! हॅं!

**तीर्यक:**—खरेंच! गड्या भग्नदंता! आह्मी ह्मातारीं माणसें तेवढी-बरीक मरतों आणि या अविचारी तरुणांनीं जसा कांहीं त्या संहारक पशू-पती-पासून अगदीं नव्याण्णव वर्षांचा अमरपट्टा मिळविला असेल! नव्या नवाईच्या अर्ध्या हळकुंडानें हुरळून जाऊन, आह्मा पोक्तांच्या पिवळ्या जगांत हे चटोर तरुण चढेल थिल्लरपणानें बेपर्वा वावरतांनां, बोकाळलेल्या भौतिक-यंत्रांच्या टराविक अपघातांखालीं, हे-हे अविचारी तरुण रोज थोडे-थोडके कां रे दगावतात?

**भग्नदंत:**—आणि विशेषत: विश्व-विद्यालयाच्या कांतेरी चरकांतून पिळून बाहेर पडलेलीं हीं नीरस चिपाडें—हे पाप्यांचे प्रपितामह—आपल्या चिंगरलेल्या जीवाला चहाचा विषारी काढा पाजवून आणि वरती सिगारेटच्या धुरानें शेक देऊन त्याला असे किती दिवस तगवूं शकतात तें पाहूं तर खरें! शिवाय; महामारी, प्लेग, इन्फ्लुएंझा या सारख्या सर्वभक्षक क्रूर-देवतांनां जसा कांहीं या ताठर जीवाचा आडदांड बळी गळीं उतरतच नसेल! हॅं! हॅं! हॅं! मूर्ख! वेडे! बेटे पुरे अपक्क आँ!

**तीर्यक:**—भग्नदंता! इतकेंच नव्हे तर आकाशांतल्या बापाला जीर्ण-जीवापेक्षां ताठर तरुणच अधिक प्रिय असतो, असें प्रत्यक्ष धर्म-शास्त्रच सांगतें!

**भग्नदंत:**—होय ना? झालें तर मग? आतां मी असें विचारतों या इष्टाकिणी सुधारकांची ही एवढी आदळ आपट तरी कशाकरितां? नीतीच्या जोपासनेसंबधीं ह्मणशील तर गड्या तीर्यका! पैक्यासाठीं प्राण टाकणाऱ्या अगदीं कुटील वेश्यासुद्धां आह्मा ह्मातार्‍यांची भत्त्याविना साक्ष नाहीं कां भरणार?

**तीर्यक:**—बाबारे! छातीखालीं असलेला गाईचा गरीब आत्मा जसा येशूच्या उंचावलेल्या दृष्टीच्या खिसगणींत नाहीं त्याप्रमाणें या शिखानष्ट सुधारकांनां आह्मी वृद्ध-वर ह्मणजे जसे कांहीं त्यांनां रस्त्यावरचे मैलांचे निर्जीव दगड वाटतात! पण ह्मणावें बच्याजीनों! तुह्मी कितीही वाष्कळ बडबड केलींत! आजारांच्या जाहीरातींतून जन्माला येणाऱ्या रोगट पत्रांच्या संपादकीय मेजावर आपलें छपरी डोकें आपटून घेऊन, ताणलेल्या मेंदूतून कितीही आणि कसेही तारे तोडलेत तरी आह्मा पोक्तांची पुराण-प्रिय प्राचीन प्रज्ञा तुमच्या असल्या पोरकट प्रकारांनां मुळींच हार जाणार नाहीं!

**भग्नदंत:**—वाहवा! शाबास! जीते रहो पठे! तीर्यका! सुधारकांच्या त्या मुद्यारहित मार्मिक टीकेला आधीं विचारतो तरी कोण? यांनीं कितीही सभा बोलावल्या! बंद तुटलेल्या अंगरख्यांनीं भीमदेवी आवाजांत कसलेही ठराव पास करून घेतले! किंवा एकाद्या गुलेलू साहेबांच्या खासगी बंगल्यांत रावसाहेबांच्या पानावरचा उष्टा वडा एकादा नामदारानें चारून खाल्ला तरच कांरे हा समाजाचा संसार-शकट बिनधोक चालणार आहे? मूर्ख! अगदींच वेड! आणि तसेंच पुरं अपक्क बेटे!

**तीर्यक:**—खरेंच! गड्या भग्नदंता! हे शहाणे सुधारक जर उद्यां शय्याशायी झाले तर आमच्या राष्ट्राचा संसार कसा चालणार कोणाला ठाऊक!

**भग्नदंत:**—पण कायरे तीर्यका! या सुधारकांप्रमाणें आपणालाही जगाच्या पुढें येण्याचा कोणताच कां मार्ग नाहीं?

**तीर्थंकः**—गड्या भग्नदंता! पाठीमागें जगाचा नकाशा लावून घेऊन स्वतः आपण पुढें येण्याखेरीज तुर्त तरी अन्य मार्ग मला कांहीं आठवत नाहीं! स्वस्त्या संपादकाच्या अल्पजीवी खुर्चीवर आपलें हें पद्मासन ठरणार कसें? खादी टोपी ह्मणशील तर ती आपल्या डोक्याला बसेल असें वाटत नाहीं. तथापि गड्या! जगाच्या पुढें येण्याचा अद्याप एक मार्ग उरला आहे पण. .........

**भग्नदंतः**—अरे पण काय?

**तीर्थंकः**—पण तुला अशा ह्मातारपणीं तो धारवाडचा डोंगर चढवेल कीं नाहीं याचो मला शंकाच आहे! हूँ! हूँ! हूँ शिवाय मीं असें विचारतों, जगाच्या पुढें येण्याची ही अवदसा तुला आधीं आठवते तरी कशी?

**भग्नदंतः**—बाबारे! तुझें सरळ आहे! परदुःख शीतळ असतें. तुला यावेळीं विनोद आठवावा हें रास्त आहे बाबा! अरे! एकावर एक अशी अकरा संकटें येऊं लागलीं ह्मणजे त्या व्यक्तीचे तीन तेरा नऊ अठरा वाटेल त्या चोरापोरानें करावें हें उघडच आहे!

**तीर्थंकः**—अहो आंकडेशास्त्री! अशा हातचलाखीनें मी आतां फसणार नाहीं. भग्नदंता! 'वाङ्मय विहार मंडळा' ला माझ्या मालकाचा खासगी खुराक बंद झाल्यामुळें जगाचा पुढें येण्याचा जरी तुझा मार्ग बंद झाला तरी भोळ्या माईसाहेबांनां फर्लांगी थापा मारून या तुझ्या वर्तुलाकार पोटांत घृतकल्या मधुकल्या सारून देण्याचा तुझा जन्मसिद्ध हक्क तूं केव्हांही गमावणार नाहींस हें मी जाणून आहे. मग माझ्याशीं असें हें नागपुरी-नाटक कां बरें?

**भग्नदंतः**—बाबारे! मधुकरांच्या दिमतीला तुला तात्यासाहेबांनीं ठेवल्यापासून तुझी तैनात दिवसेंदिवस सारखी वाढते आहे तेव्हां तुला दुसऱ्याला हिणवायला काय जातें? मधुकराची पडेल ती कामगिरी पार पाडण्यांत तुझा हातखंडा असल्यामुळें त्या लक्ष्मीपुत्राची लक्ष्मी तुझ्याकडे

आपण होऊन चालून येते; पण माझ्यावर रोज चाल करून येणारी घरची लक्ष्मी माझ्या हातावर खंडा देऊन वाटेल ती कामगिरी पार पाडते एवढाच काय तो तुझ्या माझ्यांतला अन्तर आहे! म्हणून म्हणतों, असें बायकोच्या नांवानें स्वतःला फुंकून घेण्यापेक्षां—स्वस्त्या भावानें कां होईना पण-अगदीं स्वतंत्र-रीत्या जगाच्या पुढें यावें असें मला अलिकडे फार वाटूं लागलें आहे!

**तीर्यकः**—वेडा कुठचा! अरे! अशा म्हातारपणीं जगाच्या पुढें येऊन पुढच्या जगाच्या त्या असाधारण निंदेला उगाच पात्र कां होतोस? अरे! बायकोच्या आड लपलेल्या दशरथाला म्हणे परशुरामाचे बाण शिवले नाहींत!

**भग्नदंतः**—बाबारे! तूं जर एकाद्या फटाकड्या बायकोचा म्हातारा नवरा असतास तर माझ्या या चालू दुःखाची--जरी यथार्थ नसली तरी निदान ओबडधोबड तरी--कल्पना तुला आली असती; पण तूं पडलास मसीदींतला फकीर! तेव्हां त्याचें तुला काय बाबा!

**तीर्यकः**—खरेंच भग्नदंता! बायकोचा नवरा होणें माझ्या नशीबांत त्या काटकसरी विधात्यानें लिहिलें असेल कांरे? जिवंतपणीं तो सोहळा अनुभवण्यास मिळेल तर बरें होईल म्हणतों.

**भग्नदंतः**—नकोरे बाबा! त्यापेक्षां हातोहात जगावेगळा झालास तरी मला त्याचें बिलकूल वाईट वाटणार नाहीं! बाळ तीर्यका! तूं क्षयानें झिजून मेलास तरी सर्पणावर तुझ्या हाडांनां थोडें तरी मांस चिकटलेलें असेल पण बाळ! एकदां कां बायकोला चिकटलास म्हणज मांस तर बाजूसच राहिलें पण जिवंतपणी हाडांची पुरती राखसुद्धां तुझ्या हातीं सांपडणार नाहीं! नको—नकोरे बाबा! त्यापेक्षां एकादा सोमल खा! बचनागाची कांडी चाव! किंवा अस्सल अवलादीच्या सापाकडून खुशाल दंश करून घे! पण या लग्नाच्या बोहोल्यावर चढून तो पापाचा पर्वत मात्र [illegible] नकोस रे बाबा!

**तीर्यक:**--भग्नदंता! भरल्या पोटावर हे तुला उपदेशाचे ढेंकर येतात झालें! अरे! असेंच जर असतें तर लग्नाचा हा एवढा विश्वव्यापी पसारा कशाला माजून राहिला असता! शिवाय, मी तुला असें विचारतों असेंच जर आहे तर तूं कां नाहीं आपल्या बायकोला सोडून देत?

**भग्नदंत:**—तिला सोडायला ती आधीं माझ्या हातीं आहे कोठें? सोडून जाण्याची तिची एक तयारी नसली तरी तिच्या तडाख्यांतून जीवानिशीं सुटून जाण्याला मी अगदीं एका पायावर तयार आहे. बेटा तीर्यका! सर्पिणीनें गिळलेलें माणिक हरएक प्रयत्नानें एकवेळ बाहेर काढतां येईल पण सप्तपदीच्या होम-धुरापलिकडे वावरणाऱ्या डाकिणीनें एकदां झपाटलेला नवरा सही सलामत जिवंत राहणें अशक्य असतो! आणि त्यांतल्यात्यांत अर्धवट सुशिक्षित बायकोशीं प्रसंग असला तर शेणीच काय त्या तेवढ्या घांटावर जायाच्या राहिलेल्या असतात!

**तीर्यक:**—भग्नदंता! तुला प्रत्येक गोष्ट फुगवून सांगण्याची अगदीं लहानपणापासून संवय असल्यामुळें या तुझ्या पोंचट विधानावर माझा मुळींच विश्वास बसत नाहीं.

**भग्नदंत:**—बाबारे! यांतलें एक अक्षर देखील खोटें नाहीं! तीर्यका! जगाकडे पाहण्याच्या बाबतींत तुझी दृष्टी मुळापासून बदललेली; तेव्हां तुला माझें बोलणें खरें कसें वाटणार? अरे! शयन-गृहांतल्या शेजेवरच्या शवाला त्याच्या कानांत दिलेला दीर्घ मंत्राग्नि दिवसभर सारखा पेट घेत राहतो आणि रात्रीच्या अग्नीच्या भयानें घराला रामराम ठोकला तर प्रत्यक्ष घरालाच आग लागण्याचा बराच संभव असतो! अरे पण हें काय? हा हलकल्लोळ कसला?

**तीर्यक:**—( कान देऊन. ) भग्नदंता! घात झाला! आकाश कोसळलें! बाबासाहेब आह्माला दुःखांत लोटून आपण चालते झाले (रडतो.)

**भग्नदंतः**—( रडत. ) बेटा तीर्यका! काय दारुण प्रसंग हा! बाबा-साहेबांनीं आह्मास असे दूर लोटून आपण एकटेच चालते झाले ना? हर हर! परमेश्वरा! तुला हें खपतेंना?

**तीर्यकः**—उगी! उगी! बाळ! भग्नदंता! हें जगाचें गाडें असेंच बाबा-चालायचें! आज बाबासाहेब गेले! उद्यां तूं जाणार! परवां असेच कोणीतरी जाणार! मिळून काय हीं सारींच जाणार झालें!

**भग्नदंत**:—तीर्यका! बाबासाहेबांच्या मरणानें माईसाहेब उघड्या पडल्या. त्यांच्यावर प्रेमाची पांखर घालायला माझ्याशिवाय त्यांनां आतां मायेचा माणूस कां उरला आहे? बेटा तीर्यका! बाबासाहेबांच्या या मरणामुळें आज माझा एक बळकट आधार तुटला आणि अशा या ह्यातारपणीं आतां माझें कसें होणार!

**तीर्यकः**—वेड्या! बंगल्यांत जाऊन आधीं त्या निराधार विधवेला विचारूं चल! चल! चल! बाळ! हा एक तुझ्यावर नवीनच प्रसंग आहे! परमेश्वर-कृपेनें तूं यांतूनही पार पडशील बरें!

**भग्नदंत**:—परमेश्वर करो आणि तुझ्या तोंडांत तशी साखर पडो!

(जातात.)

---

# प्रवेश ४ था.

**स्थळः**—( काव्य चंद्रिका-कार्यालय. )

**सुधाः**—अगबाई! अजून दिनानाथ कसे येत नाहींत? आणि भाई तिकडे गेला तोही अद्याप कसा येत नाहीं? पण अगबाई! हा आवाज कसला! दिनानाथ आले वाटतें! कोण? दिनानाथ?

**मधुकरः**—कुठला दिनानाथ?

**सुधाः**—कोण? मधुकर! तुह्मी? आणि इथं! आणि तें अशा अप-रात्रीं? दिनानाथांचा ठावठिकाणा तुह्मांला लागल्यामुळें ती आनंदाची

ही तमी सांगून आह्माला लाजविण्यासाठीं तुह्मी मागचें वैर विसरून स्वतः अशा अपरात्रीं इथं आलांत ना? आहेत ना माझे दिनानाथ खुशाल! तुह्माला ते कोठें भेटले? आणि इतके दिवस ते होते कोठें? शिवाय, माझ्याविषयीं ते आपणाजवळ काय ह्मणत होते? ते तुमच्याबरोबर येत असतांना अशा अंधाऱ्या रात्रीं वाटेंतच कां थांबले? बोला मधुकर! कोठे आहेत माझे दिनानाथ?

**मधुकर**—दिनानाथ? दिनानाथ खुशाल आहे! त्याच्याविषयीं चिंता करण्याचें आतां बिलकूल कारण नाहीं!

**सुधाः**—पण ते आहेत तरी अशा कोणत्या ठिकाणीं?

**मधुकरः**—बाबासाहेबांच्या खास देखरेखीखालीं दिनानाथ अगदीं खुशाल आहे! मुळांपासूनच त्याचा बाबासाहेबांच्याकडे ओढा! तेव्हां साहजिकच त्यांच्या बरोबर तोही निघून गेला.

**सुधाः**—ह्मणजे? बाबा कोठें निघून गेले? त्यांची बदली बिदली तर झाली नाहीं ना? माई आहे ना खुशाल? मधुकर! नशीबाच्या गोत्यानें आह्मी बाबांच्या चरण-सेवेला आंचवलों! जातेवेळीं बाबांनीं सत्यव्रताची विचारपूस केली ना? पण मधुकर! बाबांची कोणत्या गांवीं बदली झाली? पेन्शन घेऊन घरीं स्वस्थ बसण्याचें सोडून देऊन अशा ह्मातारपणीं ही दगदग त्यांनां मानवेल कां? मधुकर! बाबांची कोणत्या गांवाला बदली झाली ह्मणतां?

**मधुकरः**—कोणत्या गांवाला? देवगडला! तेथें येथल्या इतकी दगदग असणार नाहीं, असें वाटल्यावरून ते येथून निघून गेले. जातांना त्यांनां मनस्वी दुःख झालें यांत शंका नाहीं! सत्यव्रताची आठवण तर त्यांनां क्षणोक्षणीं होत होती. पण जातांनां त्यांनीं कोणालाही बरोबर घेतले नाहीं.

**सुधाः**—ह्मणजे? मग दिनानाथ बाबांच्याकडे गेले कसें?

**मधुकरः**—कांचन-खिंडींतल्या सृष्टी-सुंदरीचें अवलोकन करून ह्या काव्य-चंद्रिका-कार्यालयाकडे परतणाऱ्या दिनानाथाला बंडगार्डनच्या रस्त्यावर बाबासाहेबांच्या प्रयाणाची हकीगत समजली आणि बाबासाहेबांच्या सेवेसाठीं ह्मणून त्यानें येथूनच पोबारा केला!

**सुधाः**—पण आम्हाला कांहींएक न कळवितां ते तिकडे परस्पर गेले कसें?

**मधुकरः**—मला वाटतें, आपणाला कळविण्याला त्या बिचाऱ्याला अवकाश मिळाला नसावा.

**सुधाः**—मग ते नेमके देवगडलाच गेले हें तरी कशावरून.

**मधुकरः**—तें मला नक्की माहीत आहे. शिवाय त्याला देवगडला पोहोंचविणारा माणूस माझ्या पक्क्या ओळखीचा आहे. त्याचें खुशालीचें पोहोचविणें समजावें ह्मणून पोंहोंचविल्याची खुशाली मला माझ्या खिशांतून द्यावी लागली.

**सुधाः**—एकूण तेथें कां होईनात, पण दिनानाथ खुशाल आहेत तर!

**मधुकरः**—अगदीं सुखांत आहे. प्रसंगविशेषीं तो आपणाला तिकडे लवकरच बोलावील असा माझा सूर वाहतो!

**सुधाः**—खरेंच! माझ्याशिवाय त्यांनां क्षणभर देखील गमणार नाहीं हें अगदीं सूर्य-प्रकाशाइतकें स्पष्ट आहे. देवयानीच्या प्रेमळ हांकेबरोबर कचराज जसे शुक्राचार्यांचें पोट फाडून बाहेर आले, तसे माझे दिनानाथ काळाच्या पोटांत असले तरी माझ्या हांकेबरोबर येथें खास येतील! तें असो; पण मधुकर! माई एकटीच कां बंगल्यांत? त्यांनां अगदीं गमत नसेल नाहीं?

**मधुकरः**—पण करणार काय? केवळ माझ्या विश्वासावर त्यांनीं बाबासाहेबांची देवगडला रवानगी केली!

**सुधाः**—पण मी ह्मणतें, माई तिकडेच गेल्या असत्या तर काय बिघडत होतें?

**मधुकरः**—त्या पुष्कळ गेल्या असत्या! पण जाणार कशा? तितकेंही करून त्यांनीं जाण्याचें धाडसच केलें असतें तर मात्र गोष्ट निराळी होती! येथल्यापेक्षां तेथल्या सुखसोई अधिक नसाव्यात, अशी त्यांची प्रामाणिक समजूत आहे!

**सुधाः**—पण मधुकर! त्यांच्या जाण्यानें बाबांनां तेवढाच विरंगुळा वाटला नसता काय?

**मधुकरः**—होय! तें सारें खरें! बाबासाहेबांच्या करीतां कां होईना, जरी त्यांनीं देवगडावर जाण्याचें मनांत आणले तरी गडावरचे देवाचे दूत त्यांनां मुदतीशिवाय आंत कसें घेणार?

**सुधाः**—मुदतीशिवाय? ह्मणजे मधुकर! तुह्मी ह्मणतां तरी काय? देवगड ह्मणजे देवाचा कां गड? आणि बाबा तिकडे गेले ह्मणजे त्यांचें कांहीं बरें वाईट कां झालें? आणि माझे दिनानाथही तिकडेच गेले ह्मणजे त्यांनीं आह्मांला कायमचें सोडलें असेंच ना? शिव शिव! परमेश्वरा! हें तूं काय केलेंस. बाबा...बाबा...दिनानाथ, अहो दिनानाथ...

**मधुकरः**—दिनानाथ! आतां कुठला दिनानाथ! सुधे! वंडगार्डनच्या रस्त्यावर माझ्या मारेकऱ्यानें लाठीच्या पहिल्याच प्रहाराखालीं जमिनीवर लोळविलेला तुझा यार केव्हांच ठार झाला! धांवत्या मोटारीच्या खरी चाकाखालीं त्याच्या चिंगरलेल्या जीवानें मोडलेल्या कुडींतून बाहेर उडी घेऊन केव्हांच स्वर्गारोहण केलें! इहलोकाहून आधींच देवगडास बदली झालेल्या बाबासाहेबांनां कोणाची तरी सोबत पाहिजेच होती! आयुष्य-दोरीच्या मध्यावरूनच एकदम स्वर्गाच्या कडीपाटाला हात लावून स्वामीनिष्ठा व्यक्त करणाऱ्या वीराचें कौतुक करावें तितकें थोडेंच आहे!

**सुधाः**—हर! हर! हें मी काय ऐकतें आहे! विधात्या! तूं आमच्या नशीबीं असें लिहिलें आहेस तरी काय? शिव! शिव! कोण दारुण प्रसंग हा! माते वसुंधरे! यावेळीं तूं दुभंग होऊन या तुझ्या लाडक्या मुलीला पोटांत ठाव दे!

**मधुकरः**—सुधे! मातेच्या कुशींत शिरण्याची पोरकट कल्पना अल्लड पोरट्याला शोभून दिसली; पण मुसमुसलेल्या सौंदर्याची खरी निगा विलासी प्रियकराची एक प्रमळ दृष्टीच करूं शकते. सुधे! दिनानाथाचा बोथट बाण

काळानें हिरावून नेल्यामुळें ओशाळलेल्या दृष्टीनें तुला इतरांकडे पाहण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं आणि हें जाणूनच बाबासाहेबांनीं आपल्या मृत-शय्ये-वरून तुझ्यावर कृपाप्रसाद करण्याची मला शेवटची विनंती केली. सुधे! बाबासाहेबांच्या आत्म्याला सद्गति मिळावयाला पाहिजे ना?

**सुधाः**—मधुकर! बाबांच्या आत्म्याची काळजी मला आपल्यापेक्षां अधिक आहे. त्यांच्या आत्म्याला चिरकालीक शान्ति मिळण्यासाठीं मी काय करायला पाहिजे आहे हें तुमच्यापेक्षां मला अधिक समजतें. मधुकर! शेषाचा भार हलका करण्यासाठीं अविचारानें धांवणारा अनाहुत सरडा आपल्या रंगीत मध्यस्तीबद्दल आपलें थोबाड रंगवून घेत असतो.

**मधुकरः**—सुधे! वस्तुस्थितीचें दिग्दर्शन ह्मणजे दयेची याचना नव्हे! अंतःकरणाला परिस्थितीनें प्रसंगीं पढविलेला प्रेमळपणा ह्मणजे कांहीं त्याचें बिनचुक छायाचित्र नव्हें! आजपर्यंत दयेनें कोणाला काय दिलें आहे, तेव्हां या तुझ्या हाताच्या हव्यासानें मी आतां विलास मंदीराचें शिखर गांठणार आहे! वेडे! दयेनें दिल्याजाणाऱ्या गोष्टीपेक्षां दिल्या गेलेल्या गोष्टींचें फार तर स्तोम माजवावें! दयेच्या पसरलेल्या हातांत दानापेक्षां दैन्यच पडत गेल्याचें इतिहास साक्ष देतो. गुलामांच्या राष्ट्रांत जन्माला आलेली ही दयेची फाटकी पैदास दुबळ्या प्रजेला कदाचित् परमेश्वर भासत असेल!

**सुधाः**—मधुकर! परमेश्वरी सामर्थ्यापुढें मानवी शक्तीची घमेंड व्यर्थ आहे. मधुकर! माझ्या हाताचा हव्यास आपल्या हाताशीं लागण्याचें तर सोडूनच द्या पण आपण सोडून दिलेल्या या माझ्या हातानें आतां काय हव्यास धरावा हा मात्र माझ्यापुढें एक बिकट प्रश्न उभा आहे.

**मधुकरः**—काव्य-लहरी! तुझ्या फाटक्या हाताच्या हव्यासासाठीं मला एवढीमिनीतवारीची नवाळ भाषा पाहिजे कशाला? हातच मिळवावया-झाला तर हातानें हात मिळूं शकतो! पण मी ह्मणतों, हातानें हात मिळविण्य, जातीनें जातीशी पक्षपात केल्याचें दिसून येईल; पण तोच बुद्धीनें हात मिळ-

विला तर क्षणभर चमत्काराचें समाधानी-सुख तरी मानी मनाला लाभेल! वेडे! जेथें बुद्धिप्रधान-मस्तकाच्या हातचलाखीवर साऱ्या जगाची नजरबंदी सहज करतां येते तेथें तुझी ही आत्म-संरक्षणाची डोळस काळजीच तेवढी तग धरून राहील हें आधीं संभवतें तरी कसें?

**सुधाः**—मधुकर! तुह्माला आपल्या आसुरी सामर्थ्याचा काय प्रकाश पाडावयाचा असेल तो खुशाल पाडा. अशा अनाथ आणि निःसहाय स्थितींतसुद्धां परमेश्वरी कृपेनें मला माझें संरक्षण करतां येईल. मधुकर! आपल्या हृदय-रचनेचा विकट प्रश्न अद्याप मानस-शास्त्रज्ञांनां जरी सुटला नसला तरी आपणाला त्या देवेंद्राच्या दरबारांत याचें बिनचुक उत्तर खास मिळेल.

**मधुकरः**—देवेंद्राचा दरबार! अहाहा! तो सुखसोहाळा माझ्या नशीबीं असता तर काय बहार होती! सुधे! मानवांच्या वास्तविक सृष्टींत विजयी धावलेल्या ह्या वीराचा त्याच्या त्या वरच्या फाटक्या दरबारांत अंधश्रद्धेच्या दगडी चौकटींत डांबून ठेवलेलें तें त्याचें बहुरुपी बाहुलें या वीर-पुरुषाच्या तेजस्वी डोळ्याला डोळा लावील तेव्हांना या तुझ्या साऱ्या गोष्टी घडून येणार आहेत? हात दाखवून अवलक्षण करून घेण्याचा वेडा हट्ट माझ्या मानी मनाला मानवत नाहीं! वेडे! जोडीला जोड मिळाली नाहीं ह्मणजे मस्तीची रग मंदाऊन ती बिचारी मातीमोल होऊन जाते! मग आतां तूंच सांग कीं, भरल्या उत्साहानें त्याच्या त्या बायकी दरबारांत माझें पुरुषी पाऊल आधीं-ठरेल तरी कसें?

**सुधाः**—अहंकारी अधमा! आसुरी सत्तेचा कोण ताठा हा! संपत्तीच्या मदाची कोण बेदरकार धुंदी ही! तारारत्नांनीं खेंचून गेलेलें आकाश-पटल दैवी इच्छेच्या एकाच झटक्यानें राखेतल्या जोगड्याप्रमाणें हां हां ह्मणतां पांढऱ्या ढगाची राख सर्वांगाला फांसून विरागी बनते! वनश्रीनें युक्त अशी पर्वत-श्रेणी परमेश्वरी कोप होतांच नुसत्या काडीच्या घर्षणानें बेचिराख होऊन जाते! कमल-पुष्पांचे अलंकार छातीवर मोठ्या डौलानें मिरवणारीं

सुंदर सरोवरें दैवाची वक्र दृष्टी होतांच अगदीं खडकाळ वाळवंटें होऊन गेल्याचीं उदाहरणें कांहीं कमी नाहींत, ह्मणून ह्मणतें, मधुकर! असें अगदीं उत्तान-पात्र होऊं नका! आसुरी ताठ्यानें पुढें पाऊल टाकतांनां आल्या घरची थोडी तरी ओळख ठेवा!

**मधुकरः**—पोरी! पुढें पाऊल टाकतांनां आल्या घरीं मागें वळून पाहण्याच्या गडबडींत पायाला ठेंच लागल्याशिवाय राहत नाहीं! शिवाय, एकेकाळीं हें मागें वळणें, सुधे! तूं भ्याडपणाचें लक्षण समजत होतीस! आठवतो कां तुला तो बागेंतला पुतळ्याजवळचा प्रसंग? नित्याच्या निसरड्या-मुळें दिवसेंदिवस तुझें पाऊल पुढें घसरत असतां माझें तेवढें पाऊल मागें घेण्याचा कोण हा तुझा लाडका अट्टाहास! मग सुधे! काय ठरला तुझा विचार?

**सत्यव्रतः**—( अकस्मात प्र० क० ) कोण? मधुकर? अरे पाजी पागल!

( लपतो. )

**मधुकरः**—हट्टी पोरी! देवगडनिवासी दिनानाथाच्या शोधार्थ भटकत गेलेला तुझा आडदांड सत्यव्रत निराश अंतःकरणानें या काव्यचंद्रिका-कार्यालयाकडे परत फिरण्याच्या आंत मला माझ्या प्रश्नाचें उत्तर मिळालें पाहिजे.

**सुधाः**—मधुकर! प्रश्नाचें उत्तर कधीं कधीं प्रश्नांतच सांपडतें! मधुकर! आमंत्रित पाहुण्याचा आदर वेगळा आणि दारीं धरणें धरून बसलेल्या हट्टी अभ्यागताचा सत्कार निराळा! मधुकर! याहूनही ही गोष्ट विशद करून सांगण्याचा बिकट प्रश्न आपल्या या अप्रतिम बुद्धीच्या अलौकिक इज्जतीकरितां तरी निदान आपण माझ्यापुढें ठेवूं नये!

**मधुकरः**—चवचाल पोरी! प्रश्न असावा तितका तो मुळींच बिकट नाहीं.

**सत्यव्रतः**—( स्व० ) अरेरे काय करूं? घेऊं का याच्या नरडीचा घोंट?

**मधुकरः**—सुधे! इतका विचार तो कसला करतेस? कां मी जाऊं असा रिक्त हस्तानें परत?

**सत्यव्रतः**—(त्याच दिशेनें प्र० क०) आतां परत? आतां परत जाण्याचें नांव ही काढूं नकोस. बेहिमती पागल! तुझी ती बेताल जीभ मुळासकट उपटून काढून तिच्या भरल्या दानानें मी तुझी आतां वोळवण करतों. (गळा दाबून.) कपटी कंगाल! दाखवूं कां तुला आतां यमाचा दरबार?

**मधुकरः**—अहाहा! तो सुख सोहाळा या अभाग्याच्या नशीबीं असता तर काय बहार होती! बाळ सत्यव्रत! त्या तुझ्या त्या यमाच्या दरबारांत आगाऊंच दाखल झालेल्या बाबासाहेबांची चरण-सेवा, बाळ! मला नको कां आहे? (खोटा शोक.)

**सत्यव्रतः**—ह्मणजे? काय बाबा गेले? हरहर! ताई! घात झाला!

(सुधा दुःखमग्न; सत्यव्रत मुर्छित पडणार तोंच...)

**मधुकरः**—(त्यास वरचेवर सांवरून.) आतां दाबूं कां याचाच गळा? आणि दाखवूं कां त्या यमाच्या दरबारांतला याचा तो थेरडा बाबासाहेब? पण नको—(त्यास खालीं फेंकून.) अविचारी मूर्खा! जगाच्या अंतापर्यंत असाच रडत रहा!

पडदा.

: अंक तिसरा समाप्त. :

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

**स्थळः**—( डॉक्टर चंद्रचूडच्या दिवाणखान्यासमोरील व्हरांडा. )

( डॉक्टर चंद्रचूड व त्यांची मुलगी विमल. )

**डॉक्टरः**—परमेश्वरी कृपा यांत तर शंकाच नाहीं. विमल! त्या अंधाऱ्या रात्रीं त्याच्या निश्चेष्ट अंगावरून आमची मोटार निघून जाती तर बरीक मोठाच अनर्थपात होऊन आमच्यावर विकट प्रसंग गुदरला असता! शिवाय, न्यायाचा समतोल कांटा सदा सत्याकडे झुकतोच असा विश्वास नसल्यामुळें न्याय-देवतेला असला दैवी अपघात समजाऊन देतांना मधल्या हट्टी अधिकाऱ्यांच्या क्षुद्र संतोषाकरितां त्यांनीं पेटविलेल्या नकली न्याय-कुंडांत रौप्य-घृताची सारखी आहुति फेंकली गेली नाहीं, तर बाळ विमल! त्या होम-धुरांतून न्यायाची प्रखर देवता प्रगट होण्याच्या ऐवजीं आसुरी सत्तेची आवजड बेडी मात्र हातांत येऊन हमखास पडते!

**विमलः**—असो; आपली वेळ बऱ्यावर होती ह्मणूनच तो हतभागी रोगी आपल्या हातीं लागला आणि मला वाटतें बाबा! आमच्या मोटारीचें हॉर्न ऐकूं येतांच त्या दुष्ट मारेकऱ्यानें तेथून पोबारा केला असावा!

**डॉक्टरः**—आणि विमल! तशा त्या अंधाऱ्या रात्रीं मोटारीच्या अस्पष्ट उजेडांत रस्त्याच्या बाजूला पडलेली त्या हतभागी रोग्याची आकृति तुला दिसतांक्षणींच पायाखालचा ब्रेक जोरानें दाबून हातांतलें स्टीअरींग-व्हील फिरविण्यांत तूं दाखविलेलें प्रसंगावधान मात्र खरोखरच प्रशंसनीय आहे! विमल! फक्त एकाच क्षणाची जर हयगय झाली असती तर बाळ! त्या बिचाऱ्याच्या आईबापांचा तळतळाट आह्मांला जन्मभर सोसावा लागला असता!

**विमल:**—देवानें दयाळु होऊन जसें आमच्याकडे कृपादृष्टीनें पाहिले तसेंच त्यानें त्या रोग्याकडेही निष्ठुरपणानें आपली पाठ फिरविली नाहीं हें सोन्यापेक्षांही पिवळें झालें! पण बाबा! गेल्या दोन दिवसांत ठावठिकाणा न लागल्यामुळें त्यांच्या घरचीं सारीं माणसें अगदीं फिकिरींत पडलीं असतील नाहीं?

**डॉक्टर:**—बाळ, यांत काय संशय! प्रेमी जीवाला नाहीं नाहीं त्या गोष्टी आठवत असतात! आणि त्याच्या आईबापांनीं किंवा आप्तेष्टांनीं निदान यापुढें तरी फिकिरींत पडूं नये ह्मणून त्याच्या तशा त्या जखमी चेहऱ्याचें छायाचित्र कालच काढवून घेऊन अपघाताच्या साद्यंत हकिगतीची जाहीर नोटीस मी आजच्या 'लोकनायका'च्या अंकांत माझ्या सहीनें प्रसिद्ध केली आहे.

**विमल:**—पण तेवढयानें त्यांचा ठावठिकाणा लागेल ना? नाहींतर त्यांच्या कुटुंबांतील सारीं माणसें विरहामुळें झुरणीस लागून तीं बिचारीं त्यांच्या येण्याची दारीं टक लावून वाट पाहात बसतील; त्यापेक्षां मला वाटतें बाबा! ही सारी हाकिगत आपण सरकारी अधिकाऱ्यांच्या कानावर घालून.........

**डॉक्टर:**—सरकारी अधिकारी? आणि ते तरी अधिक तें काय करणार? शिवाय त्याला सरकारी अधिकाऱ्यांच्या बेदरकार नोकरांच्य हवालीं करण्याइतकी त्याची प्रकृति अद्याप तितकी सुधारली आहे कोठें? शरिरांत रक्ताचा सांठा होऊन साधारण हुषारी वाटायला त्याला अद्याप थोडे दिवस गेले पाहिजेत. आणि तसेंच विमल! आजच्या माझ्या नोटीशींत त्याच्या अंगावर असलेल्या वस्तूंचा आणि खिशांत सांपडलेल्या जिन्नसांचा मी उल्लेख करण्याला मुळींच विसरलों नाहीं!

**विमल:**—हें तर फारच उत्तम झालें! कारण त्यांतील एखाद्या क्षुल्लक वस्तुवरूनसुद्धां त्यांच्या आईबापांनां अगर आप्त-इष्टांनां त्यांचा पत्ता लावणें फार सुलभ जाईल! धांवती मोटार जागच्याजागीं खडी उभी करतांनां

पुढच्या टायरच्या ओझरत्या चाटेनें त्यांचा तो मुळचा सुबक चेहेरा तसा विद्रुप झाला नसता तर त्यांच्या नुसत्या छायाचित्रानेंसुद्धां आपलें काम भागलें असतें. बाबा! त्यांचा तसा तो विद्रुप झालेला चेहरासुद्धां किती किती तरी शोभायमान दिसतो; नाहीं बरें बाबा? (स्वगत.) चित्ताला भुरळ पाडणाऱ्या त्यांच्या त्या भुंवया जरी ठिकठिकाणीं रक्तानें डागळल्या आहेत तरी त्यांची आकर्षण शक्ति जशी काय अढळच आहे. अहाहा! कोण तें अप्रतिम सौंदर्य!

**डॉक्टर:**—विमल! रोग्याचा ठावठिकाणा लागून तो बिचारा आपल्या घरीं एकदां सुखरूप पोंचता झाला ह्मणजे आह्मी मिळविली ह्मणतों. त्याच्याच तोंडून त्याची सारी हकिगत कळायला अजून थोडा अवधि आहे तोंपर्यंत बाळ! शक्य ती शुश्रूषा करून त्याला आराम वाटण्याचे सारे उपाय आपणाला केले पाहिजेत. बिचाऱ्याला परमेश्वर उदंड आयुष्य देवो!

**विमल:**—बाबा! आपण रागावणार नसाल तर आज मी एक केलेला नैतिक गुन्हा आपणाला सांगण्याचें धाडस करणार आहे?

**डॉक्टर:**—बाळ! असल्या बाबतींतला आजपर्यंतचा तुझा अनुभव तुला काय सांगतो? स्त्रियांच्या सुंदर तोंडांतून निघालेला गुन्हा बुद्धीला पोंहोंचण्यापूर्वीच दयेच्या दंवांत थिजून जातो. बाळ सांग! अगदीं बेशक सांग?

**विमल:**—बाबा! त्या रोग्याचा ठावठिकाण-निदान नुसतें नांव तरी-कळावें या आशेनें त्यांची खासगी रोजनिशी चाळण्याचा नैतिक-गुन्हा आज माझ्या हातून घडला! पण बाबा! खेदाइतकेंच आश्चर्य हें कीं, त्यांत लेख-काच्या नांवाचा उल्लेख मला कुठेंच मिळाला नाहीं. रोजच्या दिन-चर्येंत नमूद केलेल्या विविध गोष्टींवरून त्या सरस्वति-भक्ताला सुखाचा एकही दिवस गेल्याचें दिसून येत नाहीं. जेथें जेथें ह्मणून लेखकाचें नांव असण्याचा किंवा येण्याचा संभव होता तेथें तेथें विवक्षित खुणा करून त्यांनीं स्वतःचा नामनिर्देश मुद्दाम टाळला आहे. तसें करण्यांत त्यांचा हेतू कसाही असला

तरी त्यांची ती एकंदर रोजनिशी ह्मणजे याच्या प्रज्ञा-शक्तीचें तें विजय तोरण आहे; आणि बाबा! ती वाचल्या क्षणापासून तर तो असामान्य रोगी आमच्याच हातून बरा व्हावा असें मला फार वाटूं लागलें आहे.

**डॉक्टरः**—आमच्याच हातून तो रोगी बरा होण्यांत, मी ह्मणतों विमल! असें विशेष तें काय आहे? ( विमल लाजते. ) कां? असें लाजेनें तोंडसे फिरविलेंस? आणि इतरांच्या हांतून हा बरा झाला तर मी ह्मणतों त्यांत त्याचें असें काय नुकसान आहे?

**विमलः**—त्यांत त्यांचे कांहींच जरी नुकसान नसलें तरी तसें होण्यांत आपल्याइतकेंच माझेंही नुकसान आहे इतकें स्पष्ट कां सांगायला पाहिजे? ( विमल लाजून जरा दूर होते. )

**डॉक्टरः**—अस्सें! अस्सें! हूँ आतां समजलों! विमल! आमच्याच हांतून तो रोगी बरा होण्यांत तुला जें विशेष दिसलें त्याच विशेषानें या तुझ्या सतेज चेहऱ्यावर मनोविकारांच्या नाना-छटांनीं नटवून दिलेला तुझ्या भावी संसाराचा हा सुंदर चित्रपट मलाही पण आतांच दिसला! पण बाळ! या लागाबंधाच्या गोष्टी आहेत! ओंठावरचा थेंब ओंठावरच सुकून जातो! शिवाय प्रेमाच्या साम्राज्यांत वर्ण-भेदाला जागा नसली तरी सम्मतीच्या संयुक्त सल्यानें प्रत्येक पाऊल टाकावें लागतें!

**विमलः**—संयुक्त सल्ला! छे! छे! बाबा तो कसा असूं शकेल? कारण प्रेमाची पराकाष्ठा ह्मणजेच स्वत्वाचें विस्मरण! प्रथम दर्शनाच्या पहिल्याच झटक्यानें प्रेमाचें फुलपांखरूं उभ्या आयुष्यांत एकदांच उडून जातें! मग बाबा! अशा त्या एकदेशीय प्रेमाची जोपासना प्रसंगीं निराशेच्या मोलानें करावी लागली तरी एकनिष्ठ-हृदयाला तिच्या वेदना कसच्या होणार!

**डॉक्टरः**—तें राहूं दे; बाळ विमल! गेले दोन दिवस तुझ्या त्या रोग्याजवळ मला अहोरात्र बसावें लागल्यामुळें मला माझ्या इतर रोग्याकडे पाहतां आलें नाहीं. आणि आज तर डिस्पेन्सरींत त्यांची एकच गर्दी उडाली असेल ह्मणून आज मला तिकडे गेलेंच पाहिजे. मी निघून

जाऊन येईपर्यंत, बाळ विमल! तूं तुझ्या रोग्याची नीट शुश्रूषा करीत रहा. सुदैवानें तितक्यांत तुझ्या रोग्याला वाचा फुटली तर तुझ्या अति-भाषणानें त्याला सतावूं नकोस बरें? बरें आहे; जातों मी. येतांनां तुझ्या रोग्याकरितां मेरिवेदर-मार्केटांतली ताजी फळें आणावयाला मी खचित विसरणार नाहीं!

( जातो. )

**विमलः**—( स्वगत. ) अगबाई! असें मला कां बरें होऊं लागलें आणि हा विवेकाचा विद्युत-संदेश मला कोण बरें वरचेवर पाठवीत असावें? अथवा शंका तरी कशाला? अगबाई! पण जाऊं देत त्या गोष्टी! पण खरेंच! ही माझीं सुखस्वप्नें खरीं होतील, कां ही स्वप्नांतीलच सुखें ठरतील! परमेश! तुझ्या अतर्क्य लिला आह्मा मानवांनां कशा कळणार! (जाते.)

## प्रवेश २ रा.

**स्थळः**—( काव्य-चंद्रिका-कार्यालय. )

**सत्यव्रतः**—आणि हीच तर आह्मा समाज-सेवकांच्या मार्गांतली मुख्य अडचण आहे. विचारांच्या कल्लोळांतून उदय पावणाऱ्या शास्त्रीय युगांतल्या नव्या दृष्टीला हे प्राचीन-मताभिमानी लोक वर्ण-संकरापूर्वींची ही धर्मग्लानी समजतात! निर्जीव सांप्रदायाच्या सनातन शवाला अविचारानें कवटाळणाऱ्या या गतानुगतिक आणि मूर्ख समाजानें वेळीं अवेळीं वर्ण-संकराच्या घटकेचें भय घालून, सर्वत्र माजवून दिलेल्या पोकळ निराशा-वादामुळें राष्ट्राची कर्तृत्व-शक्ति खची करून टाकून, त्याचा खरा नैसर्गिक वकूब आज नाहींसा केला आहे. राष्ट्र-घातकी समाजानें राष्ट्रावर चढविलेला हा बेइज्जतीचा बेशरमी डाग ताठर तरुणांच्या ताज्या रक्तानें प्रसंगीं पुसावा लागेल असा माझा अदमास आहे. ताई! अधोगतीच्या ओहोटीस लागलेल्या या समाज-पुरुषाच्या पक्षपाती डोळ्यांत वेळींच झणझणीत अंजन घातलें गेलें नाहीं, तर सामाजिक-व्याराच्या पापी दोघाचें अभद्र खापर आह्मा तरुण-

पिढीच्या निर्मल कपाळावर फुटल्याखेरीज खास राहणार नाहीं. हा समाज–द्रोह चुकविण्यासाठीं, ताई! मला माझ्या लाडक्या सामाजिक सेवेचा ‘ श्रीगणेशा ’ प्रथम तुझ्या पासून सुरू करूं दे!

**सुधाः**—ह्मणजे भाई! तूं ह्मणतोस तरी काय? मी नाहीं समजलें तुझ्या या ह्मणण्याचा अर्थ?

**सत्यव्रतः**—ताई! आरंभशूर आणि बोलघेवड्या सुधारकानें जरी मला जन्म दिला असला तरी विकारहीन मांगाच्या कुलाला साजेल अशी माझ्या हृदयाची उलटी रचना करणें त्याला त्याच्या दुर्दैवानें साधली नाहीं. तथापि ताई! बाबांच्या बेदरकार बेपर्वाईमुळेंच तुझी ही सुख-सुत्रें आज माझ्या हातीं लागलीं?

**सुधाः**—यांत काय संशय? आईच्या देहावसानाबरोबर बाबांची अकस्मात फिरलेली पगडी पाहिल्यावर माझ्या सुख-दुःखांचा विचार, भाई! मी तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणावर सोंपविणार! पण भाई! कधीं कधीं मला वाटतें, माझी ही जळती शेगडी तुझ्या उरावर जर बसली नसती तर तुला आपली काल-क्रमणा अगदीं सुखानें करतां आली असती.

**सत्यव्रतः**—पाठीशीं पाठ लावून आलेल्या सख्या बहिणीला वैधव्य-दुःखाच्या विदग्ध-खाईंत पिचत टाकून स्वतःच्या सुखाचा सुवर्णमहाल सजविण्याची स्वार्थी कल्पना, ताई! माझ्या सत्य-निष्ठुर स्वभावाला कधींच शिवली नाहीं. ताई! तुझ्या सुखापुढें मला प्रत्यक्ष सर्वेश्वराचें सिंहासनसुद्धां तुच्छ आहे. खरेंच! लाडक्या बहिणीचा कुंकुमरहित फटफटीत कपोल–प्रांत कोणत्या सहृदय भावाला ओलांडता येईल?

**सुधाः**—भाई! प्रेमातिशयामुळें तुला तसें वाटणें अगदीं रास्त आहे; पण करावयाचें कसें? माझ्या गत जन्माच्या कृत–कर्मांमुळें ओढवलेल्या या अपूर्व-पूर्वसंचिताची दिशाबदल करणें मानवी-शक्तिच्या आटोक्याबाहेर आहे. भाई! राहवत नाहीं ह्मणून थोडें स्पष्टच विचारतें, मला माझ्या विधवा-व्रताचें सार्थ संगोपन करतां येणार नाहीं अशी कुशंका येण्यासारखें माझ्या वर्तनांत

तुला तसेंच कांहीं दिसलें असेल तर तसें मला स्पष्ट सांग आणि नंतर या असल्या शास्त्रनिषिद्ध अमंगल गोष्टीची चर्चा चालू ठेव.

**सत्यव्रतः**—छे! छे! ताई! तुझा अभंग करार, अचल निर्धार आणि प्रखर धर्मभक्ति हीं माझ्या डोळ्यापुढें सदैव उभीं असतां तसें मीं कसें ह्मणूं? ताई! मला जी भीति वाटते ती तुझ्या आचरणाबद्दलची नव्हे तर सृष्टि-मातेच्या समदृष्टी क्रमाची होय. ताई! क्षुधा आणि काम या दोन प्रबल विकारांपुढें आजपर्यंत मी मी ह्मणविणाऱ्या मोठमोठ्या संयमी महात्म्यांनींसुद्धां आपले हात टेकले आहेत. ताई! निसर्गाची अंगभूत तयारी वेगळी आणि कलेची कृत्रिम चतुराई निराळी!

**सुधाः**—भाई! मनसोक्त आचार, स्वैर कल्पना आणि सवडीचें शास्त्र यांच्या सत्कारानें व्यक्तीला कांहीं काल सौख्याचें मृगजल जरी भासलें तरी तिची अंतीं फसगत होऊन पश्चात्ताप करण्याचा दुर्धर प्रसंग तिच्यावर हमखास ओढवतो अशी आमची सनातन धर्म-शास्त्रें अगदीं स्पष्ट सांगतात ना?

**सत्यव्रतः**—पण ताई! मी ह्मणतों त्यांत कसलाही मनसोक्त आचार नाहीं, स्वैर कल्पना नाहीं किंवा सवडीचें शास्त्रही नाहीं; इतकेंच नव्हें तर, उलट माझ्या ह्मणण्याला खऱ्या धर्माचा पुरता आधार असून त्यांतच नीतीची वास्तविक जोपासना आहे. ताई! बाल-विधवांच्या कर्कश किंचाळ्यांनीं हैराण झालेल्या या हल्लींच्या भरत-भूमीनें तुझ्या त्या तत्कालीन शास्त्र-समूहांना आजच्या या नव्या मनूंत अंधपणानें उराशीं कवटाळण्यांत एका परंपरेच्या परिपालनापेक्षां मला त्यांत काडीचाही अर्थ दिसत नाहीं. ताई! ज्याच्या योगानें व्यक्तीची सर्वांगीण उन्नति होईल, ज्याच्या योगानें आमची भावी पिढी सदाचारी आणि नीतीसंपन्न निपजेल, ज्याच्या योगानें आमच्या नामधारी राष्ट्राला खरें राष्ट्रीयत्व प्राप्त होईल तेंच--तेंच खरें शास्त्र अशी माझी प्रामाणिक समजूत आहे. ताई! आमचा हल्लींचा समाज तूं समजतेस तितका कां तो सदाचारी आणि नीतिसंपन्न आहे?

**सुधाः**—भाई! कर्तव्य ह्मटलें ह्मणजे तें सदा स्वतंत्र आणि सत्य-संपूर्णच असावयाचें. समाज एक आपल्या सामाजिक कर्तव्यापासून च्युत झाला ह्मणून कांहीं व्यक्तीनें स्वतःच्या कर्तव्याचें बंधन तोडून टाकून सोईच्या सवडीचा अवलंब करणें म्याडपणाचें द्योतक आहे. भाई! आजन्म योगिनी किंवा कुमारी राहिलेल्या स्त्रीयांची उदाहरणें आमच्या आजपर्यंतच्या आर्यावर्ताच्या इतिहासांत थोडी थोडकी कां आहेत? जगांत असून विरक्तपणानें राहण्याचें बाळकडू आमच्या सनातन आर्य-संस्कृतीनें आह्मां विधवांना चांगलें पाजविलें आहे.

**सत्यव्रतः**—पण मी असें विचारतों, ताई! जगांत असून विरक्तपणानें राहण्यांत त्या व्यक्तीचा अगर तिच्या समाजाचा असा विशेष तो काय फायदा? बाकी; ताई! हें खरें कीं, तुझ्यासारख्या दृढनिश्चयी बालयोगिनीच्या दैवी-संपर्साचें कौतुक करण्याचें सोडून देऊन निर्लज्जपणानें तुला लग्न-मंडपाची वाट दाखविण्यांत मी तुझ्या कर्मठ आणि भाविक प्रवृत्तीचे तुकडे पाडीत आहेत यांत शंका नाहीं. पण ताई! तितक्याच दृढ-निश्चयी बालविधवेच्या 'स्वार्थ-संन्यासा' वांचून माझें इच्छित कार्य तडीस जाणें शक्य नाहीं. सकृतदर्शनीं हा दिसणारा आचरट आग्रह—अपूर्व अधमतेचें हें हिडीस स्वरूप-एका पाजी भावाची ही सैतानी शिकवणूक—कानावर पडतांच एकजात बालयोगिनी मला शापभ्रष्ट करण्यासाठीं आपलें सारें तपःसामर्थ्य खर्ची घालतील, ही गोष्ट मी जाणत नाहीं असें नाहीं. पण ताई! जगांतील पापाचा परिचय नसलेल्या स्वभाव-सुंदर कोमल बालिकेचें अल्लड पोरवय, भोंवतालीं पसरलेली विविध सुखांची अमर्याद-सृष्टी, स्वतःच्या सुखाविषयीं पूर्ण निराश झालेलें दुःखी मन, आणि अज्ञात-सुखाच्या, लालसेपुढें नेहमीं लुळी पडणारी मानवी हृदयाची स्वाभाविक दुर्बलता, या कारण-चतुष्टया-मुळें, ताई! आजपर्यंत मोठमोठ्या संयमी विधवांचें पाऊल वाममार्गी पडलें आहे! मनोनिग्रहाच्या संतप्त तव्यावर लोखंडाचे चणे फुलले नाहींत असा पुराणांतरींचा पुरावा अद्याप शिल्लक आहे!

**सुधाः**—पण भाई! दयेच्या सेविका, प्रेमाच्या दासी यांसारखे विधवांच्या सामाजिक-सेवेचे सात्विक मार्ग असंख्य असतां, या असल्या गौण विवाहासारख्या तामसी मार्गाचें अवलंबन करण्यांत तरी मी ह्मणतें, असा विशेष तो काय फायदा? भाई! बोललें तर तूं त्याला आत्मश्लाघा ह्मणशील, पण मला वाटतें, ही माझी संन्यस्त-वृत्तिच कायम ठेवून मला माझें सामाजिक-हित साधतां येईल आणि त्यामुळें तो जनापवादाचा असंह्य माराही मला सहज चुकवितां येईल.

**सत्यव्रतः**—नाहीं! ताई! हा तुझा निव्वळ भ्रम आहे. विधवांच्याकडे कुचेष्टेनें बोट करून निंदाव्यंजक स्वरांत फिदीफिदी हांसणारा हा छिद्रान्वेषी निर्दय समाज, त्यांच्या संन्यस्त व्रताबद्दल पूज्यभाव धरून, यदृच्छेनें ओढवलेल्या त्यांच्या वैधव्याला मान देऊन, हा आपमतलबी समाज त्यांच्याशीं आदरानें वागेल अशी तुझी कल्पना असेल तर ती मात्र सर्वथैव चुकीची आहे. आंत एक व बाहेर भलतेंच अशा या दुरंगी दुनियेच्या तिरंगी सामन्याला ताई! तुझ्या सारख्या भोळसर मुलीला तोंड देतां येणें शक्य नाहीं. ह्या कारस्थानी समाजाचें कामी कपट-प्रबंध...... (दचकतो.)

**सुधाः**—हें काय? भाई! केवढ्यानें दचकलास! आणि अशा शून्य दृष्टीनें या एकाच दिशेकडे असा सारखा काय पाहतोस?

**सत्यव्रतः**—काय पाहतो? ताई! बेवारशी विधवांच्या भोंवतीं छिद्रासाठीं टपून बसलेल्या कामी डोमकावळ्यांची ही पहा पाजी पंगत! अज्ञात सुखाच्या लालसेनें यांची अघोर टोंचणी सहन करून, कीर्तीच्या भयानें अब्रूचे मूग गिळून, अलोट मातृ-प्रेमाच्या खुनाचें उकिरड्यावर प्रदर्शन करणाऱ्या चंचल विधवेचें, तें पहा! ताई! तें पहा! तिचें तें दारुण दैन्य मला भेडसावीत आहे! आणि हा पहा! पुमानचा पवित्र बिछाना रक्तबंबाळ करणारा आसुरी हरी मोहन! आणि त्याच्या आड तो पहा! तो पहा! ताई! जिजेच्या मानेचा कांटा ढिला करणारा पाजी अडसूळ! (संतापातिरेक.)

**सुधाः**—भाई! शांत हो! शांत हो! असा बेफाम बनूं नकोस!

**सत्यव्रतः**—ताई! या सैतानी राक्षसांची पापी दृष्टी तुझ्या कपाळा-वरच्या पांढऱ्या डागावर पडूं नये ह्मणून झटकन् हा पुनर्विवाहाचा पवित्र पडदा त्यावर ओढून घे. ताई! तुझ्या चेहेऱ्याकडे पाहिलें—आणि त्यांतल्या-त्यांत या तुझ्या कपाळावरच्या पांढऱ्या डागाकडे लक्ष्य गेलें--पण नको-नको-ताई! त्या फटफटीत डागामुळें भेसूर दिसणारें तुझें तें मुखमंडल आधीं माझ्यापासून अगदीं दूर लपीव. ( दीर्घ उसासा. ) माझ्या प्रेमळ ताई! या तुझ्या वेडसर भाईच्या अज्ञात भयाकरितां मला तुझ्या या बेवारशी देहाचा माझ्या मर्जीप्रमाणें विक्रय करूं दे!

**सुधाः**—एकुण! जनापवादाचा असह्य मारा चुकवून समाज-हित साधण्याकरितां, भाई! आह्मा बालविधवांनां या तुझ्या पुनर्विवाहाच्या मार्गा-खेरीज अन्य मार्ग नाहींच ह्मणतोस?

**सत्यव्रतः**—छे! छे! ताई! हा एकच मार्ग कसा असेल? समाज--हित साधण्याचे गतभर्तृकेचे अनेक मार्ग असले तरी या असल्या बोलूनचालून गौण-विवाहालाच तुला प्रवृत्त करण्यांत, ताई! माझा तसाच कांहीं सद्हेतू आहे हें तूं पक्कें समज! ताई! मी तुला तुझ्या इच्छेविरुद्ध लग्नमंडपांत खेंचतों आहे तों कांहीं अपक्व भगिनी--प्रेमाच्या एखाद्या आकस्मिक उसळीमुळें नव्हें, तर प्रस्तुत प्रश्नाचा मी पुरता आणि दूरवर विचार केल्यानंतरच तुझ्या-सारख्या एका खंबीर मनाच्या स्त्रीच्या चारित्र्याचें असें हें खेळणें करण्याला उद्युक्त झालों आहे!

**सुधाः**—पण भाई! पहिल्या पतींची प्रतिमा स्मरण-पटा वरून पुसून टाकून त्या ठिकाणीं द्वितिय नवऱ्याच्या नूतन प्रतिमेची प्राण-प्रतिष्ठा करणाऱ्या स्त्रीचें नीति-धैर्य जरी तुला एक प्रिय असलें तरी स्त्री-चारित्र्याची ही तूं चाल-विलेली चेष्टा या तुझ्या गतानुगतिक आणि दुराग्रही समाजाला मानवेल अशी का तुझी खात्री आहे?

**सत्यव्रतः**—स्मरण-पटावरून गत-पतीचें कल्पना-चित्र पुसून न जाण्याइतकें पति-सौख्य अनुभविलेल्या विधवा-वर्गाकरितां, ताई! ही माझी धडपड चाललेली नाहीं; तर पति-सौख्याचा नसता किंवा अगदीं ओझरता घोंट घेतलेल्या कमकुवत मनाच्या दुबळ्या विधवांकरितां मी माझी सारी उरःफोड आहे! असें असतांनाही, ताई! तुझ्यासारख्या खंबीर मनाच्या बाल-विधवेला या संकटाच्या पेंचांत धरण्यांत मी तुझ्या वैयक्तिक कल्याणापेक्षां, ताई! मी तुझ्या जन्मदात्या देशाचें कल्याण अधिक पाहत आहे. ताई! देवी मानवतेला मान देण्यासाठीं—प्रेमळ भगिनी-कर्त्तव्याच्या पवित्र जोपासनेसाठीं—आपल्या हतबल समाज-पुरुषाच्या राष्ट्रीय-संसारासाठीं, माझ्या प्रेमळ ताई! मी तुला निर्दयपणानें पुनर्विवाहाच्या या कलंकित बोहोल्यावर बुध्यापुरःसर चढवीत आहे! ताई! या तुझ्या वेड्या भाईच्या अज्ञात राष्ट्रीय-सौख्यासाठीं तूं अगदीं बेधडक ही पुनर्विवाहाची मुहुर्त-मेढ माझ्या देखत रोंव! आणि आर्यावर्तातल्या फुटलेल्या साडेतीन लाख बांगडीच्या विजय-तोरणानें, ताई! तुझा पुनर्विवाहाचा मंगल मंडप मंडित करून टाक!

**सुधाः**—भाई! तुझ्या हित-बुद्धीवर माझा पूर्ण भरंवसा आहे. भाई! तुझ्याकरितां—माझ्या लाडक्या भाईच्या इच्छित ध्येयाकरितां—विस्तारानें पसरलेल्या राष्ट्र-पुरुषाची यथार्थ कल्पना करतां यावी म्हणून माझ्या भाईच्या रूपानें वावरणाऱ्या या माझ्या राष्ट्र-देवाकरितां—मी माझ्या देहाचा नुसता विक्रयच काय पण माझ्या या भाईवरून जीवाभावाचें लिंबलोण उतरून तो दशदिशा फेंकून देण्याचीसुद्धां माझी अगदीं तयारी आहे. पण भाई! ज्या सद्हेतुनें तूं प्रेरित झाला आहेस तो तुझा हेतू मला कळेल तर बरें नाहीं का होणार?

**सत्यव्रतः**—ताई! सुमाता हीच एक राष्ट्राची खरीखुरी मंगल संपत्ति आहे. मनानें खंबीर, शरीरानें बळकट, नीतीनें पूर्ण आणि तेजानें उज्वल अशी राष्ट्रीय सुप्रजा निर्माण झाल्याखेरीज आपल्या पुरातन राष्ट्र-पुरुषाचा

हल्लीं होत असलेला तेजोभंग थांबणार नाहीं! मूळच्या निःसत्व आणि लोक-संख्येत क्षणिक भर टाकण्यासाठीं, रोगट, खुजी आणि कुब्या मनाची प्रजा पैदास करणारे, हे बाल-विवाहाचे कारखाने ताई! आतां बंद पडलेच पाहिजेत! हिंदुस्थानच्या भावी दौलतीचा मंगल-मनोरा चिरस्थायी करण्या-साठीं हे सध्याचे किडके आणि कमजोर खांब खास उपयोगी नाहींत आणि या करितांच, ताई! त्या बाल-विवाहाला मूठमाती दिल्याचा पांचजन्य स्पष्ट ऐकूं येईपर्यंत ही पुनर्विवाहाची मंगल नौबत अशीच झडत राहिली पाहिजे! केवळ मनोविकारांच्या प्राबल्यासाठीं नव्हें तर निर्धणाच्या पंथास लागलेल्या आपल्या लाडक्या भारत-वर्षाला सुमातांची आणि सुसंतानांची प्राप्ति करून देण्याकरितां, ताई! मी तुला अशा या आडमार्गानें लग्न-मंडपांत खेंचतों आहे! राष्ट्राचें पावित्र्य कायम राखण्याकरीतां, ताई! आधीं समाजांतील प्रत्येक स्त्री-पुरुषांचें शील ओजस्वी बनायला नको काय?

**सुधा**:—( स्वगत. ) निर्बुद्ध! निर्दय! आणि कर्तृत्वशून्य घातकी समाजा! ऐक! ऐक! माझ्या लाडक्या भाईची ही प्रगल्भ विचार-सरणी अगदीं जिवाचे कान आणि मनाचें भान करून ऐक! आणि बाल-विधवांचीं कोतीं मनें सुसंस्कृत करण्यासाठीं खऱ्या शास्त्रांना अर्धचंद्र देऊन अर्वाचिन पोटभरू जादुगारांनीं आपल्या सडलेल्या मेंदूंतून काढलेले आसुरी उपाय तुझ्या पक्षपाती डोळ्यापुढें उभे कर! ( उघड. ) अहाहा! राष्ट्र-मांगल्याची कोण ही उदात्त कल्पना! चिकित्सक-बुद्धीचे पुरुषच राष्ट्रीय आचार-विचा-रांत क्रान्ति घडवून आणीत असतात हे ऐतिहासिक सत्य कांहीं खोटें नाहीं! भारत-वर्षांतील माझ्या प्रिय आणि समदुःखी बाल-विधवांनो! आपण शापा-साठीं नुकत्याच उचललेल्या आपल्या अधिकारी हातांनीं या माझ्या लाडक्या भाईवर आपण कृपेचें छत्र धरा! 'धर्म बुडाला'! या पोपटी पंचाक्षरी मंत्राचा वेळींअवेळीं आक्रोश करणाऱ्या सोंवळ्या धर्म-मार्तंडांनो! या माझ्या निष्क-पटी आणि सरल-हृदय भाईवर आपण दुर्वचनांचा हृदय-भेदी मारा करू

नका! स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि स्वदेश-भक्ति यांच्या प्राप्तीकरितां, भाई! हा पहा! हा—हा माझा देह आज मी तुझ्या स्वाधीन करतें आहे!

(अंगावर पडते.)

**सत्यव्रतः**—(तिला सांवरून.) शाहाहा! ताई! माझ्या प्रेमळ भगिनी! उज्वल संपत्तीच्या अधिकारी-देवी! आज मात्र माझ्या पुरुषी-जीवितार्चें खरेंखुरें सार्थक झालें! राष्ट्र-प्रेमाकरितां सदैव तळमळणारा माझा तप्त आत्मा आज या तुझ्या धीरोदात्त वचनांनीं शांत झाला! देवी! या घातुक-रूढी प्रिय दांभिक समाजाचा पक्षपाती फैसला त्याच्या लक्ष्यांत आणवून देऊन, त्याला त्याच्या खऱ्या कर्तव्याची जाणीव करून देणाऱ्या दुर्घट कार्यांत, हे देवींच्या देवी! श्री-नीति-देवी! या तुझ्या एकनिष्ठ भक्ताला तुझ्या प्रबल आशीर्वचनांचें भरपूर पाठबळ असूं दे. (अभिवादन.)

पडदा.

## प्रवेश ३ रा.

स्थळ:—(शान्ति-निकेतन.)

**लीलाः**—(स्वगत) हर हर! कोण क्रूर कृत्या मी! केवळ कामवासनेला बळी पडून मी माझ्या सौभाग्य-मंदिराला स्वतःच्या हातानें मंत्राग्नि दिला अँ! आणि त्याच्या भडकलेल्या ज्वालेनें जळून गेलेलें हें असें काळें-ठिक्कर तोंड घेऊन मी माझें लाजिरवाणें जिणें आतां कंठू तरी कसें? पापी पुरुषाच्या पाजी फुलसावणीला फसून जाऊन अगदीं उघड्या डोळ्यांनीं हा प्रत्यक्ष पति-हत्तेच्या पापाचा पर्वत मी उभारला ना? काय? पति-हत्या? अग-बाई! कोण हृदयद्रावक प्रसंग तो! अगबाई! आणि हे कोण? कोण? आपणच कां ते? नाहीं हो! खरेंच नाहीं! मी कांहीं आपल्या औषधांत विष कालविलें नाहीं ऐकलेंत कां! आपली ती मेजावरची औषधाची बाटली

आणण्याकरितां मी मेली जरा कोठें पाठमोरी होतांच औषधाच्या मोकळ्या प्यालांत त्या मेल्या मधुकरानें आधींच विष ओतून ठेवलेलें मला काय हो माहीत! नका—नका गडे! असे डोळे वटारून आपण माझ्याकडे रागानें पाहूं नका! महाराज! आपला कांटा काढून टाकण्याच्या मधुकराच्या बद-फैली सल्ल्याला मी मान जरी डोलविली तरी हात नाहीं हो हालविला! नाथ! आपण झोंपी गेल्यावर त्याची ती विषारी कुपी मी त्याच्याकडे तशीच तीन-वेळां नाहीं कां फेंकून दिली? पण हें काय? नका—नका महाराज? अशीं डोळ्यांत आंसवें आणून आपण माझ्याकडे अशा दीन दृष्टीनें पाहूं नका. आणि हें काय बरें? नका! नका हो असा आपल्या कपाळाला हात लावून घेऊन माझ्या या लज्जित जीवाच्या ठिकऱ्या उडवूं नका! ( तोंड वळवितें. ) आणि अगबाई! हें काय? इकडे पण तेंच! आणि तो तो कोण? कोण? मधुकर! मेल्या! ये! ये! असा पुढें ये आणि मांग त्या औषधाच्या प्यालांत कोणी विष ओतलें तें आधीं इकडे सांग बघूं? आतां कां मेल्या तुझी दांतखिळी बसली! हूँ! खबरदार! विषानें ते भरलेले हात आतां असे पुसून टाकूं नकोस! काय? पुसून टाकलेस? आणि झालास ना मोकळा? चांडाळा! तुझें निसंतान होईल बरें! मांग! अशी मी कुत्र्याच्या मोतीनें मरत असतां, मेल्या! तुला दांत काढायला शरम नाहीं वाटत? काय! हा आवाज कसला? काय? जारिणी! अगबाई! मला आतां 'जारिणी' ह्मणून कोणी हांक मारली? तुह्मीच कां? हांसा! हांसा! बायांनों! जेथें माझेंच पाऊल आधीं वांकडें पडलें तेथें तुमचा तरी काय दोष! आणि हा तांडा कसला? थांबा! थांबा! अल्लड पोरींनों! अशा उतावळ्या बनूं नका! निर्दोष बालिकांनों, जें चकाकतें तें सोनें नव्हें बरें! अगबाई! पण हे थेंब कसले ( वर पाहून. ) जीवाभावानें जतन केलेली आर्य-सतींची पुण्य-मिरास माझ्या खुनशी कृत्यानें आज ठार झाली ह्मणूनच ना, हे स्वर्गस्थ सतींनों! हा बाष्पबिंदुंचा कढत पाऊस असा सारखा पडतो आहे! आणि हें काय? अगबाई मेलें! छे! छे! माझ्या पायाला असे हे प्राणघातकी चटके कोण देत आहे? धरणीमाते! काय

माझ्या भ्रष्ट कायेच्या अमंगल स्पर्शानें तुझ्या अंतरीचा दाह दुणावलो? झालें तर मग! आटोपलाच माझा कारभार! अरेरे! भपक्याला भुलून भ्रष्ट झालेली एक अल्लड कामांध पोर आज मातीला मिळून गेली! शिव शिव! हे दयामय कारुण्य-सिंधो! आतां या अभागी जीवाला तुझ्यावांचून दुसरा त्राता कोण आहे? सच्चिदानंद! सच्चिदानंद! सच्चिदानंद!

( जाते. व भग्नदंत व मासिकासह तीर्थक प्र० क० )

**तीर्थकः**—भग्नदंता! आतां मात्र आमच्या बाबांच्या मूर्खपणापुढें हद्द आहे बुआ!

**भग्नदंतः**—पण बेहद्द तीर्थका! असा एकदम तुझ्या संतापाचा पारा चढायला तुला झालें तरी काय? असें काय तुझ्या बाबानें तुझें घोडें मारलें?

**तीर्थकः**—भग्नदंता! तुला काय सांगू? आज अगदीं हातची शिकार गेली रे! उगाच नाहीं मी त्यांना शिव्या देत. अरे! बाबांच्या या मूर्खपणामुळें आज माझा संसार......

**भग्नदंतः**—संसार? मूर्ख कुठला! वेड्या! संसारचा रथ कोठें एका घोड्यानें कां चालतो! अरे! हा गृहस्थाचा संसार ह्मणजे कांहीं बोलक्या सुधारकाचा किंवा चळवळ्या देशभक्ताचा राष्ट्र-संसार नव्हे. हा कर्तबगारी कसास लावण्याचा मानवी शक्तीचा आखाडा आहे. तीर्थका! हा गृहस्थाचा आश्रम ह्मणजे कांहीं जादुटोणा करून अदभुत् चमत्कार दाखविणाऱ्या संन्यासाची झोंपडी नव्हे बरें!

**तीर्थकः**—तेंच-तेंच भग्नदंता! हें तुझें प्रवचन आतां पुरें कर; कारण लग्नाचें महत्व मला अलिकडे फार पटूं लागलें आहे आणि ह्मणूनच बाबांच्या मूर्खपणाचें क्षेत्रफळ काढण्याचा असा अनावर मोह मला आतां आवरेनासा होतो! भग्नदंता! काय सांगू? या चैत्र-वैशाखांत आशा-वृक्षाला विचारांची पालवी फुटून जरा कोठें फळाचा मोहोर धरतों न धरतों तोंच पावसाच्या पाण्यानें तो धुवूनही जातो. बरें पांच सहा महिन्याच्या अहोरात्र मशागतीनें वृक्ष फुलेल ह्मटलें तर पुढें शिमगा हा ठेवलेलाच!

भग्नदंत:—अरेरे अभागी प्राणा! ह्या तुझ्या हिंदुस्थानची तेहतीस कोटी लोक-संख्या ना? यांपैकीं तुला एकाचा तरी उपयोग आहे काय? वाबारे ' कठीण समय येतां कोण कामास येतो ' ही त्या कवीची कविता त्याच्या लग्नापूर्वींचीच असली पाहिजे. चालूं द्या बाळ! तुझा आपला यत्न असाच चालूं द्या. कोण तरी तुला सहानुभूतीचा ओला हात देईल बरें!

तीर्थक:—भग्नदंता! फिरून यत्न करण्याच्या चक्री-भानगडींत गेली पांसष्ट वर्षे अशी गुंतल्यामुळें माझ्या या आशा-वृक्षाचें अक्रोडांत तर रुपांतर नाहीं ना होणार? शिवाय, निपुत्रिकाचें तोंड बघूं नये असें तें एक धर्म-शास्त्र मारखें रडतें आहे त्याला आह्मी अस्सल सनातन-हिंदु काय बरें करणार?

भग्नदंत:—हो! हो! तर! निदान धर्म-संस्काराकरीतां तरी तुझें एकदां वाजलें हें पाहिजेच. आणि तसें झाल्याशिवाय तुझ्या जीवाला, बाळ! कायमची शांती कशी लाभणार!

तीर्थक:—भग्नदंता! तुला आमचे बाबा ठाऊकच होते! अरे! नरोत्तम पुरुषोत्तमच्या पेढीवर खोटा जमाखर्च केल्याबद्दल बाबा जेव्हां येरवड्याच्या तुरुगांत सरकारचे जवळचे पाहुणे पहिल्यानें झाले तेव्हां तुरुंगावरच्या अधिकाऱ्याचा डोळा चुकवून त्यांनीं परस्पर एकदम विलायतीची आगबोट गांठली असती; तर भग्नदंता! बाबांचा धक्यावरच कारे प्राण गेला असतां? पण पोटच्या पोराची काळजी असेल तेव्हां ना?

भग्नदंत:—ह्मणजे? फरारी होऊन देशोदेशीं वणवण हिंडण्यानें अपराध्याचा पाठचा सरकारचा ससेमिरा थोडाच चुकतो आहे आणि विलायतेचीच वाट लावून देण्यांत तीर्थका, तुझी दृष्टी थोडी चळली वाटते?

तीर्थक:—भग्नदंता! दांताप्रमाणें तुझी बुद्धीही थोडी भग्न झालेली दिसते. अरे! शीरशहाच्या भयानें पळणारा म्लेच्छ-हुमायून जर वाटेंत अकबराला सहज जन्म देऊं शकतो तर पोटासाठीं केलेला खोटा जमाखर्च सम्राटचरणीं अर्पण करण्याकरितां आमच्या ब्राह्मण-बाबांनीं विलायतेला जावयाचें नक्की

ठरविलेंच असतें तर भरल्या पोटावर आईनें तें नाकारलें कां असतें? पण आपलीच वेळ खोटी होती झालें!

**भग्नदंतः**—बरें! पण तीर्यका! मी असें विचारतों तुझे बाबा युरोप-खंडांत पळून जात असतां खरोखरच वाटेंत तुझा अकबराप्रमाणें जन्म झाला असता तर असा काय आपण त्याच्याप्रमाणें दिग्-विजय लावणार होता तो कळूं दे तर खरा.

**तीर्यकः**—अरे तसें झालें असतें तर आजचा हा दुर्धर प्रसंग कशाला ओढवता. भग्नदंता! नुसत्या अकबराचा दिग्-विजयच काय पण मला माझ्या त्या वैभवापुढें तुझ्या त्या शहाजहानचा तो ताजमहालही तुच्छ आहे.

**भग्नदंतः**—असें! मग तें तुझें वैभव तरी असें कोणचें तें एकदां कळूं द्या ह्मटलें!

**तीर्यकः**—(इलस्ट्रेटेड लंडन-न्युजचा अंक काखेंतून काढून.) भग्नदंता! हा पाहिलास कां बाबासाहेबांचा सचित्र-लंडनचा ताजा अंक आणि यांतलें हें पाहिलेंस कां लिव्हरपूर नगरींतलि मीन-टेकडीवरचें हें सुंदरी-प्रदर्शन! भग्नदंता! बाबा रानोमाळ पळत असतां या लिव्हरपूर नगरांत त्यांचा कबिला उतरला असता तर सुखासुखी आज मला आपल्या जीवाची मुंबई नसती कां करतां आली?

**भग्नदंतः**—बाळ! तुझ्या बाबाच्या मठ्ठ डोक्यांत जरी हें कदाचित् आलें असलें तरी त्याच्या त्या जड पायाला एवढा दूरचा प्रवास कसा झेंपला असता!

**तीर्यकः**—आणि ह्मणूनच मी धरणीमातेला असा अवजड होऊन बसलों ना? भग्नदंता! ही पाहिलीस कां आधीं आस्वील बेग? अहाहा! कोण हें अप्रतिम सौंदर्य! अहाहा! (चित्राचे मुके.)

**भग्नदंत**:—कायरे तीर्यका! गुलामांचा व्यापार बंद करणारें दयाळु सरकार आतां प्रदर्शनांत नायका मांडूं लागलें आहे तर!

**तीर्यक**:—भग्नदंता! मला वाटतें सरकारानें गुलामांचा व्यापार वास्तविक इतक्यांतच बंद करायला नको होता!

**भग्नदंत**:—तो कां रे बाबा! तसें करण्यांत सरकार चुकलें असें का तुझें ह्मणणें आहे?

**तीर्यक**:—यांत काय संशय? या गुलामांच्या कायद्यानें आज ही आमची तरुण पिढी अशी परक्यांच्या तोंडाकडे पाहूं लागली ना! अरे! हा गुलामांचा कायदा ह्यातच नसता तर कच्च्या रिक्रूटच्या स्वस्त्या भावानें हट्टी बापांची विक्री करून प्रत्येक पोराला ह्या लिव्हरपूर नगरीचा रस्ता आज सुधारतां आला नसतां कां!

**भग्नदंत**:—पण वेड्या! बापाला फुंकून टाकणाऱ्या त्या दिवट्या चिरंजिवाला केव्हांतरी पितृ-पदावर चढावें लागतें हें तूं विसरतोस वाटतें!

**तीर्यक**:—भग्नदंता! सारेच चिरंजिव असा चौकोनी मूर्खपणा कसा करतील? तें राहूं द्या! आणि हा पाहिलास कां स्वच्छंदी स्त्रीयांचा सुंदर तांडा?

**भग्नदंत**:—खरेंच सुंदर! अरे! सुंदर यांत तर शंकाच नाहीं. नाहीं-तर आमच्या घरची......अरे! जरा पिठाचें बोट गालाला लागलेलें खपत नाहीं. पण कायरे तीर्यका! ही अशी अगदीं मध्यें बसलेली ही सर्वांगसुंदर बाला रे कोण?

**तीर्यक**:—भग्नदंता! नारळासाठीं नांवाची हयगय करून मी तुझी निराशा करूं इच्छित नाहीं. भग्नदंता! प्रदर्शनांत पसंत ठरलेली, प्रदर्शन-मंडळानें सुवर्ण-पदक देऊन गौरवलेली, अरे! प्रत्यक्ष या तीर्यकाचें हृदय विद्ध करूं शकलेल्या या सर्वांगसुंदर रमणीय स्त्रीच्या देहाला मिस् यंगहजबंड म्हणतात; आणि भग्नदंता, असा हा सुंदर हजबंड पुढल्या जन्मीं मिळ-ण्यासाठीं आज हिच्या पोटीं जन्म घेण्याची माझी अगदीं तयारी आहे!

**भग्नदंत**:—खरेंच गड्या! करच तसें. ह्मणजे माझ्या पाठीमागचा त्रास तरी चुकेल. अरे! पण हा सुस्वर आवाज कसला?

**तीर्यंक**:—( ऐकून व निरखून. ) अरे! या तर आमच्या माईसाहेब! भग्नदंता! या माईसाहेब तर आतां पूर्ण विरागी बनल्या. त्या पहा! सर्वसंग-परित्याग करून विरागी बनलेल्या जोगीणीप्रमाणें ती पहा त्यांनीं गळ्यांत भगवी कफनी अडकवून दिली आहे? पण मी ह्मणतों, भग्नदंता! अशा या तारुण्यांत ही उपरतीची अवदसा थोडीशी चमत्कारिक नाहीं का?

**भग्नदंत**:—तें बाबा कोणी आणि कसें सांगावें? अरे पण तीर्यंका! त्या पहा इकडेच येत आहेत. चल! आपण जरा बाजूला होऊन त्या कोठें जात आहेत तें पाहूं या. ( जातात. )

## प्रवेश. ४ था.

स्थळ:—( डॉक्टर चंद्रचूडच्या दिवाणखाना. )

( कॉटवर जखमी दिनानाथ; जवळच विमल उभी. )

**दिनानाथ**:—( जागा होऊन. ) हा मुक्या मनाचा विद्युत-संदेश मला कोणी पाठविला? आपण कोण? आणि येथें कां आलांत? कां? बोलत कां नाहीं? सत्यव्रत? सुधाताई? काय? येथें कोणीच कसें नाहीं? माफ करा! आपण कोणीही असा. उभ्या आयुष्यांत आपल्यासारख्या अपरिचित कुमारिकेशीं बोलण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग असल्यामुळें कुमारिकेच्या शालीनतेला साजणारे शिष्टाचार पाळले गेले नसले तर त्याचा दोष माझ्यापेक्षां आपल्या या आकस्मिक आगमनाकडे अधिक आहे हें आपण जाणत असालच. ( स्वगत. ) अरे पण हा काय चमत्कार! मी आहे कोठें? आणि ही कुमारिका कोण?

**विमल**:—महाराज! आपण असें गोंधळून जाऊं नका. महाराज! आपण एका सद्गृहस्थाच्या घरीं खुशाल आहांत! आपण अगदीं निश्चिंत

असा आणि आपणापुढें उभी असलेली ही कुमारिका दुसरी तिसरी कोणी नसून मी त्याच सद्गृहस्थाची एकुलती एक लाडकी कन्या आहे!

**दिनानाथ:**—पण आधीं मी येथें—अशा या परक्या ठिकाणीं—या आपल्या श्रीमंतीच्या रम्य दिवाणखान्यांत—प्रथम आलों तरी कसा?

**विमल:**—तो सारा इतिहास आपणाला ऐकविण्याची माझी उत्कंठा केवळ आजारामुळें खालावलेल्या या आपल्या प्रकृतीकडे पाहून मला जाग-च्याजागीं थोपवून धरावी लागते आहे. महाराज! तत्संबंधीं आपण अगदीं निश्चिंत असा. आपल्याला आतां लवकरच बरें वाटेल आणि मग त्यावेळीं या साऱ्या गोष्टींचा उलगडाही होईल.

**दिनानाथ:**—पण मला वाटतें, तत्पूर्वी वस्तु-स्थितीची अगदीं पुसट कल्पना जर मला मिळेल तर आश्चर्याच्या अज्ञात-डोहांत मला तितका वेळ विनाकारण डुंबत रहावें लागणार नाहीं. आपली ही सभ्य राहणी आणि हा प्रेमळ वाक्-प्रयोग यावरून माझा जीव धोक्यांत खास नाहीं हें मला केव्हांच कळून चुकलें आहे.. पण माझ्यासारख्या आगंतुक पाहुण्याचा हा चाललेला फाजील सत्कार असा स्वेच्छेनें करणाऱ्या त्या परोपकारी महात्म्याचें नांव मला कळेल तर माझ्या कृतज्ञ जीवाला तितकाच विरंगुळा वाटून त्या-मुळें मी स्वतःला भाग्यवान् समजेन?

**विमल:**—आपल्या जीवाला विरंगुळा वाटावा म्हणूनच तर हा कठोर अबोला आम्हाला आमच्या इच्छेविरुद्ध स्वीकारावा लागत आहे. महाराज! या माझ्या मौनव्रताची सांगता आपल्या दुःखांत होणार नाहीं या एका आश्वासनाखेरीज आज मला अधिक असें कांहींच सांगता येत नाहीं.

**दिनानाथ:**—असो! आपली इच्छा! पर आपलें नाहीं इतकें सम-जल्यावरसुद्धां तशा परक्या ठिकाणीं स्वतःचाच हेका चालविणाऱ्यांची वेड्यांत जमा होत असते ही गोष्ट मी आजपर्यंत नुसती ऐकतच आलों होतों.

**विमल:**—हें काय! आपणाला आधीं वेडे असें कोणी म्हटलें? तीन दिवस अगदीं निश्चेष्ट पडलेल्या या आपल्या देहांत आजन्न जरा कोठेसें

चैतन्य दिसूं लागल्यामुळें मी हर्षातिरेकानें हुरळून जाऊन माझ्या अति-भाष-णानें आपल्या त्रस्त जीवाला कष्टवूं नये म्हणून बाबांनीं सकाळीं डिस्पेन्सरींत जातांनां मला तसें मुद्दाम बजाविलें आहे!

**दिनानाथ :**—आपल्या सुशील वडिलाचें नुसतें नांव कळल्यानें भाषणाचा अतिप्रसंग कसा होतो हेंच मला कळत नाहीं. बरें, माझ्या मनःस्वास्थ्याचा आपण विचारच केला नसेल असें तरी मी कोणत्या तोंडानें म्हणूं? पण रोग्याच्या शारिरीक स्वास्थ्याइतकेंच त्याच्या मनःस्वास्थ्यालाही जपलें पाहिजे असें भिषग्वर्यांचें मतैक आहे.

**विमल :**—( स्व. ) आतां मात्र शर्थ झाली बाई, ( प्र. ) स्वतःच्या रोजनिशींत मात्र आपल्या नांवाचा उल्लेख न करणाऱ्यांनां म्हटलें, दुसऱ्यांचीं नांवें घेऊन काय करावयाचीं आहेत?

**दिनानाथ :**—पण नांवांत खरोखरच तशी अद्‌भुत जादू नसती तर माझ्या पश्चात् आपणाला माझी खासगी रोजनिशी तरी काय करावयाची होती?

**विमल :**—( स्व. ) आतां काय करूं बाई! ऐकलेंत का! आपल्या पदारविंदानें पावन केलेल्या या घराच्या मालकाला डॉक्टर चंद्रचूड म्हणतात.

**दिनानाथ :**—आणि त्यांच्या या लाडक्या मुलीला—?

**विमल :**—तें नाहीं मला माहीत! ( लाजते. )

**दिनानाथ :**—कां बरें? ओंठावरचा शब्द असा पोटांत ढकलून मला वाटतें, आपल्या मनाची भूक तर शमली नसेलच पण माझा मात्र इकडे वाढत्या उत्कंठेनें विनाकारण प्राण जातो आहे. बाकी जीव देणा-ऱ्यांनीं जीव घेतला तर त्यांत तक्रारीला फारशी जागा राहत नाहीं म्हणा!

**विमल:**—पण परस्त्रीच्या नांवाची चौकशी थोडीशी शिष्टाचाराला सोडून नाहीं का दिसत?

**दिनानाथ:**—पण शिष्टाचाराला सोडून गेलेली चौकशी केवळ नांवा-पुरतीच असते. कां आपलें नुसतें नांवसुद्धां ऐकण्याची माझी पात्रता नाहीं ह्मणतां? नसेलही कदाचित्! कारण मी आहेच तसा जन्मापासून दळभद्या नशिबाचा!

**विमल:**—अगबाई! हा काय इकडे अर्थाचा अनर्थ–चालला आहे पण! ऐकलंत कां? माझ्या मेल्या नांवाकरितां इतका कांहीं जीवाचा त्रागा करून घ्यायला नको आहे ह्मटलें! ऐकायचें ह्मटलें, मला 'विमल' ह्मणतात. ( लाजते. )

**दिनानाथ:**—काय? विमल! अहाहा! आपलें नांव किती सार्थ आहे ह्मणतां! खरोखर! नांवाप्रमाणें आपलें अंतरंगही विमल आहे यांत संदेह नाहीं. विमल! या अभागी प्राण्याची करूण कहाणी सांगून मी तुझें विमल अंतःकरण मलीन करूं इच्छित नाहीं, तथापि विमल! आजन्म दुसऱ्यांच्या उपकारांखालीं जमीनीपर्यंत वांकून गेलेल्या या परान्नपुष्ट देहाचा हा झाला इतका इतमाम बस्स आहे. विमल! उपकार-कर्त्यांचें नांव कळल्यानें माझ्या अंतरीचा आनंद दुणावला आणि या संजीवन-शक्तीनें तर माझ्यांत आतां नवजीवन उत्पन्न झालें. तुझ्या नजरेंतल्या नाजूक फिरकीनें माझा रोग आतां कायमचा फिरवला! ( विमल लाजते. )

**विमल:**—पण बरा झालेल्या रोग्यानें वैद्याला अद्याप आपलें नांव नाहीं कळविलें?

**दिनानाथ:**—विमल! या रोग्याचें रोगट नांव घेऊन तुला काय करायचें आहे! तथापि, विमल! आईबापांनीं माझें नांव 'दिनानाथ' असें ठेवण्यांत मी एखाद्या दुबळ्या दीनेला हातभार देऊन तिला सनाथ करावें असा कदाचित् त्यांचा हेतू असेल! पण परमेश्वरी इच्छा कोणी सांगावी?

**विमल:**—( स्वगत. ) प्रणयी-जीवा! इतक्यांत असा अधीर होऊं नकोस. ( प्रगट. ) अगबाई! औषधाची वेळ नाहीं कां झाली! ऐकलंत कां आपण आतां हें औषध घेऊन स्वस्थ झोपीं जावें. ( औषध देत )

( स्पर्शजन्य सुखानें धुद. हातांत हात. पेल्यांत औषध अर्धेच. )

**दिनानाथ:**—( स्वगत. ) हा काय चमत्कार! पुनः तोच मुक्या मनाचा विद्युत संदेश असा वरचेवर मला कोण पाठवीत आहे? अरे पण हें काय? माझ्या या दरिद्री हातानें कुमारिकेच्या हाताचा अभिलाष धरला का या कुमारिकेनेंच माझ्या या दरिद्री हाताचा हव्यास धरला? आणि हा काय चमत्कार! जों जों मी आपला हात काढून घेण्याचा प्रयत्न करतो आहे तों तों मला विवेकाचा विद्युत-संदेश निराळेंच बजावतो आहे! ( प्रगट. ) विमल! माफ कर! माझ्या हाताइतकेंच तुझेंही मन तितकें दुबळें आहे कां?

**विमल:**—दुबळें नसतें तर त्यानें या आपल्या सबल हाताचा असा धट्ट आश्रय कशाला केला असतां?

**दिनानाथ:**—पण या माझ्या दरिद्री हातानें तुला कधींकाळीं सोन्याचे दिवस दिसतील अशी कां तुझी खात्री आहे? विमल! तूं धरलेल्या या हाताच्या सहवासानें आजपर्यंत सोन्यासारख्या स्नेहांची माती होत गेली आहे. असा या माझ्या हाताचा पराक्रम आहे.

**विमल:**—मग पराक्रमी हातांत स्वतःचा हात बिनदिक्कत देण्यांत सोन्याची माती झाली तरी गुण-ग्राहक मनाला त्यांत भूषणच वाटेल!

**दिनानाथ:**—पण असा हा उगाच धडाचा विध्वंस कां वरें?

**विमल:**—कारण विध्वंसावाचून धडाची खरी किंमत कळत नाहीं ह्मणून!

**दिनानाथ:**—विमल! तुझ्या सोन्यासारख्या देहाचें सोडलें जाणारें दानोदक या माझ्या फाटक्या हातांत राहणार कसें? त्याचा स्पर्श होतांच तें खालीं गळून मातीमोल नाहीं कां होणार?

**विमल:**—खालीं गळून पडलें तरी तें आपल्या पायाजवळच पडणार ना? या चरण-कमलांच्या इतका बळकट सान्निध्याश्रय मिळाल्यावर त्याला अधिक तें काय पाहिजे?

**दिनानाथ:**—पण विमल! दरिद्र्याच्या या दळभद्री कपाळावर तुझ्या भाग्याचा भारदस्त पाय आधीं ठरेल तरी कसा?

**विमल:**—पण लक्ष्मीच्या चंचल पायावर चिकटून ठेवलेलें भाग्याचें भविष्य भावी भयानें सारखें हेलखावे नाहीं का खाणार?

**दिनानाथ:**—पण निदान तें स्थान-भ्रष्ट होत नाहीं हें काय कमी झालें?

**विमल:**—पण नुसतें स्थानापन्न असून तरी काय उपयोग! स्थानापन्न झालेल्या भ्रष्ट भाग्यांनीं आपल्या डळमळीत हातांनीं राष्ट्राच्या संसाराची माती करून टाकली आहे.

**दिनानाथ:**—पण विमल! असा हातांत हात घालून आणि किती वेळ बसावयाचें?

**विमल:**—या भाग्यशाली हातावर माझी मालकी प्रस्थापित होईपर्यंत.

**दिनानाथ:**—पण या माझ्या हातावर तुझी मालकी प्रस्थापित होते न होते तोंच माझ्या नेहमीच्या दुर्दैवानें आपली कठोर कुऱ्हाड चालवून या तुझ्या हाताला त्यानें अंतःकरणापासून अलग केला तर—

**विमल:**—...तर अलग झालेल्या ह्या हाताला एकेकाळीं अंतःकरण होतें एवढें प्रेमी-समाधान मला पुरें आहे? हतबलाला नुसत्या हाताचा आधार पुरा होतो. पण महाराज! ही आपली कृपा अस्थानीं होत आहे असें नाहीं ना आपल्याला वाटत?

**दिनानाथ:**—तुझा हा हात मी अद्याप सोडला नाहीं ही एकच गोष्ट तुझ्या प्रश्नाचें उत्तर देऊं शकेल. आतां दानोदकाचा शिक्का-मोर्तब मीं या तुझ्या गुलाबी गालावर अजून उमटवला नाहीं याचें कारण, माझ्या धरसोड मनःप्रवृत्तीचें हें विकृत लक्षण नसून असलें हें अतुल भाग्य शिरीं धारण करतांनां मनाला वाटत असलेला हा सखेद संकोच आहे.

**विमल:**—पण महाराज! यांत खेदाचें काय बरें प्रयोजन?

**दिनानाथ :**—कारण मी स्वतःचा मुळींच बांधला नाहीं. विमल! माझ्या परमपूज्य पालनकर्तीच्या पवित्र प्रतिमेला साक्ष ठेवून देशोद्धाराकरतां प्रसंगीं पडेल तो ' स्वार्थ-संन्यास ' करण्याची मी प्रतिज्ञा केलेली आहे. तिच्या-आड येणारा कसलाही स्वार्थ मला केव्हांही प्रिय असणार नाहीं. पण विमल! या माझ्या चाललेल्या श्रीमंती पाहुणचाराचें वास्तविक प्रयोजन काय हें नाहीं मला तूं अद्याप सांगितलेंस?

**विमल :**—महाराज! वेडगार्डनच्या रस्त्यावर आपणाला दुष्ट मारेकऱ्यानें पाठींत लाठीचा प्रहार केल्यामुळें आपण बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला पण इतक्यांत सुदैवानें आमच्या मोटारचें हॉर्न वाजल्यामुळें मारेकऱ्यानें तेथून पोबारा केला! आपल्या निश्चेष्ट अंगावरून आमची मोटार अगदीं जाणार तोंच मला आपली अंधुक आकृति दिसली आणि लागलींच मी आणि बाबा खालीं उतरून आपणाला येथें आणलें. माझे बाबा स्वतः डॉक्टर असल्यामुळें सारे उपचार आम्हीं येथेंच केले; पण दोन दिवसपर्यंत आपल्यांत चैतन्य म्हणून तें कसलेंच दिसून आलें नाहीं पण परमेश्वरी-कृपेनें आजचा हा सोन्याचा दिवस उगवला!

**दिनानाथः**—कांचन खिडींतलें सृष्टि-सौंदर्य अवलोकन करून घरीं परत येत असतां मागून कोणातरी दुष्टानें माझ्या पाठींत लाठीचा प्रहार केल्याचें मला स्मरतें खरें पण पुढें काय झालें तें कांहीं आठवत नाहीं. असो. एकाअर्थी मारेकऱ्यानें ही माझ्यावर कृपाच केली म्हणायची कारण माराच्या स्वस्त्या भावानें ही असली सोन्याची संधी मला एरवीं लाभली नसती. पण विमल! हा तुझा पाहुणचार आणखी किती दिवस चालणार!

**विमल :**—महाराज, आतां हा पाहुणचार होऊं शकत नाहीं. आतां याला पाहुणचार म्हणणें म्हणजे घर धन्यालाच घराबाहेर काढणें नव्हे का?

**दिनानाथः**—विमल! मी येथें असा ऐष-आरामांत लोळत पडल्यावर, या तुझ्या बंद केलेल्या खिडक्यांच्या श्रीमंती तावदानांतून मला माझ्या गरीब

कुटुंबाचा आर्तस्वर ऐकूं कसा येणार? गेल्या दोनतीन दिवसांच्या गैरहज-रीनें भांबावून गेलेल्या माझ्या सुधा-सत्यव्रतांच्या चित्तांनां काय वाटत असल!

**विमल :**—हे सुधा-सत्यव्रत कोण?

**दिनानाथ:**—ही बहीण भावाची प्रेमळ जोडी माझ्यासारखीच अभागी आहे. त्यांच्या चारित्र्यांचा इतिहास ह्मणजे एक संपूर्ण दैव-लिला होऊं शकेल! बिचाऱ्यांनां माझ्याकरतां स्वतःच्या घरावर तुळसपित्र ठेवावें लागलें! विमल! त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्याचें महत्-भाग्य माझ्या या फुटक्या ललाटीं असेल कां? विमल! माझ्या हयातींत मला ऋणमुक्त होतां आलें नाहीं तर मरणोत्तर माझ्या उपकारबद्ध जीवाला खास सद्गति मिळणार नाहीं.

**विमल:**—महाराज! आपण असें कष्टी कां होतां? आपणाला कर्जमुक्त पाहण्यासाठीं प्रसंगीं स्वतःच्या प्राणाची परवा करण्याची माझी इच्छाही नाहीं आणि आतां, मला वाटतें, तसा अधिकारही उरला नाहीं. ( लाजून दूर. )

**दिनानाथ :**—विमल! त्या मागून येणाऱ्या भविष्याकरतां हा सध्या पुढें असलेला वर्तमान सोडून देण्याची माझी मुळींच तयारी नाहीं अँ!

**विमल :**—बस्स! बस्स! इतकेंच मला पुरें आहे. या एवढ्याच एका आश्वासनावर आरूढ होऊन मला माझी जीवीत यात्रा खात्रीनें संप-वितां येईल!

**दिनानाथ :**—तें असो. पण विमल, शिष्ट-वाक्याप्रमाणें पाहुण्याचे तीन दिवस होऊन गेले ना? शक्य तितक्या लवकर मला घरीं परतायला नको काय?

**विमल :**—अगबाई, हा आवाज कसला! बाबा आले वाटते.

( उठून पुढें होतें व सत्यव्रत अंकासह येतो. )

**दिनानाथ :**—( एकदम पुढें होऊन. ) कोण? सत्यव्रत! अहाहा! बाळ! तूं येथें अगदीं नेमका कसा आलास?

**सत्यव्रत :**—आजच्या 'लोकनायका'च्या अंकांतील ही जाहीर नोटीस मला 'मोफत वाचनालयां'त वाचायला मिळतांक्षणींच मी या पत्त्या

वर तुझा शोध करीत करीत येथें आलों. दिनानाथ! शक्य तितक्या लवकर आधीं घरीं चल पाहूं. कारण त्या पाजी मधुकरानें तुझ्या गैरहजरीचा भलताच फायदा घेऊन ताईची निराळीच समज करून दिली आहे. चल! चल लवकर! आणि शोकाकुल ताईला आधीं तुझ्या पुनर्जन्माची ही हकिगत सांगू चल!

**दिनानाथः**—काय ह्मणतोस? खरेंच कां सत्यव्रत! मधुकरानें सुधाताईची तशी समजूत करून दिली? अरेरे! बिचारीनें माझ्यासाटीं आकांत करून अश्रूंची शय्या केली असेल. विमल! अशा स्थितींतसुद्धां मला प्रथम घरीं गेलें पाहिजे. विमल! कृतज्ञ अंतःकरणानें मी तुझी आतां रजा घेतों.

**सत्यव्रतः**—चल! चल! दिनानाथ! आतां वेळ अगदीं गमावूं नकोस. चल! चल लवकर.

**विमलः**—( सत्यव्रतास. ) आपणाला तशा तांतडीनें जायाचेंच असेल तर मी आमची मोटार सांगतें; शिवाय, रोग्याच्या अंगांत पायीं चालत जाण्याइतकी शक्ति अद्याप आलेली नाहीं.

**सत्यव्रतः**—दयामय देवी! आपल्या अनंत उपकारांवर आपण ह्या दयेचा अमूल्य कळस चढवीत आहांत. शिवाय; शक्य व सोईचें असल्यास आपले हे उदार चरण आमच्या गरीबांच्या झोंपडीस लागले तर माझ्याप्रमाणेंच माझ्या लाडक्या ताईला अत्यंत समाधान वाटेल!

**विमलः**— हा तर केवळ मी अलभ्य लाभ समजतें. मग चला तर आपण सारींच खालीं जाऊं ह्मणजे भय्याला मोटार तयार ठेवायाला बरी पडेल. आणि जातांजातां ही हकिगत डिस्पेन्सरींत बाबांना कळवून आपण तसेंच पुढें होऊं. चला तर मग. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळः**—(काव्य-चंद्रिका कार्यालय. )

**मधुकरः**—सुधे! मग काय ठरला तुझा विचार?

**सुधा:**—मधुकर! माझा हिय्या मी मागेंच जाहीर केला आहे. त्याची पुनरोक्ति करण्याचें आतां बिलकूल कारण नाहीं व तशी माझी इच्छाही पण नाहीं. पण मधुकर! भाई बाहेर पडतांक्षणींच असें चोरून घरांत शिरून माझ्यासारख्या एका गरीब अबलेपुढें आपला अपूर्व पराक्रम गाजवायला तुमच्या धीरोदात्त पौरुषाला थोडी लाज वाटायला पाहिजे होती! मधुकर! परवां प्राणावर बेतलेल्या प्रसंगांतून ज्यानें आपणाला सहीसलामत निभावून नेलें त्या दयामय परमेश्वराची आधीं करुणा भाकलीत कां?

**मधुकर:**—सुधे! मला या तुझ्या भाकड-कथा नको आहेत! नीट शुद्धीवर येऊन माझ्या प्रश्नाचें प्रथम उत्तर दे नाहींतर........

**सुधा:**—नाहीं तर असें काय होईल?

**मधुकर:**—काय होईल? चवचाल पोरी! (पिस्तूल काढून.) हें माझें पांचबारी पिस्तूल तुझ्या मानेवर चढून जातांच या तुझ्या हट्टी जीभेला माझें इच्छित उत्तर तात्काळ ओकावें लागेल. हें पोरी! अशी दचकूं नकोस! पंच-हत्यारी सेनापतीचा वकूब थिजून गोळा होऊन या माझ्या टीचभर पोलादी नळकांड्यांत आपलें तोंड लपवून बसला आहे. वेडे! यांतल्या या शिसाच्या गार गोळीनें तूं अशी हकनाक गारद झाल्या-वर तुझी ही हट्टवादी जीभही मग आपोआपच गारठून जाईल!

**सुधा:**—मधुकर! बागेंतल्या आईच्या पुतळ्याजवळ मागें एकदां तुह्मी आमच्यावर रोखलेल्या पिस्तुलाकडे आह्मी जाणून-बुजून कानाडोळा केला आणि सरकारी अधिकाऱ्यांजवळ त्याची दाद मागितली नाहीं ह्मणजे ती कांहीं तुमच्या कर्तबगार बुद्धीची अचाट करामत नव्हे. तो आमचा केवळ उदारपणा होता! ती आमची तुमच्यावर कृपा होती! तें आह्मी दाखविलेल्या उदारपणानें दिलेलें अभय-दान होतें! मधुकर! हें सुधारलेलें विसावें शतक आहे. पाहिजे त्यानें कायदा हातीं घ्यायचास ही कांहीं अंधेर नगरीं-तील चौपट-पातशाही नव्हे. शिवाय; मधुकर! आपल्यासारख्या सुशिक्षित

सज्जनाला सरकारी हत्यारांचा कायदा माहीत नसेल असें मी कोणत्या तोंडानें ह्मणूं बरें?

**मधुकरः**—वेडे! हत्यारांचा कायदा हत्यारबंद लोकांकरितां असत नाहीं, आणि सुधे! कसल्याही कायद्याची कसलेली कठ्यार सत्ताधारी सम्राटाला स्पर्श करूं शकत नाहीं. सुधे! बागेंतल्या त्या अतिप्रसंगानें जर माझ्या सत्तेची मान्यता तुमच्या स्मरण-पटावर कायम टिकणारी असेल तर स्वतःला सम्राट ह्मणून संबोधून घेण्यांत तरी कसली हरकत आहे?

**सुधाः**—शस्त्रसम्राट! रक्तपातानें तुझें शील वाढणारें असेल तर तें अगदीं शान्तपणानें पाहण्याची आमची तयारी आहे. मधुकर! कायद्यांचीं कडक बंधनें तुझ्या सत्तेपुढें शिथिल पडलीं किंवा न्याय-देवतेचा समतोल कांटा आमच्या सद्दीमुळें तुझ्याशीं पक्षपात करीत असला तरी या सामाजिक अन्यायांच्या घोर पातकांचा पापी पर्वत असा उंचावत जातां जातां अखेरीस तो कोलमडून जाऊन तुझ्या या नास्तिक मस्तकांत परमेश्वराचा प्रखर प्रकाश पडल्याशिवाय खास राहणार नाहीं.

**मधुकरः**—परमेश्वराच्या प्रखर प्रकाशा! तुला काय प्रकाश पाडावयाचा असेल तो आतां खुशाल पाड. हें पहा! मी हें माझें पिस्तूल आतां तुझ्या सुधेवर रोंखतों. (रोंखतों.)

**सुधाः**—पण मधुकर! हें तुमचें पिस्तूल असें चळतें कां?

**मधुकरः**—वेडे! तुझ्या मरणाकडे सारखी टक लावून पाहत असतां त्याच्या स्थीरावलेल्या दृष्टीला पाहण्याचा अति-श्रमामुळें त्याला कदाचित् ही क्षणिक भोंवळ आली असेल!

**सुधाः**—आणि मधुकर! तशा स्थितींत त्यानें चुकून तुमच्याकडेच वळून पाहिलें तर?

**मधुकरः**—पाहिलें तर? पाहिलें तर त्याला त्याचा इच्छित बळी मिळाला नाहीं ह्मणून तें माझ्याप्रमाणेंच अत्यंत कष्टी होईल. पण त्यानें

अशी दिशाभूल होऊं नये ह्मणून या माझ्या मार्गदर्शक हाताचा त्याला खंबीर आश्रय आहे ना?

**सुधाः**—मधुकर! यःकश्चित् मानवी हाताच्या दुबळ्या आश्रयानें जर हें तुमचें टीचभर निर्जीव नळकांडें आपल्या इच्छित ध्येयापासून अगदीं रेसभरही चळूं शकत नाहीं तर ही साडेतीन हाताची सजीव पुतळी परमेश्वरी पाठबळ पाठीशीं हजर असतां भलतीकडे वळेल असें या तुमच्या बुद्धीप्रधानमस्तकाला आधीं पटतें तरी कसें?

**मधुकरः**—पोरी! इतक्या लवकर जगाला कंटाळून जाऊन काळाच्या स्वाधीन होण्यांत तुला असें काय प्रेम वाटतें? वेडे! मरणोत्तर या तुझ्या सौंदर्याची एकदां माती झाल्यावर स्मशानांतल्या कोल्हाकुत्र्यांनींच ना ती पायाखालीं तुडवायची? पण जाऊं दे. तुझी तशी इच्छाच असेल तर त्याला माझी मुळींच आडकाठी नाहीं. हें पहा! सुधे! मी आतां तुझ्यावर दुसऱ्यांदा पिस्तूल रोंखतों. वेडे! कोठें आहे तो तुझा परमेश्वरी प्रकाश?

**सुधाः**—मागून येणारा परमेश्वरी प्रकाश दृष्टी अंतर्मुख झाल्याविना कसा दिसणार? पण तो पहा! मधुकर! प्रकाश हळूंहळूं येऊं लागला! पण तुमच्या या पोलादी नळकांड्याला असा थरकांप सुटायला काय झालें? मधुकर! त्या परमेश्वराच्या देदिप्यमान प्रकाशामुळें तुमचे डोळे दिपून जाऊन यानें आयत्या वेळीं दैवी आवाज देऊन तुह्माला दगा दिला तर.........

**मधुकरः**—तर? आयत्या वेळीं दगा देणाऱ्या या दगलबाज पिस्तुलाला मी अस्सें दूर फेंकून देईन. (फेंकतो. व येणारा सत्यव्रत तें झेलतो. त्यासाठीं उभयतांची झटापट. सारे भयभीत. द्वंदांत पिस्तूलाच्या आवाजाबरोबरच परमेश्वरी प्रकाश. सत्यव्रत घायाळ.)

**मधुकरः**—(सत्यव्रताकडे पाहून.) हें काय? (सुधेच्या पायाजवळ पडतो व तिचे पाय धरून.) हें काय?

**सुधाः**—(विवेक.) हाच तो परमेश्वरी प्रकाश!

**मधुकरः**—सुधाताई! हें मी काय केलें?

**सुधा :**— बाळ! हा तूं राष्ट्रघात केलास!

**मधुकर:**— काय? राष्ट्रघात?

**सुधा :**—होय बाळ! राष्ट्रघात! पण या राष्ट्रघाताबरोबरच तूं आज एक राष्ट्रकार्यही केलेंस!

**मधुकर:**—राष्ट्र-घाताबरोबरच राष्ट्र-कार्य? व्यक्तीच्या बाराव्या-बरोबर तिच्या बारशाचा समारंभ? छे! सुधाताई! या परस्पर विरोधी विधानांचा मेळ मी कसा घालूं?

**सुधा :**—बाळ! या बाणेदार राष्ट्र-पुरुषाच्या तेजस्वी ज्योतीबरोबरच तूंही आपली सूडाची प्रज्वलित ज्योत कायमची मालवून टाकून सामाजिक निराशेच्या भयाण अंधःकारांत तूं आज दयेचा दैदिप्यमान दीप पुन्हां प्रदित केलास! अहंकाराच्या विषारी सापाला हृदयांतून हांकलून देऊन तूं आज राष्ट्राचा संसार निर्भय केलास! बाळ! या करारी पुरुषाच्या मरण-कालच्या मुहूर्तावर तूं आपल्या समाज-सेवेची मुहूर्त-मेढ रोंवलीस! मधुकर! या तुझ्या 'स्वार्थ-संन्यासा'नें हें केलेलें राष्ट्र-कार्य माझ्या लाडक्या भाईच्या मरणानें होणाऱ्या राष्ट्र-घाताइतकेंच महत्वाचें आहे. मधुकर! शुकाच्या मनोजया-इतकाच विश्वामित्राचा तपोभंग महत्वाचा नाहीं काय?

**सत्यव्रत :**— आई! आई! अगाई! आईग! पाणी-पा-पा-णी-णी .

**दिनानाथ :**—सुधाताई! आंतलें पाणी आणा. अरेरे! मधुकर! हें तूं काय केलेंस? बाळ सत्यव्रत! काय ही तुझी दशा! सत्यव्रत? बाळ सत्यव्रत? डोळे उघड आणि तुझ्या ताईची ही केवीलवाणी स्थिति पहा!

(पाणी पाजवितात.)

**मधुकर :**—अरेरे! कोण चांडाळ मी! परमेश्वरा! तूं या पातक्याला क्षमा नाहीं का करणार? प्रार्थनेसाठीं परमेश्वराकडे पाहण्याकरितां उचललेली मान लज्जेनें नकळत खालीं वळते तर अन्तर्मुख दृष्टीला हृदयांतला परमेश्वराचा सुन्दर प्रकाश सहन होत नाहीं. सुधाताई! दिनानाथ! ह्या केल्या

कर्मांचा मला आतां पश्चाताप होत आहे. मला क्षमा करा. मी एक कल्पनातीत पातकी आहे. उदार महात्म्यानों! या तुमच्या राष्ट्र-पुरुषाचा खून पाडल्याबद्दल मला क्षमा करा; पण थांबा–( सत्यव्रताचे पाय धरून. ) पिताजी! पितृ-हत्त्येबद्दल या आपल्या अविचारी पोराला क्षमा करा!

**सत्यव्रत:**—( कह्नत. ) कोण तें? कोण क्षमा मागतें आहे.

**दिनानाथ:**—बाळ सत्यव्रत! पश्चातापानें दग्ध झालेला हा आपला मधुकर तुझ्या क्षमेची अपेक्षा करीत आहे.

**सत्यव्रत:**—( एकदम उठून. ) काय? पश्चाताप? आणि तो मधुकराला? हें मी आज काय ऐकतों आहे? खरेंच का दिनानाथ! मधुकराला पश्चाताप झाला आहे?

**सुधा:**—होय भाई! पश्चातापानें पावन झालेला हा आपला मधुकर करुणस्वरानें तुझ्या क्षमेची याचना करीत आहे!

**सत्यव्रत:**—अहाहा! मग कोण भाग्य माझें हें! दिनानाथ! आज मात्र माझें जीवित खरें-खुरें सार्थकीं लागलें. दिनानाथ! मधुकराच्या या पश्चातापानें मी आज एक प्रचंड राष्ट्र-कार्य साधलें. एका पतित आत्म्याचें परावर्तन करून मी आज माझ्या लाडक्या समाजाचा मार्ग अगदीं निष्कंटक करून टाकला. माझ्या लाडक्या समाज-पुरुषा! तूं आतां इतउत्तर अगदीं निर्भय रहा! खरेंच दिनानाथ! माझ्या मरणानें मधुकराला पश्चाताप होत असेल तर मरणांच्या संतत धारेचा अव्याहत अभिषेक या माझ्या अभागीं मस्तकावर अक्षय होऊं दे! मरणानें मोक्ष मिळत असला तर मानी मनाची मिजास कोण ठेवणार? ताई! कोठें आहे तुझा तो मधुकर?

**मधुकर:**--राष्ट्र-देवा! माझ्या पापी नामोच्चारानें आपली पवित्र जिव्हा कशाला विटाळून घेतां! गुरु-महाराज! हा आपल्या दासानुदासाचा किंकर-सेवक या आपल्या चरण-कमलाजवळ सेवेची वाट पाहत उभा आहे. दासाला आज्ञा व्हावी.

**सत्यव्रत**:--पण तो असा दीनासारखा अगदीं अधोवदन कां?

**मधुकर**:--कृतकर्माच्या पश्चात्तापामुळें शरमिंदें झालेलें तोंड गुरु-माऊलीला दाखविण्याला त्याला बेसुमार लाज वाटते आहे. गुरुराज! आपण या पातक्याला क्षमा केली असें ह्मटल्याशिवाय मी या आपल्या उद्धारक पायांचा आश्रय सोडणार नाहीं. देवाधिदेवा! देणार ना मला अभय?

**सत्यव्रत**:—परमेश्वरा! तुझा महिमा खरोखरच अतर्क्य आहे. बेटा मधुकर! तूं अगदीं निश्चिंत रहा. मी तुला पूर्ण अभय दिलें आहे. ताई! ऐकलीस नाही आतांची आकाश-वाणी! पण अयाई! अयाई! दिनानाथ! छातींतून वाहणाऱ्या जोराच्या रक्त-स्त्रावानें माझी शक्ति क्षणोक्षणीं खचत चालली आहे!

**सुधा**:—भाई! बोलण्याच्या श्रमानें रक्ताचें अभिसरण जोरानें होतें आहे ह्मणून ह्मणतें, क्षणभर स्तब्ध बसलास तर नाहीं कां चालणार?

**सत्य०**:—ताई! काळाच्या जबड्यांत बसलेल्या अभागी प्राण्याला वेळेचा हा विनियम पाहिजे कशाला? असो. तुमच्याबरोबर आजचा हा सोन्याचा दिवस साजरा करायाला मला काल-पुरुषाची परवानगी नाहीं ह्मणून तुह्मी कष्टी होऊन तुह्मी आपला आनंद खची करून घेऊं नका! व्यक्तीच्या संकटानें राष्ट्रोद्धार झाल्याचीं उदाहरणें सत्याच्या इतिहासांत अक्षय चमकत आहेत. बाळ मधुकर! देवेंद्राच्या दरबारांत जाण्याची माझी वेळ भरत चालली!

**मधुकर**:—मग गुरुराज! मलाही आपल्याबरोबर तिकडे घेऊन जाण्याला विसरूं नका. निर्लज्जपणांत निढावलेला माझा जीव कितीही वातड असला तरी गुरुराज! ह्या माझ्या पांचबारी पिस्तूलांत अद्याप चार बळी शिल्लक आहेत.

**सत्य०**:-बेटा मधुकर! तूं चुकतो आहेस. माथेफिरूपणाचा हा प्रत्यक्ष परिणाम मी असा भोगत असतां, बाळ! अविचारानें हातोहात जगावेगळें होण्याचा बदफैली सल्ला मी तुला कसा देऊं? मधुकर! तरुण पिढीवर आज

येऊन पडलेल्या कर्तव्याची तुला कल्पनाही नाहीं. बेटा! सामाजिक नभोमंडलांत पसरलेल्या निराशेच्या घनदाट अंधःकारांत दास्य-शृंखलांनीं दिवसेंदिवस खंगत चाललेल्या तुझ्या हतभागी समाज–पुरुषाकडे एकदां नीट निरखून पहा ह्मणजे मार्कंडेयाच्या अगणित आयुष्याचाही तुला हेवा वाटेल. होतकरु तरुणा! महत्तम कृत्यें हांतून घडण्याला आपण अमर आहोंत ही भावना आधीं दृढमूल झाली पाहिजे!

**मधुकर** :—पण महाराज! अपमानाच्या जीण्यापेक्षां मानाचें मरणें मिळविण्यासाठीं प्रसंगी देहाची कुरबान करणें अधिक कीर्तिप्रद नाहीं कां?

**सत्य०** :—आवेगाच्या क्षणिक झटक्यावरोबर देहाचा बिनमोल बली अर्पण करणें जरी तेजस्विता असली तरी बाळ! दुःखाला तोंड देत देत मातृभूमीच्या सेवेसाठीं 'स्वार्थसंन्यास' करीत जगणें खात्रीनें अधिक श्रेयस्कर आहे. मधुकर! शूरपणानें मरण्यापेक्षां मर्दानीपणानें जगणेंच राष्ट्र-हित-दृष्ट्या अत्यंत महत्वाचें आहे. बाळ! माझ्या अपुऱ्या समाज-सेवेचें व्रतकंकण तूं आतां आपल्या हातांत बांधणार ना? मधुकर! सत्याकरीतां उच्चारलेल्या भल्याबुऱ्या शब्दाबद्दल या तुझ्या मरणोन्मुख मित्राला क्षमा कर. तसेंच माझ्या प्रेमळ ताई......

**सुधा**:—भाई......... (रडते.)

**सत्य०** :—छे! छे! ताई! असें डोळ्यांत पाणी आणून तूं मला शेवटचा निरोप देऊं नकोस. भरल्या उत्साहानें मला माझी जीवित-यात्रा संपवूं दे. ताई! भगिनी–प्रेमानें माझ्याकडून करविलेला हा माझा आत्मसंन्यास तुझ्या मधुकरानें स्वेच्छेनें केलेल्या स्वार्थ–संन्यासाहून कमी दर्जाचा आहे ह्मणूनच ना ही अश्रूंची अमूल्य माळ अशी सारखी तुटते आहे. पण ताई! असें अकालीं मरून जाऊन हतबल हिंदमातेशीं बेइमान होऊन मातृद्रोह करण्याची घोरतम कल्पना मला स्वप्नांतसुद्धां कधीं डोकावली नव्हती! असो. परमेश्वराच्या साऱ्या कृती मानवांच्या कल्याणाकरितां असतात. दिनानाथ...

**दिनानाथ:**—बाळ, सत्यव्रत............

**सत्यव्रत:**—दैवाच्या वक्रगतीनें माझ्या कर्त्तृत्वावर अशी आकाशाची आकस्मिक कुऱ्हाड पडल्यामुळें जगाच्या रंगभूमीवरील जगदीशाचें कर्त्तव्य माझ्याकडून यथायोग्य रंगलें गेलें नाहीं ह्मणून मला त्याचें राहून राहून वाईट वाटतें, तरी माझी अपुरी राहलेली समाज-सेवा पुरी झाल्याशिवाय माझ्या शपथबद्ध आत्म्याला सद्गति मिळणें शक्यच नाहीं; तर दिनानाथ! कधींकाळीं मी तुझ्यावर प्रेम केलें असलें .........

**दिनानाथ:**—हें काय बरें सत्यव्रत? तुझ्या प्रेमाचा मला विसर कसा पडेल? सत्यव्रत! तुझ्या आत्म्याला सद्गति मिळण्यासाठीं मी वाटेल तें दिव्य करायला तयार आहे ना?

**सत्यव्रत:**—दिनानाथ! आतां माझा सहवास फारच अल्प आहे तथापि, माझ्या प्रेमळ मित्रा! जातांजातां एका राष्ट्र-कार्याची उभारणी करण्याचा सात्विक मोह अशा दुबळ्या स्थितींतसुद्धां माझ्याच्यानें **सोडवत नाहीं.**

**दिनानाथ:**—मग बोल! बोल सत्यव्रत! तुझी शेवटची काय इच्छा आहे ती बोल! मरणोन्मुख मित्राची शेवटची इच्छा कोणाला प्यार असणार नाहीं?

**सत्यव्रत:**—दिनानाथ! समाज-कार्यार्थ सांडलेल्या रक्तानें पावन झालेल्या या जागेवर रूढीच्या बोहल्यावर चढून माझ्या वाहत्या रक्तानें या माझ्या लाडक्या बहिणीचा निःप्रभ कपोल-प्रान्त पुसून टाकून, दिनानाथ! त्यावर तुझ्या सोज्वल हातांनीं सतीच्या सौभाग्य-तिलकाची शोभा पसरून दे! पाजी लोकांनीं गजबजलेल्या कामांध जगांत पोरक्या स्त्रीयांच्या शीलांची जबाबदारी कर्त्या पुरुष-वर्गावर येऊन पडत असते! दिनानाथ! माझ्या ताईच्या संरक्षणाची जबाबदारी मी तुझ्यावर सोंपवितों. दिनानाथ! या माझ्या अभागी बहिणीचा हात माझ्या समक्ष तूं आपल्या हातांत घे पाहूं. कां? असा स्तब्ध कां?

**दिनानाथः**—सत्यव्रत! राष्ट्राकरीतां शुद्ध प्रेमाचा संन्यास करूनही सुधाताईचा सुकुमार हात स्वतःच्या हातांत घेण्याच्या सत्कार्यांत माझें एक अस्पष्ट वचन आड येतें आहे असें मला वाटतें. (विमलकडे पाहतो.)

**विमलः**—(एकदम पुढें येऊन.) पण मी होऊन आपणाला त्यांतून बंधमुक्त करतें इतकेंच नव्हे तर मी स्वतः सुधाताईच्या हाताचें दानोदक आपल्या हातांत सोडून देऊन मीही थोडाबहुत राष्ट्र-करीतां 'स्वार्थ संन्यास' करण्याला शिकते. (सुधेचा हात दिनानाथाच्या हातांत घालते.)

**सत्यव्रतः**—अहाहा! कोण हा 'स्वार्थ संन्यास'! विमल! तुझ्या रंग-देवतेला मी विरागी बनविलें म्हणून तुझा माझ्यावर रोष तर नाहीं ना!

**विमलः**—छे! छे! महाराज! जें माझ्या प्रेमाला पटलें तेंच मी कृतींत गिरविलें यापेक्षां मी अधिक तें काय केलें? शिवाय, तुम्ही सर्वजण आपआपल्यापरीनें राष्ट्रोद्धाराकरतां संन्यास-दीक्षा घेत असतां मीच तेवढी रिक्त हस्तानें परत कशी फिरूं?

**सत्यव्रतः**—अहाहा! कोण उदात्त विचार हा! मधुकर! माझा आत्म-संन्यास किंवा तुझा स्वार्थ-संन्यास अगर दिनानाथाचा प्रेम-संन्यास यासर्वांपेक्षां विमलचा हा रंग-संन्यास मात्र खरोखर अलौकिक आहे! पण मधुकर! या सर्व संन्यासांना अपूर्व शोभा केवळ तुझ्या 'स्वार्थसंन्यासा'नें आली असल्या-मुळें मी त्याला अधिक महत्व देतों आणि 'स्वार्थ—संन्यास' हीच एक यशाची खरी गुरुकिल्ली आहे! हा 'स्वार्थसंन्यासा'चा दैवी, महामंत्र प्रत्येक व्यक्तीच्या रोम-रंध्रांत पक्का बाणल्याविना देशोद्धाराच्या वल्गना व्यर्थ आहेत! मधुकर! झालें! संपलें आतां! मी तुमची सर्वांची आतां रजा घेतों! पण...

**सर्वजणः**—पण काय........

**सत्यव्रतः**—दिनानाथ! मधुकर! तसेंच विमल आणि माझ्या लाडक्या ताई! हा आम्हा सर्वांचा 'स्वार्थ-संन्यास' आईसाहेबांच्या पवित्र

चरणीं अर्पण करून आपण राष्ट्र ऋणांतून अंशतः मुक्त होऊंया. पण मधुकर! हीं बाल-योगिनी कोण! (लिला भगव्या वेषांत प्र० क०)

**मधुकरः**—गुरु-राज! या माझ्या गुरु-माता माईसाहेब! (अभिवादन.)

**सत्यव्रतः**—कोण माई? अहाहा! माई? शेवटीं तुझी भेट झाली हें बरें झालें. पण माई! हें दैवी तेज आपण कोठें संपादन केलेंत?

**लिलाः**—बाळ! त्या जगदीशाची इच्छा! असो. मी सर्वसंग-परित्याग करून चित्-शांतीसाठीं उद्यां बदरीकाश्रमीं जाण्यास निघणार हें तुह्मांस कळविण्यासाठीं येथें मुद्दाम आलें आहे. बरें आहे येतें मी. परमेश्वर तुमचें रक्षण करो. ( जाते. )

**सत्यव्रतः**—मधुकर! हें काव्यचंद्रिका-कार्यालय कां संन्यासाचा आश्रम आहे? दिनानाथ! येतों मी. ताई! तूं अगदीं निर्भय रहा! मधुकर! हा 'स्वार्थ–संन्यासा'चा ताम्रपट प्रसंगीं हाडाच्या लेखणीनें व रक्ताच्या शाईनें कसा लिहिला जातो हें तूं प्रत्यक्ष पाहिलें आहेसच. अभागी विमल! मी तुझ्या हातांत दिलेला 'विषारी प्याला' उद्यां जनतेपुढें येतांच मानवी हृदय थरारून जाऊन तो समाजांत भयंकर क्रान्ति करील असा माझा कयास आहे. असो. कर्ता करविता तो जगदीश असून आह्मी मानव केवळ निमित्तमात्र असतों. आई. आईग......पाणी... ..पाणी. (उचकी लागते.)

**दिनानाथः**-( पाणी पाजवून. ) बाळ सत्यव्रत! सत्यव्रत! बाळ डोळे उघड.

**सत्यव्रतः**—माझ्या मित्रांनों! हिंद-दौलतीच्या आधार-स्तंभानो! मी तुमची आतां रजा घेतों. मधुकर! ही पाहिलीस कां आपली हिंद–देवी! (हिंद-देवीचें दर्शन.) बरें आहे. येतों मी. हिंद-देवी! या तुझ्या लाडक्या भक्ताची ही वेडीवांकडी चरण-सेवा तुझ्या पूज्य-चरणीं रुजूं होऊं दे.

(उचकीबरोबर प्राण जातो.)

**मधुकरः**—अरेरे! अंधार पडला! आज समाजाचा स्वातंत्र्य-दीप मालविला गेला!

**विमल व सुधाः**-ह्मणजे? हें काय?

**दिनानाथः**—हाच तो ' स्वार्थ-संन्यास '!

**: अंक चवथा समाप्त. :**

## गुरुचरणीं.

**ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्।**
**ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥**

श्रीगीतोपनिषत्सु—श्रीभगवान्।

Printed in the Shree Venkateshwar Press Branch Kolhapur by its Manager Mr. Mahadeo Narayan Dixit and published by the author Master D. Atmaram. in the 'Atmaram-Building' Kolhapur.

IRBK-0100528